पुणे, सोमवार, १८ नोव्हेंबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 336 • वर्ष ३ रे, अंक ३३६ • किंमत ₹ ६ • पाने : १०+२=१२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com
BEYOND THE NEWS

## मुंबईत कोरोनाबाधितांचा मृतदेह ठेवण्याच्या बॅगमध्ये घोटाळा

## 7/11 ट्रेन बॉम्बस्फोट प्रकरणाचा कालक्रम

मुंबई: 11 जुलै 2006 रोजी मुंबईच्या उपनगरीय गाड्यांमध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोटात दोषी ठरलेल्या पाच जणांना विशेष न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

## 26/11 Mumbai Terror Attack : सहा ठिकाणी हल्ले, 60 तास मृत्यूचे तांडव आणि 166 जणांचा जीव गेला; मुंबई हल्ल्याच्या 'त्या' दिवशी नेमकं काय घडलं?

मुंबई (प्रतिनिधी):

## कोविड स्पाइक दरम्यान मुंबईने मोठ्या धार्मिक सणावर निर्बंध लादले आहेत

(विशेष प्रतिनि

ऑक्टोबर २१, २०२१

## " गोवारी हत्याकांड, पालघर साधू हत्याकांड झालं त्यावेळेस कुठं होतं सरकार? " ;

"हा केवळ चौकश्यांवरून महाराष्ट्राचे लक्ष विचलित करण्याचा नियोजित कार्यक्रम आहे.", असंही बोलून दाखवलं आहे.

## रेमडेसिवीरचा काळाबाजार करणाऱ्या काँग्रेसच्या पदाधिकाऱ्याला पोलिसांनी रंगेहाथ पकडलं, पोलिसांनी कारवाई नेमकी कशी केली?

## १०० करोड़ की वसूली करनेवाली वसूली सरकार

## भ्रष्टाचाराचे आरोप: बीएमसी खरेदी, जंबो केअर सेंटर्स, मनुष्यबळ नियुक्तीचे ऑडिट करणार

BMC च्या दक्षता विभागाने सर्व वापरकर्ता विभागांना ऑनलाइन ऑडिटसाठी कोरोनाव्हायरसशी लढा देण्यासाठी घेतलेल्या खरेदी आणि सेवांशी

## 250 dead in Bombay serial blasts

## पुणे बॉम्बस्फोटातील मृतांचा आकडा 17 वर

ऑगस्ट २५, २००३

## मुंबईतील साखळी स्फोटांमधील मृतांची संख्या 22 वर

## २००६ मुंबई ट्रेन बॉम्बस्फोट: 13 वर्षांनंतर आजही जखमा ताज्याच

१८ जानेवारी २०११

## सरकारची कर्जमाफी म्हणजे शेतकऱ्यांची दिवसाढवळा केलेली फसवणूक

## Antilia bomb threat: Did a PPE-clad man park explosive-laden SUV outside Ambani residence? CCTV emerges

Amid an ongoing investigation in connection with the Antilia bomb threat, a CCTV footage has emerged, showing a PPE-clad man walking on Mumbai roads late at night.

## महानगरपालिकेत कोट्यवधींचा रस्ते घोटाळा

## राहुल गांधींच्या आदेशावरून उद्धव ठाकरेंनी पालघर मॉब लिंचिंगचा सीबीआय तपास थांबवला

पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील गडचिंचले गावात 16 एप्रिल 2020 रोजी दोन नाशिकस्थित साधू आणि त्यांच्या चालकाची निर्घृण हत्या करण्यात आली, मुंबईपासून सुमारे 120 किलोमीटर अंतरावर.

## बीएमसी खिचड़ी घोटाला: मुंबई नगर निगम के खिचड़ी घोटाले में कई पहलू सामने आए

मुंबई नगर निगम में हुए खिचड़ी घोटाले में आर्थिक अपराध शाखा की जांच में कई पहलू सामने आए हैं. खिचड़ी बनाने वाली कंपनी के पास स्वास्थ्य विभाग से कोई लाइसेंस नहीं था. फिर भी उन्हें खिचड़ी का ठेका दिया गया.




# म्हणूनच नको काँग्रेस

Published By: Bharatiya Janata Party, Maharashtra | C.D.O Barrack No. 1, Nariman Point, Mumbai- 400020





## अजेंडा विकासाचा...!



### बागवेच्या जाहीरनाम्याचे दिमाखात प्रकाशन

## कँटोन्मेंटच्या विकासाची ब्लू प्रिंट तयार

कॅन्टोनमेंट

**पुणे :** या निवडणुकीत विजयी झाल्यानंतर करावयाच्या अनेक योजना व विकासकामे याची ब्लू प्रिंट मी तयार केली आहे, अशी माहिती कॅन्टोन्मेंट मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश बागवे यांनी दिली.

बागवे म्हणाले; रस्तारुंदीकरण, नवीन वाहनतळांची निर्मिती, पुरेशा दाबाने मुबलक पाणीपुरवठा, रस्त्यांवर दिवे, विपुल सार्वजनिक बससेवा, क्रीडांगणांचा विस्तार, जुन्या वाड्यांच्या विकासासाठी नवीन धोरण आखून निधी उपलब्ध करणे अशा नागरी सुविधांबरोबरच तरुण-तरुणीसाठी शाश्वत रोजगार, महिलांना सुरक्षा व सार्वजनिक स्वच्छतागृहे, व्यायामशाळांची उभारणी, ज्येष्ठ नागरिक व माजी सैनिकांसाठी विरंगुळा केंद्रे अशा अनेक प्रकल्पांवर मी भर देणार आहे. जुन्या बाजाराचा विकास, तसेच घोरपडी, वानवडी, फातिमानगर, सॅलिसबरी पार्क अशा उपभागांसाठी विशेष विकास प्रकल्प राबवण्याचे मी योजले आहे. माझ्यासाठी सर्वाधिक महत्त्वाची बाब म्हणजे या मतदारसंघातील प्रत्येक झोपडपट्टीवासीयाला हक्काचे घर त्याच जागी मोफत मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे.

# कोथरूडमध्ये घुमला जय श्रीरामचा नारा...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**कोथरूड :** नऊवारी साडी, नाकात नथ अशा पारंपारिक वेषभूषेतील महिलांनी आज कोथरुडमधील मतदारांचे लक्ष वेधून घेतले, या रॅलीत सहभागी झालेल्या महिलांनी आणि कार्यकर्त्यांनी जय श्रीरामाच्या घोषणा दिल्याने या परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

भाजपा महायुतीचे उमेदवार चंद्रकांतदादा पाटील यांच्या प्रचारार्थ कोथरुड मधील प्रभाग क्रमांक १३ मध्ये आयोजित बाईक रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ठिकठिकाणी जय श्रीरामच्या जयघोषात रॅलीचे स्वागत करण्यात येत होते. या रॅलीत पारंपरिक वेशात महिला सहभागी झाल्या होत्या.

कोथरुड मधील प्रभाग क्रमांक १३ मध्ये काढण्यात आलेल्या बाईक रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी करत 'जय श्रीराम' च्या घोषणेसह हात उंचावून प्रतिसाद मिळाल्याने रॅलीत उत्साह संचारला होता. तर प्रभागातील मंडळांकडून ही पाटील यांचे जंगी स्वागत करण्यात आले. विशेष म्हणजे, या संपूर्ण रॅलीमध्ये अनेक महिला पारंपरिक वेशात सहभागी झाल्या होत्या.

एरंडवण्याचे ग्रामदैवत भैरवनाथांचे दर्शन घेऊन रॅलीची सुरुवात झाली. या रॅलीत भाजपाचे माजी पुणे शहर अध्यक्ष जगदीश मुळीक, भाजपा पुणे शहर सरचिटणीस पुनीत जोशी, प्रदेश प्रवक्ते संदीप खर्डेकर, माजी नगरसेवक दीपक पोटे, जयंत भावे, नगरसेविका मंजुश्री खर्डेकर, माधुरी सहस्रबुद्धे, युवा मोर्चा अध्यक्ष अमित तोरडमल, प्रभाग अध्यक्षा ॲड. प्राची बगाटे, चित्रसेन खिलारे, अमोल डांगे, अनुराधा एडके, गिरीश खत्री, मंदार बलकवडे यांच्यासह भाजप महायुतीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

### विविध संघटनांचा पाठिंबा

● विविध संघटनांकडूनही जाहीर पाठिंबा दिला जात आहे. आज क्रांतीगुरु लहुजी महासंघ आणि महाराष्ट्र राज्य सु. बे. स्थापत्य अभियंता संघटनेने आपला पाठिंबा पाटील यांना जाहीर केला. संघटनेचे अध्यक्ष पाठिंब्याचे पत्र पाटील यांच्याकडे सुपूर्द केले.

शिवाजीनगर

## काँग्रेस म्हणजे बुडती नौका - राजनाथसिंग



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** काँग्रेस पक्षाची स्थिती नाजूक बनली आहे, त्यामुळे ते ज्यांच्या गळ्यात पडतात त्या पक्षांचे बुडणे निश्चित आहे. महाराष्ट्रात काँग्रेस उद्धव ठाकरे यांची शिवसेना, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गळयात पडली आहे, त्यामुळे या पक्षांचे बुडणे नक्की असल्याची टीका केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी केली. काँग्रेसची स्थिती बिकट असून ती आपल्या पायावर पुन्हा उभी राहू शकत नसल्याचा हल्लाबोलही त्यांनी केला.

महायुतीचे उमेदवार सिद्धार्थ शिरोळे यांच्या प्रचारासाठी सिंह यांच्या सभेचे आयोजन खडकीतील आलेगावकर शाळेच्या सभागृहात करण्यात आले होते. यावेळी सिद्धार्थ शिरोळे, भारतीय जनता पक्षाचे महाप्रांत प्रमुख राजेश पांडे, भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष धीरज घाटे, खडकी कँटोन्मेंट बोर्डाचे उपाध्यक्ष दुर्योधन भापकर, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, ॲड. एस. के. जैन आदी उपस्थित होते. यावेळी शिरोळे यांच्या विकासनाम्याचे राजनाथसिंग यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. महाविकासआघाडीमध्ये सहभागी झालेल्या उद्धव ठाकरे यांना काय झाले आहे, त्यांनी कोणाच्या बरोबर समझोता केला आहे, असा सवाल राजनाथसिंग यांनी यावेळी उपस्थित केला. महाआघाडीचे सरकार सत्तेमध्ये असताना महाराष्ट्र त्यांच्यासाठी एटीएमचे मशीन होता, त्यांनी राज्याचे काय भले केले. काही महिन्यापूर्वी झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला काही राज्यामध्ये अपेक्षित यश मिळाले नाही, त्यामध्ये हरियाणा, महाराष्ट्र यांचा समावेश होता. नुकत्याच हरियाणामध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत तिथल्या जनतेने भारतीय जनता पक्षावर विश्वास दाखवत सत्ता दिली. महाराष्ट्रामध्ये देखील त्याचीच पुनरावृत्ती होणार असून महायुतीचे सरकार पुन्हा एकदा सत्तेमध्ये येणार आहे. सरकार चालवण्याची कला भारतीय जनता पक्षाकडे असल्याचे राजनाथसिंग यावेळी म्हणाले.

## कृतघ्न लोकांना कसब्यातील मतदार घरी बसवणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आमदार रविंद्र धंगेकर यांना मनसेमुळेच राजकारणात ओळख मिळाली आहे. मात्र; त्यांच्यावर पक्षाने आणि कार्यकर्त्यांनी केलेले हे उपकार धंगेकर हे सोयीस्करपणे विसरत आहेत. त्याशिवाय मनसेने लोकसभा निवडणुकीत दिलेला बिनशर्त पाठिंबा भाजपा आणि हेमंत रासने विसरत आहेत, यातूनच त्यांचा कृतघ्नपणा दिसून येत आहे.

अशा कृतघ्नपणाच्या व्यक्तींना जनता घरी बसविल्याशिवाय शांत बसणार नाही, असा इशारा मनसेचे कसबा मतदारसंघाचे उमेदवार गणेश भोकरे यांनी दिला आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गणेश भोकरे यांनी पत्रकार परिषदेत आपली भूमिका मांडली. यावेळी मनसेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. गणेश सातपुते, शहर संघटक निलेश हांडे, रवी सहाणे आदी उपस्थित होते. हेमंत रासने यांनी माझ्या कार्यकर्त्यांना दिलेल्या धमक्यांना भीक घालत नसून, यापुढे असे प्रकार घडले, तर धमक्या देणाऱ्यांशी दोन हात करू, असा इशाराही त्यांनी दिला. मुलांची फी भरून त्यांना मदत केल्याप्रकरणी निवडणूक आयोगाने नोटीस पाठवली आहे.

## मुस्लिमांच्या प्रतिसादाने भारावले चेतन तुपे

### पाठिंबा देत घेतला सेल्फीचा आनंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महायुतीचे उमेदवार चेतन तुपे पाटील यांनी मतदार संघातील मुस्लिम बहुल भागात पदयात्रा व बाईक रॅली मतदारांशी संवाद साधला. मुस्लिम समुदायाने ठिकठिकाणी उमेदवार तुपे यांच्यासोबत सेल्फी व फोटो घेत उत्साहात स्वागत केले, मुस्लीम समाजाच्या या प्रतिसादाने आमदार चेतन तुपे पाटील चांगलेच भारावले. तुपे पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण, अशोका म्युज सोसायटी, हेमंत करकरे चौक, गल्ली क्रमांक दोन, ग्रीनपार्क, अहलेबेत मस्जिद, जे. के. पार्क, कुमार पृथ्वी, साईबाबा मंदिर, व्हेल्यु व्हू स्कूल, माजी नगरसेवक हाजी गफुर पठाण, रइस सुंडके व परविन हाजी फिरोज शेख जनसंपर्क कार्यालय, नवाजीश चौक, दुर्रानी कॉम्प्लेक्स, आशीर्वाद चौक, बस स्टॉप, भाग्यदोयनगर मुख्य रस्ता, मक्का मस्जिद, शिवनेरीनगर गल्ली क्रमांक एक ते तीन नऊ व बारा, भगवा चौक, ज्युपिटर स्कुल, पिताश्री आश्रम, इस्लामिया बेकरी, कोणार्क पुरम सोसायटी, वेलकम हॉल, जम जम हॉटेल, मेफेअर सोसायटी, सर्वोदय सोसायटी, कौसरबाग मस्जिद, मदीना हॉटेल या भागात पदयात्रा आणि रॅली द्वारे नागरिकांची भेट घेतली.

> "मतदारसंघातील मुस्लिम बांधव पारंपारिक आमच्या कुटुंबावर प्रेम करणारा आहे त्यांच्या सुखदुःखात सहभागी होत असल्याने त्यांच्या कुटुंबाचा एक घटक म्हणून ते मला कायम साथ देत आले आहेत."
> — **आमदार चेतन तुपे पाटील,** महायुती, हडपसर

हडपसर

माजी नगरसेविका नंदा लोणकर, हसीना इनामदार, रईस सुंडके, हाजी गफूर पठाण, परविन हाजी फिरोज शेख, अन्वर मेमन, आबिद सय्यद, जावेद शेख, अब्दुल बागवान, नजीर मामु, इब्राहिम चाचा, सरवर शेख, ज्योती पाटील, वैशाली हांडे, मुनाफ शेख, बाबा शेख, आलिम शेख, अन्वर शेख, बाप्पू मुलाणी, राजू आडागळे, इम्तियाज शेख, जावेद पठाण, अजहर पठाण, एजाज शेख, ईस्माईल बागवान, मजहर काश्मिरी, सुफियान शेख, जाबिर शेख, ईस्माईल शेख, शाकीर शेख, इरफान शेख, राजूसय्यद, सादिक पानसरे, युनुस खान, लियाकत शेख, रिजवान शेख, सलमान पठाण, अमजद पठाण, सलमान काझी, जाकीर शेख, मुज्जु शेख, राहिल सय्यद, अजीज खान, फैसल शेख, समीर बागवान, अल्ताफ सय्यद, कलीम शेख, लड्डु शेख, जुबेर शेख, आवेज शेख, अरबाज शेख आदि कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

### काँग्रेस नेते गोपाळ तिवारी यांचे आवाहन

## भ्रष्टाचारी महायुतीला सत्तेवरुन खाली खेचा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्राची अस्मिता पायदळी तुडवणाऱ्यांना, राज्यास दिवाळखोर करुन, भ्रष्टाचारावर पांघरूण घालणाऱ्या "महा(भ्रष्ट) युती"स सत्तेवरून खाली खेचण्याचे आवाहन करीत.. सार्वजनिक आरोग्य सुविघांच्या, रखडलेल्या डीपी'च्या नियोजनबध्द अंमलबजावणी करीता, महाविकास आधाडी ऊमेदवारांना 'निर्णायक ऊच्चांकी मतांनी' विजयी करण्याचे आवाहन पुणे शहरातील जेष्ठ काँग्रेस नेते व राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी केले.

> "नदीपात्र सुशोभिकरणाच्या नांवा खाली, नागरी पैसा ऊधळुन, कामे करत असल्याचे सोंग आणणे ही पुणे करांच्या डोळ्यात निव्वळ धुळफेक आहे."
> — **गोपाळ तिवारी,** ज्येष्ठ काँग्रेस नेते

वारंवार होणाऱ्या 'वहातुक कोंडीतुन' पुणेकरांची कायम स्वरुपी सुटका होणे गरजेचे आहें. त्या करीता, वर्षानुवर्षे अस्तित्वात असलेल्या 'त्याच व तेवढ्याच रुंदीच्या रस्त्यांचे व रस्त्यालगत पार्किंगचे नियोजन करणे ही पुणे शहरातील वास्तवतेची व काळाची गरज आहे..!

ते म्हणाले की, शहरातील अस्तित्वातील रस्त्या लगतच्या "रहीवासी वा व्यवसाईक" बहुमजली उच्चांकी उंचीच्या प्रकल्पांमधील, किमान १० ते १५ % वाहने दिवसा (कार्यालयीन वेळेत) जरी बाहेर पडली तर वारंवार वहातुक कोंडी होते ही वास्तवता नजरेआड करता येणार नाही. त्यामुळे अस्तित्वातील बांधकामांना पुरेशी दळण - वळण, वाहतूक व पार्किंग व्यवस्था निर्माण होई पर्यंत तातडीने स्थगिती देऊन बांधकामे नियंत्रिणा खाली आणणे गरजेचे आहे..! या करीता राज्य पातळीवर शहर नियोजनाचे फेर धोरण आखणे ही काळाची गरज आहे..!

आवश्यक नव्हे तर 'अत्यावश्यक पार्किंग सुविधा अभावी मेट्रोचे जाळे' तयार करणे हे शहर नियोजनात शहाणपणाचे लक्षण नाही..! मुठा नदीतील पात्राची पाण्याची वहन क्षमतेकडे अक्षम्य दुर्लक्ष करीत, पुराचा धोका सतत नजरेआड करून, केवळ "सुशोभीकरणाच्या नावाखाली" भ्रष्टाचाराचे चोचले पुरवण्यासाठी, दूरदृष्टी अभावाचा विकास पुणेकरांना परवडणारा नाही.

### अश्विनी कदम यांचा हल्लाबोल

## माधुरी मिसाळ या निष्क्रिय आमदार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** विद्यमान भाजप आमदारांना पंधरा वर्षेतील निष्क्रियतेमुळे साध एक शाश्वत काम करता आले नाहीं. उलट त्यांच्याच पक्षातील नगरसेवकांनी केलेल्या कामाचे श्रेय घेऊन भर निवडणूकीत पर्वतीकरांना पुन्हा आश्वासनाचे गाजर दाखविण्याचे काम सुरू आहे, असा हल्लाबोल पर्वती मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार अश्विनी कदम यांनी केला.

> "स्वारगेट ते कात्रज या मेट्रोसाठी पहिल्या टप्प्यासाठी मी पाठपुरावा केला.पंधरा वर्षातील तेच तेच आश्वासने आणि फसव्या जाहिरातीना सुज्ञ पर्वतीकर नागरिक आता बळी पडणार नाही."
> — **अश्विनी कदम,** उमेदवार महाविकास आघाडी

पर्वती

माझ्या नगरसेवक कार्यकाळात आंबील ओढावरील सीमाभिंतीचा समावेश स्वतःच्या कार्य अहवालात टाकून खोटी जाहिरात केली आहे. विद्यमान आमदार सांगत आहेत की, पूरपरिस्थिती रोखण्यासाठी 200 कोटी रुपयांचा निधी आणला आहे. माझं पर्वतीकरांच्या साक्षीने तुम्हाला ओपन चॅलेंज आहे की, तुम्ही समोर या ! माझ्या नगरसेवक कार्यकाळातील मी केलेले काम दाखवते. आपण पंधरा वर्षात लोकप्रतिनिधी म्हणून काय शाश्वत काम केलं ? हे आपण दाखवा, असे खुले आव्हानही कदम यांनी दिले. यावेळी अंकुश आण्णा काकडे, अशोक हरणावळ, शैलेंद्र नलावडे, भगवानराव साळुंखे, शशिकांत तापकीर,सतीश पवार,सचिन पासलकर, विद्या ताकवले, अर्जुन जानगवळी,स्वप्नील खडके, आशिष व्यवहारे,ऋषिकेश भुजबळ, अमोल ननावरे,रोहन सोनीस, अमोल पालखे, विजय हिंगे, आशिष वाघमारे, निलेश खंडाळे, सुरज लोखंडे आदी महाविकास आघाडी आणि मित्र पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## आमदार तापकीर यांचे पुन्हा आश्वासन ?



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतीय जनता पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार आणि खडकवासला मतदारसंघाचे आमदार भिमराव तापकीर यांनी रविवारी धनकवडी भागातील प्रचार दौऱ्यात आपल्या आगामी विकास योजनांबाबत महत्वाचे विधान केले. "पुढील पाच वर्षांत खडकवासला मतदारसंघातील सहकारी गृहनिर्माण संस्था, मोठ्या सोसायट्या आणि ग्रामीण भागाच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आमदार निधी मोठ्या प्रमाणावर वापरणार आहे. माझ्या कारकिर्दीत या मतदारसंघात अनेक विकास कामे मार्गी लागलेली आहेत. जनतेच्या समस्या सोडवण्यासाठीमी कायम प्रयत्नशील राहिलो आहे." असे तापकीर यांनी स्पष्ट केले.

• पुणे, सोमवार, १८ नोव्हेंबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 336 • वर्ष ३ रे, अंक ३३६ • किंमत ₹ ६ • पाने : १०+२=१२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS



अन्यथा धरण उशाशी अन् शेतकरी उपाशी P8



भारताचे वर्चस्व कायम चॅम्पियन ट्रॉफी : चीनवर ३-० ने मात P12

## विधानसभा निवडणूक : २० तारखेला मतदान, २३ ला निकाल


# प्रचाराच्या तोफा थंडावणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**पुणे :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा समारोप आज संध्याकाळी ५ वाजता होत असून, २० तारखेला मतदान होणार आहे. महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व २८८ जागांसाठी एकाच दिवशी मतदान होणार आहे. २३ तारखेला मतमोजणी होणार आहे. महायुती विरोधात महाविकास आघाडी अशी ही लढत असली, तरी प्रत्यक्षात ६ पक्ष यामध्ये आहेत. त्याशिवाय, इतर पक्षही आपले नशीब अजमावून बघत असल्याने, ही निवडणूक अत्यंत रोचक झाली आहे.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीतील घटक पक्षांना राज्यात अनपेक्षित यश मिळाले. त्यामुळे विधानसभा निवडणुकीतही त्याची पुनरावृत्ती होईल, असा विश्वास मविआ नेत्यांना आहे. त्याचवेळी, महायुतीने लोकसभा निवडणुकीतून धडा घेत, त्याप्रमाणे आपल्या रणनीतीत बदल केल्याचे दिसून आले. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी महायुती सरकारविरोधात घेतलेली भूमिका मविआला सोयीची पडेल, असे मानले जात होते. तथापि, त्यांनी ऐनवेळी भूमिकेत बदल केला.

प्रचाराच्या निर्णायक टप्प्यात, भाजपने व्होट जिहादचा मुद्दा प्रचारात आणत, प्रचाराला हिंदू-मुस्लिम असे चित्र दिले. मविआच्या व्होट जिहादविरोधात भाजपने धर्मयुद्ध पुकारले. बटेंगे तो कटेंगे, हा उत्तर प्रदेशाचे » पान ७ वर




### संपूर्ण देशाचे लक्ष




• महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिले आहे. लोकसभेत इंडिया आघाडीला महाराष्ट्रात जे अनपेक्षित यश मिळाले, त्याची पुनरावृत्ती विधानसभेतही होते का, याकडे राजकीय विश्लेषकांचे लक्ष लागले आहे. त्याचवेळी हरियाणा विधानसभेत भाजपने यश मिळवले, तशीच कामगिरी भाजप महाराष्ट्रात करणार का, याचीही उत्सुकता कायम आहे. महाराष्ट्रात जसे निकाल लागतील, त्याप्रमाणे देशभरात नंतर भूमिका घेण्यात येईल. म्हणूनच, संपूर्ण देशाचे लक्ष महाराष्ट्राकडे आहे.

## हिंदुत्ववादी सरकारमुळेच देश सुरक्षित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** हिंदुत्ववादी सरकार आहे, म्हणून



समाज आणि देश सुरक्षित आहे. विधानसभा निवडणुकीत मविआ सत्तेत येईल का नाही माहिती नाही. कोणाचे सरकार येईल त्याच्याशी आम्हाला काही घेणे देणे नाही, हिंदूंचे रक्षण केले पाहिजे, हिंदूसाठी काम केले पाहिजे, असे प्रतिपादन गोविंददेवगिरी महाराज यांनी पत्रकारांशी बोलताना केले.

ते म्हणाले की, मला दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल अपार आदर आहे. बाबरीबद्दल आपली भूमिका मांडणारे बाळासाहेब कुठे, जय श्रीराम म्हणणारे बाळासाहेब कुठे... अन् शिरखुर्मा खाणारे, जय श्रीराम म्हटल्यावर मुंडके छाटू म्हणणारे आणि औरंगजेबाला भाऊ म्हणणारे कुठे..., असे म्हणत त्यांनी सर्वांना मतदान करण्याचे आवाहन केले.

## » At a Glance

### पुणे शहर पोलिस सहआयुक्तांनी काढले आदेश

**पुणे:** पुणे पोलीस आयुक्तालयाच्या




कार्यक्षेत्रातील शिरुर, पुरंदर, भोर, वडगावशेरी, शिवाजीनगर, कोथरुड, खडकवासला, पर्वती, हडपसर, पुणे कॅन्टोंमेन्ट व कसबा पेठ या विधानसभा मतदार संघात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पुणे शहर पोलीस सह आयुक्त रंजन कुमार शर्मा यांनी शनिवारी एका परिपत्रकाद्वारे आदेश दिले आहेत.

सर्व मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मोबाईल फोन घेवून जाण्यास प्रतिबंध करण्यात आले आहेत. मतदान केंद्रात अथवा १०० मीटर परिसरात कोणत्याही प्रकारे फोटोग्राफी/व्हिडीओग्राफी करण्यास मनाई करण्यात आली असून, कोणत्याही प्रकारचा ज्वलनशील पदार्थ, प्रतिबंधक वस्तु, आदर्श निवडणूक » पान ७ वर

### माजी आमदाराला जुन्नरमध्ये धक्का

**पुणे :** विधानसभा निवडणुकीच्या



प्रचाराची रणधुमाळी अखेरच्या टप्प्यात असून, मतदानाला काही दिवस बाकी असताना, विधानसभा निवडणुकीत उतरलेल्या माजी आमदाराला मोठा धक्का बसला आहे. एका माजी आमदाराचा अश्लील व्हिडीओ व्हायरल झाला आहे. सोशल मीडियावरून हा व्हिडीओ व्हायरल झाल्याने, राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, तपास सुरू करण्यात आला आहे.

जुन्नर विधानसभा मतदारसंघात अपक्ष उमेदवार आणि माजी आमदार शरद सोनवणे यांचा अश्लील व्हिडीओ असल्याचा दावा करण्यात आला असून, चारित्र्यहनन करणारा हा व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ » पान ७ वर

## मी शरद पवारांना सोडलेले नाही अजित पवारांच्या व्यक्तव्याने चर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** काहींना वाटत असेल की मी साहेबांना सोडायला नको होते. पण मी साहेबांना सोडलेले नाही, असे विधान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगल्या आहेत.

राज्यात विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून, विधानसभा निवडणुकीसाठी येत्या २० तारखेला मतदान होत आहे. तसेच २३ तारखेला लगेचच निकाल जाहीर होणार आहे. या निवडणुकीकडे अवघ्या देशाचे लक्ष लागलेले असून, प्रचारसभांमधून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. त्याचवेळी संपूर्ण देशाचे लक्ष हे बारामती विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीकडे लागलेले आहे.



बारामतीत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांचा पुतण्या युगेंद्र पवार यांच्यात लढत होणार आहे. युगेंद्र पवार हे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे उमेदवार आहेत. बारामतीत पवार विरुद्ध पवार होत असलेली ही लढत म्हणूनच प्रतिष्ठेची ठरली आहे. अजित पवार आणि युगेंद्र पवार दोन्हीही उमेदवारांकडून जोरदार प्रचार सुरु आहे. मात्र, असं असतानाच एका सभेत बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवारांनी केलेल्या एका विधानामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

अजित पवार म्हणाले की, तुम्हाला काहींना वाटत असेल की मी साहेबांना सोडायला नको होते. मित्रांनो, मी साहेबांना सोडलेले नाही. मी साहेबांना सांगत होतो की, सर्व आमदारांचं मत होते. माझ्या एकट्याचे मत नव्हते. सर्व आमदारांच्या सह्या आहेत. सर्वांचे मत होते की सरकारमध्ये जावे. आता सरकारमध्ये का जावे? तर कामाला स्थगिती आली होती. आपण मंजूर केलेल्या कामांना स्थगिती आली होती. तेव्हा म्हटले हे तर तापच झाला. लोक मला तर वेड्यात काढतील कारण पैसे पाठवले आणि स्थगिती दिली. ती स्थगिती मी दिली नव्हती. स्थगिती सरकारने दिली होती, असे अजित पवार यांनी म्हटले आहे. मात्र, त्यांच्या या विधानाची चर्चा सर्वत्र होत आहे.



## उद्धव ठाकरे हे 'जनाब उद्धव'...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आज उद्धव ठाकरे हे उद्धव बाळासाहेब ठाकरे नाही, तर जनाब उद्धव ठाकरे झाले आहेत. आम्हीसुद्धा बाळासाहेब ठाकरे यांचेच विचार घेऊन चालत आहोत. बाळासाहेब ठाकरे व्यासपीठावर उभे राहून पाकिस्तानला सरळ उत्तर देण्याचे काम करत होते, मी त्यांची मुलगी म्हणून त्यांचे विचार घेऊन मैदानात आहे, असे म्हणत नवनीत राणा यांनी उद्धव ठाकरेंवर टीकास्र डागले आहे. » पान ७ वर

## सचिन पायलट यांचा महायुतीवर हल्लाबोल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक



देशाला दिशा देणारी आहे. संबंध देशाचे लक्ष या निवडणुकीकडे लागले आहे. महाराष्ट्र नेहमी देशाला दिशा देतो. त्यामुळे या निवडणुकीत सरकार बदलून महाराष्ट्र देशाला योग्य दिशा देईल. महाराष्ट्रातील जनतेला भ्रष्टाचारमुक्त आणि सामान्यांचे प्रश्न सोडविणारे सरकार पाहिजे. धार्मिक मुद्द्यावरून लोकांमध्ये फूट पाडणाऱ्या महायुती सरकारला लोक कंटाळले आहेत, अशी टीका राजस्थानचे माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांनी रविवारी पत्रकार परिषदेत केली.

» राजकारण

काँग्रेस भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेला उत्तराखंडचे विरोधी पक्षनेते टी एस सिंगदेव, शहराध्यक्ष अरविंद शिंदे, राष्ट्रीय प्रवक्त्या डॉ. शमा महंमद आणि प्रदेश सरचिटणीस अॅड. अभय छाजेड यावेळी उपस्थित होते.

### त्यांच्याकडे उत्तर नाही...

• ट्रिपल इंजिन सरकार आहे तर या सरकारचे फायदे सांगा, या आमच्या आव्हानाला त्यांच्याकडे उत्तर नाही. शेतकऱ्यांचे प्रश्न, सिंचन, बेरोजगारी, महागाई, रोजगार, शिक्षण, शेतमालाला हमीभाव या सामान्य लोकांशी संबंधित प्रश्नांवर बोलण्याऐवजी भाजपचे नेते धर्मांधता पसरवत आहेत, असा आरोप त्यांनी केला.

## 'एक है तो सुरक्षित हैं' चे समर्थन : एकनाथ शिंदे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई:** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या



'एक हैं तो सुरक्षित हैं' या घोषणेचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समर्थन केले केला आहे. तसेच उद्धव ठाकरे यांनी स्वार्थासाठी काँग्रेससोबत जात सरकार स्थापन केले, असा त्यांनी आरोप केला.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, की ही घोषणा अगदी योग्य आहे. मुख्यमंत्री शिंदे यांनी राहुल गांधी यांना आव्हान दिले. राहुल यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आव्हान दिले होते आणि त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांना हिंदुहृदयसम्राट म्हणावे, असे म्हटले होते. शिंदे यांनीही या गोष्टीचा पुनरुच्चार करत राहुल गांधी यांनी ठाकरे यांना हिंदुहृदयसम्राट म्हणून दाखवावे, असे सांगितले. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, की आम्ही बाळासाहेब ठाकरे यांचे सैनिक आहोत. त्यांनी ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. बाळासाहेब असते, तर त्यांनी उद्धव यांना जंगलात जाऊन वन्यजीव छायाचित्रण करायला सांगितले असते, असे ते म्हणाले.

### स्वार्थासाठी मुख्यमंत्री

• शिंदे म्हणाले, की उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेबांच्या विचारांचा त्याग केला. शिवसेनेचे धनुष्यबाण काँग्रेसच्या गळ्यात बांधले गेले. ज्या काँग्रेसने बाळासाहेबांची बदनामी केली, त्यांनी त्यांच्याशी हातमिळवणी केली. उद्धव ठाकरे हे केवळ स्वार्थासाठी आणि मुख्यमंत्री होण्यासाठी काँग्रेसमध्ये दाखल झाले.

## राज ठाकरेंबरोबर युती नाही : उद्धव

**मुंबई :** भाजपने राजकारणाचा विचका केला असून, महाराष्ट्राने आता तयारी केली आहे. प्रचार करा किंवा करु नका महाराष्ट्राने काय करायचे ते ठरवले आहे आणि २३ तारखेला ते समजणार आहे. राज ठाकरेंशी युती करणार नाही, असे उद्धव ठाकरे यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्टपणे सांगितले.

भाजपा त्यांची नीती सोडत नाही. एकटा भाजपा पुन्हा सत्तेत येण्यासाठी १६० जागांच्या आसपास जागा लढवत आहे. १०० टक्के अजित पवार आणि मुख्यमंत्री शिंदे यांचे उमेदवार बंडखोरी करुन पाडणार. मी युतीत होतो तेव्हाही १२४ जागा स्वीकारल्या होत्या. त्यावेळी ७० ठिकाणी असेच घडले होते. बंडखोरी करुन जागा पाडण्यात आल्या, असा आरोप त्यांनी केला. लोकांच्या मनात काय आहे ते आता २३ नोव्हेंबरला कळेल. असेही त्यांनी सांगितले.

## संजय जगताप यांना पुन्हा विधानसभेत पाठवा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** केंद्रीय कृषिमंत्री म्हणून काम करताना शेतकऱ्यांसाठी राबविलेल्या फळबाग योजनेचा लाभ संपूर्ण देशाला झाला असून, पुरंदरमध्येही अंजिराचे क्षेत्र वाढून निर्यात होऊ लागली. शेतकरी सुखी झाला. गेल्या पाच वर्षांत आमदार संजय जगताप यांनी चांगले काम केले असून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आमदार संजय जगताप यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा, असे आवाहन शरद पवार यांनी केले.

सासवड येथे महाविकास आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार आमदार संजय चंदुकाका जगताप यांच्या प्रचारानिमित्त आयोजित निष्ठावंतांच्या सभेत पवार बोलत होते. ते म्हणाले की, काही लोक मुंबईत राहतात, ५ वर्षांनी त्यांना निवडणूक आल्यावर पुरंदरची आठवण येते. आपलं मुख्यमंत्र्यांशी बरं आहे, जावू गावाला असे म्हणत उभे राहतात, मुख्यमंत्री येतात, कौतुक करतात, निघून जातात. त्यांनी कोणती कामे केली, पुरंदर उपसात त्यांचे योगदान काय, केवळ टिका टीप्पणी करायची. गुंजवणीचे पाणी आणतो हे किती वर्षे ऐकवतोय. सत्ता त्यांच्याकडे होती, मुख्यमंत्र्यांशी त्यांची जवळीक होती. मग गुंजवणीचे पाणी का आले नाही. त्यासाठी ते काहीही करताना दिसत नाहीत अशी टीका विजय शिवतारे यांचे नाव न घेता त्यांनी केली.




### परदेशात पुणे विद्यापीठाची सकारात्मक पावले

# उपकेंद्र सुरू करण्यास हिरवा कंदील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठानेदेखील परदेशात केंद्र उभारण्यासाठी सकारात्मक पावले उचलली आहेत. त्याचप्रमाणे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार परदेशी विद्यापीठांना देशात येण्याची संधी मिळणार आहे. कतारनंतर जॉर्जिया, कझाकिस्तान, दुबई आणि सौदी अरेबिया या चार देशांमध्ये पुणे विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करण्यासाठी विचारणा झाली असून, त्याला पुणे विद्यापीठाने हिरवा कंदील दिला आहे.

> कतारनंतर चार देशांत विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करण्याच्या प्रस्तावाला व्यवस्थापन परिषदेची मान्यता मिळाली. आता संबंधित देशातील स्थानिक व्यवस्थापनाच्या सहकार्याने विद्यापीठाचे केंद्र सुरू करण्यात येईल. परंतु, त्यापूर्वी संबंधित देशातील सरकारच्या अपेक्षा, तेथील स्थानिक गरजा यांचा विचार करून विद्यापीठाचे कोणते अभ्यासक्रम तेथे सुरू करायचे, हे ठरविण्यासाठी संबंधित देश आणि विद्यापीठ प्रशासन त्यांच्या-त्यांच्या पातळीवर सर्वेक्षण करेल. त्यातून संबंधित केंद्र सुरू करण्यासाठी अभ्यासक्रम ठरविले जातील. साधारणतः वर्षभरात ही संपूर्ण प्रक्रिया होईल.
>
> — डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

कतार येथे सुरू केलेल्या शैक्षणिक केंद्रानंतर या चार देशांमध्ये विद्यापीठाचे केंद्र सुरू करण्यासाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने मंजुरी दिली. त्यानुसार संबंधित देशांच्या मागणीनुसार शैक्षणिक केंद्र उभारण्यासाठी विद्यापीठाने प्रक्रिया सुरू केली आहे. देशात उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांपैकी पुण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. त्यात पुणे विद्यापीठात शिक्षण घेण्यास पसंती देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही जास्त आहे. यात अधिक करून आफ्रिकेतील देशांमधील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाला स्थान मिळविण्याचा प्रयत्न होत असून, त्याचाच एक भाग म्हणून तीन वर्षांपूर्वी विद्यापीठाने » पान ७ वर

#रा

### शरद पवारांच्या बॅगचीही तपासणी

**पुणे :** राज्यात विधानसभा निवडणुकीकरिता २० तारखेला मतदान होणार आहे. उद्यापासून प्रचाराच्या तोफा थंडावणार आहेत. त्यामुळे आजचा दिवस राजकीय पक्षांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला. आज बारामतीमध्ये शरद पवार पोहोचले होते. त्यादरम्यान, हेलिपॅडवर शरद पवार यांच्या बॅगांची तपासणी करण्यात आली.

शरद पवार आपल्या बालेकिल्ल्यात युगेंद्र पवार यांच्या प्रचारासाठी आले होते. त्यावेळी ते हेलिपॅडवर दाखल होताच त्यांच्यासोबत » पान ७ वर

# महागाई रोखणार कधी?

आज देशात भाज्या, धान्य, कडधान्य, भरड धान्य, औषधे, प्रवास, कपडे, शिक्षण, घरभाडे आदी सारेच महाग होत चालले आहे, झाले आहे. याचा फटका गृहिणींना मोठ्या प्रमाणावर बसतो. भाजीपाला, फळे, खाद्यतेल आणि पेयांच्या कडाडलेल्या किमतीमुळे किरकोळ महागाईने ६ टक्क्यांची सहिष्णुता पातळी ओलांडली आहे. बहुतेक वेळा दुकानदार मंडळी साठेबाजी करून धान्याची कृत्रिम टंचाई निर्माण करतात आणि शेतकऱ्यांना व ग्राहकांना वेठीस धरतात. सरकारने या भाववाढीवर आपला अंकुश ठेवला तरच सामान्य जनतेला दिलासा मिळेल. पण तसे काही होणार नाही कारण सरकार सध्या इलेक्शन मोडवर आहे. अन्नधान्याच्या किमतीत वाढ झाल्याने गत ऑक्टोबरमध्ये किरकोळ महागाईचा दर ६.२१ टक्क्यांच्या चिंताजनक पातळीवर गेला. सध्या बाजारात भाज्या, टोमॅटो, लसूण, कांदा, बटाटा, खाद्यतेलाचे भाव कडाडले आहेत. महागाईचा मार सहन करणाऱ्या जनतेला आता आपल्या प्रश्नांची जाण कुणाला आहे, कुणाला नाही याचा सारासार विचार करून २० नोव्हेंबरला आपला मतदानाचा हक्क बजावावा लागणार आहे. सध्या राजकारणी मंडळी 'बटेंगे तो कटेंगे', 'एक है तो सेफ है'च्या कैफात मग्न आहे. खाद्यान्नांच्या किमतीतील वाढीने ऑक्टोबरमध्ये किरकोळ महागाईदर ६.२१ टक्क्यांच्या चिंताजनक पातळीवर गेल्याचे मंगळवारी अधिकृत आकडेवारीद्वारा स्पष्ट करण्यात आले. या दराने १४ महिन्यांचा उच्चांक नोंदवत रिझर्व्ह बँकेसाठी सहनशील सहा टक्क्यांच्या सर्वोच्च पातळीला छेद मिळाल्याने बँकांच्या व्याजदरातील कपातही लांबणीवर जाणार असे दिसते. सर्वसामान्यांच्या रोजच्या अन्नाचा महत्त्वाचा भाग असणाऱ्या भाजीपाला आणि खाद्य वस्तूंचे कडाडलेले दर हे महागाईवाढीस कारणीभूत ठरले असून याचे कारण सप्टेंबरमध्ये किरकोळ महागाई दराने नऊ महिन्यांच्या उच्चांकी साडेपाच टक्क्यांची पातळी गाठली होती. ऑक्टोबर २०२३ मध्ये ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित हा महागाई दर ४.८७ टक्के होता. मागच्या महिन्यात लांबलेल्या पावसामुळे टोमॅटोसह भाजीपाला व कृषी-जिनसांच्या कडाडलेल्या किमतीमुळे खाद्यान्न महागाईचा भडका उडाला. सध्या बाजारात कांदा आणि लसणाचा तुटवडा निर्माण झाला आहे. कांदा ८० ते १०० रुपये किलो तर लसूण ४०० रुपये किलोवर गेला आहे. जेवणाला चविष्ट बनवणारे हे दोन महत्त्वाचे जिन्नस गायब झाल्याने सर्वसामान्यांच्या जिभेची चवच हरवली आहे. कांदा आणि लसणाच्या तुटवड्यामुळे त्यांच्या किमती वाढल्या आहेत. ऐन निवडणुकीच्या तोंडावर हा प्रकार घडल्याने राजकारणी मंडळी धास्तावली आहे. कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये कांदा व लसणाची आवक रोडावल्याने तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे पुढील महिनाभर कांद्याचे आणि तीन-चार महिने लसणाचे भाव चढेच राहण्याची शक्यता आहे. शेतकऱ्याकडील उन्हाळी कांदा आणि लसूण संपला आहे. राज्याबाहेरून होणारी लसणाची आवक थंडावली आहे. त्यामुळे रबी हंगामातील नवीन लसूण बाजारात येईपर्यंत लसणाचे भाव आवाक्यात येणार नाहीत. लसणाचा हंगाम अखेरच्या टप्प्यात असल्याने बाजारात तुटवडा निर्माण झाला आहे. लसणाची रबी हंगामात लागवड केली जाते. लसणाची काढणी फेब्रुवारीपासून सुरू होईल. त्यामुळे पुढील तीन-चार महिने लसणाचे दर भाव खाणार. खरीप कांद्याची काढणी सुरू असतानाच जोरदार पाऊस झाल्यामुळे कांदा सडला. त्यामुळे खरीप कांद्याच्या उत्पादनात मोठी घट झाली. बाजारात कांद्याचा तुटवडा असतानाच बांगलादेशने कांद्यावर लागू केलेले ५० टक्के आयात शुल्क १५ जानेवारीपर्यंत शून्य टक्के केले आहे. त्यामुळे बांगलादेशला निर्यात वाढली आहे. याचा परिणाम कांद्याच्या दरावर झाला. हे दर ८० ते १०० रुपयांवर गेले. खरीप हंगामातील ओला कांदा ६० रुपये दराने विकला जात आहे. दिवाळीनिमित्त नाशिक परिसरात कांद्याची खरेदी-विक्री आठवडाभर बंद होती. त्यामुळेही कांद्याचा तुटवडा निर्माण झाला. कांदा आणि लसणाने ऐन निवडणुकीत सरकारचे टेन्शन वाढवले आहे. कापूस, सोयाबीन दराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. लोकसभा निवडणुकीदरम्यान कापूस, सोयाबीनला हमीभावापेक्षा कमी दर मिळाल्याने शेतकऱ्यांच्या रोषाचा फटका महायुतीला बसला होता. यावेळी तसे काही होऊ नये म्हणून राज्य सरकारने काही उपाययोजना केल्या आहेत पण त्यामुळे शेतक-यांना दिलासा मिळू शकला नाही. सोयाबीनचे दर कोसळल्याने होत असलेल्या नुकसानीचा मुद्दा निवडणुकीच्या रणधुमाळीत प्रभावी ठरणार असे दिसते. गत हंगामात नुकसान झालेल्या कापूस, सोयाबीन उत्पादक शेतक-यांना पाच हजार रुपये प्रति हेक्टर असे दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रत्येकी ५ हजार रुपये अनुदान देण्याचा निर्णय सरकारने घेतला. त्याचा लाभ शेतकऱ्यांना मिळाला हे खरे असले तरी यंदा सोयाबीनचा हंगाम सुरू होण्याआधी सोयाबीनचे भाव पडले आहेत. केंद्र सरकारने सप्टेंबर महिन्यात खाद्यतेलावरील आयात शुल्क २० टक्क्यांनी वाढविण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे सोयाबीनला चांगला भाव मिळेल अशी अपेक्षा होती, परंतु बाजारातील विपरित परिस्थितीमुळे सोयाबीनचे भाव हमीदराच्या पातळीपर्यंतही पोहोचू शकले नाहीत. शेतमालाचे भाव कोसळल्याचे पाहून सरकारने त्याची दखल घेत दिलासादायक घोषणा करताना कापूस, सोयाबीनला हमीभावापेक्षा कमी दर मिळाल्यास फरकाची रक्कम सरकार देईल असे म्हटले आहे. तरीसुद्धा कापूस, सोयाबीन उत्पादकांची अडवणूक सुरूच आहे. विधानसभा निवडणुकीचा प्रचार भावनिक मुद्यावर नेण्याचे सर्वतोपरी प्रयत्न प्रमुख पक्षांची नेतेमंडळी करीत आहे. ओबीसी, मराठ्यांना परस्परांमध्ये झुंजवून जाती-धर्माचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष उल्लेख करून मतांचे ध्रुवीकरण करण्याचे प्रयत्न होत आहेत. त्यामुळे ही निवडणूक राज्यातील नागरिकांना भेडसावणाऱ्या मूळ मुद्यांपासून भरकटली आहे. निवडणूक प्रचाराचा स्तरही पार घसरला आहे. यंदाच्या निवडणुकीचा प्रचार फारसा रंगलेला नाही. याचे मुख्य कारण म्हणजे राज्यातील ना बेरोजगारी कमी झाली, ना महागाई नियंत्रणात आली. लाडकी बहीण योजनेची रक्कम वाढविल्याने बेरोजगारी कमी होणार नाही अथवा महागाई नियंत्रणात येणार नाही ही काळ्या दगडावरची रेघ आहे. ■

> मनरेगा ग्रामीण भागातील नागरिकांना उत्पन्न आणि उदरनिर्वाहाला चालना देणारे सक्षम कल्याणकारी माध्यम राहिले आहे. परंतु रोजगाराच्या शोधात असलेल्या लोकांसाठी हा शेवटचा पर्याय असावा. गेल्या काही महिन्यांत त्याची मागणी कमी झाली पण ती कोरोना काळापूर्वीच्या स्तरापेक्षा अधिक आहे. तरतुदीत सातत्याने होणारी वाढ आणि वाढता सहभाग यावरुन आपल्या देशाची अर्थव्यवस्था ही पुरेशा प्रमाणात पर्यायी लाभदायी रोजगार निर्माण करू शकत नसल्याचे दिसून येते आणि ही बाब धोरणकर्त्यांसाठी चिंतेची आहे.

# 'मनरेगाची' चिंता

देशात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) लागू होऊन सुमारे १८ वर्षे झाली. ग्रामीण अर्थव्यवस्थेवरच्या त्याच्या सकारात्मक परिणामाचे आकलन वेळोवेळी झालेल्या अभ्यासातून निष्पन्न झाले आहे. ही योजना कोरोना काळात आणि समाजातील सर्वात वंचित घटकांसाठी अत्यंत महत्त्वाची व उपयुक्त ठरली आहे. आता 'लिबटेक'ने अलिकडेच या योजनेच्या कामगिरीबाबत मांडलेल्या विश्लेषणानंतर 'मनरेगा'वर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. यात म्हटले, योजनेनुसार रोजगारांत २०२३-२४ च्या पहिल्या सहामाहीच्या तुलनेत २०२४-२५ च्या पहिल्या सहामाहीत १६ टक्के घट झाली आहे. या योजनेत सहभागी होणाऱ्या कामगारांची संख्या ही मागील वर्षांच्या तुलनेत आठ टक्के घटली आहे. यादरम्यान नोंदणीकृत कामगारांच्या यादीतील नावे ३९ लाखांनी कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे. या अहवालात पेमेंट प्रणाली (एबीपीएस) मधील अडथळ्यांचा देखील उल्लेख केला आहे. त्यात म्हटले आहे की, एकुण कामगारांपैकी २४.७ टक्के कामगारांना 'एबीपीएस'च्या माध्यमातून मजुरी मिळत नाही. परंतु ग्रामीण विकास मंत्रालयानुसार, योजनेतील कामगारांच्या कामाचे एकूण दिवस निश्चित केलेले नसतात. कारण योजनेनुसार कामाचे दिवस ठरलेले असतात आणि चालू आर्थिक वर्षातही काम सुरू आहे. त्यांच्या मते, २००६-०७ पासून २०१३-२०१४ पर्यंत केवळ १६६० कामगार दिवस झाले तर २०१४-१५ पासून २०२४-२५ पर्यंत २९२३ कामगार दिवस झाले. यावरून दहा वर्षांत खूपच कमी रोजगार वृद्धी झाली आहे. देशातील सक्रिय ९९.३ टक्के कामगारांच्या 'आधार'ला देखील ही योजना जोडली गेली. यात अनेक लाभार्थ्यांना चांगल्या रितीने पेमेंट मिळाले आणि यात विलंबाचे प्रमाणही कमी राहिले आहे.

श्रमशक्ती सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार, जुलै ते सप्टेंबर २०२३ आणि एप्रिल ते जून २०२४ या काळात ग्रामीण भागातील हंगामी मजुरांच्या रोजंदारीतील उत्पन्नात ७.७ टक्क्यांनी वाढ झाली. त्याचे श्रेय अर्थातच सरकारच्या 'मनरेगा' सारख्या योजनांना द्यावे लागेल. २०२४-२५ या काळात किमान सरासरी वेतन दरांत ७ टक्के वाढ नोंदविली गेली. २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात या योजनेसाठी ८६ हजार कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आणि ती आतापर्यंतची सर्वाधिक तरतूद आहे. मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत ही तरतूद ४३.३ टक्के अधिक आहे. परंतु २०२३-२४ मधील वास्तविक खर्चाच्या तुलनेत ही तरतूद कमीच आहे. या आर्थिक वर्षात योजनेनुसार १.०५ लाख कोटी रुपये खर्च झाले. अर्थात योजनेला मागणी राहत असेल तर त्यानुसार तरतुदीत वाढ करता येऊ शकते.



मनरेगा ग्रामीण भागातील नागरिकांना उत्पन्न आणि उदरनिर्वाहाला चालना देणारे सक्षम कल्याणकारी माध्यम राहिले आहे. परंतु रोजगाराच्या शोधात असलेल्या लोकांसाठी हा शेवटचा पर्याय असावा, असे मानले जाते. गेल्या काही महिन्यांत त्याची मागणी कमी झाली पण आजही ती कोरोना काळापूर्वीच्या स्तरापेक्षा अधिक आहे. या योजनेसाठीच्या तरतुदीत सातत्याने होणारी वाढ आणि योजनेतील वाढता सहभाग यावरुन आपल्या देशाची अर्थव्यवस्था ही पुरेशा प्रमाणात पर्यायी लाभदायी रोजगार निर्माण करू शकत नसल्याचे दिसून येते आणि ही बाब धोरणकर्त्यांसाठी चिंतेची आहे. कृषी क्षेत्रातील मनुष्यबळाचे प्रमाण गेल्या काही वर्षांत वाढले आहे आणि त्यात घट होऊनही कोरोनापूर्वीच्या स्थितीवर (२०१८-१९मधील ४२.५ टक्के) वर आलेले नाही. वास्तविक २०१८-१९ मधील आकडा देखील अधिक होता आणि तो मनुष्यबळाच्या स्थितीचे विदारक चित्र दर्शविणारा होता. रोजगार हमी योजना ग्रामीण कुटुंबाला पुरेशा प्रमाणात सुरक्षा प्रदान करते, पण एवढ्या कुटुंबांना मनरेगासारख्या योजनांवर सतत अवलंबून का राहवे लागत आहे? यावर चर्चा करायला हवी. अशा प्रकारच्या योजनेवरचे अवलंबित्व कमी करण्यासाठी काय करायला हवे, यावरही चर्चा हवी. कमी कुशल कामगारांची गरज असेल्या उद्योगांनी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करणे हाच यावरचा तोडगा. या आधारावर कृषी क्षेत्रातून लोक बाहेर पडतील आणि अन्य क्षेत्राकडे वळतील. वास्तविक गेल्या अनेक दशकांपासून आपला देश अशा प्रकारचे प्रयत्न करू शकलेला नाही.

भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास जगातील सर्व देशांपेक्षा झपाट्याने आणि लक्षणीयरित्या होत असल्याचे ग्राह्य मानले तर त्यातुलनेत देशात रोजगारवाढ का होत नाहीये, हा कळीचा प्रश्न आहे. अनेक अर्थतज्ज्ञ भारताच्या विकासाचे वर्णन रोजगारविहीन विकास असेही करत असतात. बेरोजगारीची आकडेवारी पाहिल्यास या अर्थतज्ज्ञांची हेटाळणी करता येणार नाही. रोजगारवाढ करण्यासाठी कौशल्य विकास करणे गरजेचे आहे. आज गावाखेड्यातील मुलांना इंटरनेट तंत्रज्ञानामुळे जगाची कवाडे खुली झाली आहेत. त्यांच्या आकांक्षा वाढल्या आहेत. त्यांना मनरेगामध्ये मिळणाऱ्या रोजगाराचे आकर्षण असेल का? रोजगारहमीपेक्षा त्यांना स्थिर, शाश्वत, चांगले वेतन देणारे आकर्षक रोजगार हवे आहेत. त्यासाठीचे कौशल्य देणारे शिक्षण-प्रशिक्षण हवे आहे. पुढील २५ वर्षांसाठीची योजना आखताना केवळ अर्थव्यवस्थेचे आकारमान वाढवून चालणार नाही, तर रोजगारक्षमता आणि कौशल्य विकसन वाढणे, त्यातून बेरोजगारीचा आलेख नीचांकी पातळीवर आणणे, गरीबीचे प्रमाण घटणे आणि सामाजिक विषमता कमी होणे गरजेचे आहे. जर्मनी-जपानला आपण मागे टाकल्याने आपण विकसित झालो असे मानून चालणार नाही. भारताला आपले दरडोई उत्पन्न वाढवणे, महागाईचा दर कमी करणे, सामाजिक विषमता कमी होणे, गरीबीचे उच्चाटन, शिक्षण-कौशल्य-आरोग्य या तिन्ही क्षेत्रांमध्ये भरीव प्रगती करणे, महिलांचा आर्थिक विकासातील सहभाग आणि योगदान वाढवणे यांसह अन्य अनेक गोष्टींची गरज आहे.

या सर्व विवेचनाचा अर्थ मनरेगा योजनेच्या उद्दिष्ट व उपयुक्ततेवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचा बिलकूल नाही. देशातील गरीब व बेरोजगार कुटुंबे आपल्या उदरनिर्वाहासाठी या योजनेचा लाभ घेत आहेत. अशा कमकुवत उत्पन्न गटातील लोकांना त्यांच्याच ग्रामपंचायतीत रोजगार दिला जातो, त्यामुळे स्थलांतराचा प्रश्नही बऱ्याच अंशी टळला आहे. मनरेगाच्या माध्यमातून गावात समृद्धी निर्माण करणे शक्य आहे. पण प्रश्न आहे तो बदलत्या आर्थिक-सामाजिक वातावरणाचा आणि उंचावत चाललेल्या आशाआकांक्षांचा, गरजांचा...! त्यादृष्टीने धोरणकर्त्यांनी विचार करावा इतकेच !

'संपर्क' संस्थेतर्फे प्रकाशित एका लेखातील माहितीनुसार, गेल्या पाच वर्षांत राज्यातील एकूण ग्रामीण कुटुंबसंख्येच्या जास्तीत जास्त २० टक्के कुटुंबांनी मनरेगावर काम केले आहे. याच काळात प्रत्येक कुटुंबाला सरासरी प्रती वर्षी ३७ ते ४७ एवढेच दिवस काम मिळाले आहे. म्हणजेच एका वर्षात या कुटुंबांनी सरासरी ८,९४५ ते १२,२६७ एवढी रक्कम मजुरीतून कमावलेली आहे. ही समाधानकारक आणि पुरेशी आहे असे मानायचे का? याला 'मनरेगा'चे यश म्हणायचे का? ■

**पनवनाथ वारे, कृषी अभ्यासक**

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग** — **सोमवार, दिनांक १८ नोव्हेंबर २०२४**
कार्तिक कृ. ३, मृगशीर्ष, श्री शके १९४६, विक्रम संवत् २०८१, अनलनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू
संकष्ट चतुर्थी, चंद्रोदय रात्री : ८.१७
नक्षत्र : मृगशीर्ष, योग : सिद्ध, करण : वणिज बव
**सूर्योदय :** स.०६.२७ **सूर्यास्त :** सायं. ०५.२९ वा.
राहू काळ : दसकाळी : ७:३० ते ९:००

**दिनविशेष** ▶१७७२: थोरले माधवराव पेशवा यांचे निधन. त्यांच्या पत्नी रमाबाई सती गेल्या. ▶१८८२: अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी लिहिलेल्या संगीत सौभद्रचा पहिला प्रयोग पुण्यात पूर्णानंद नाट्य मंदिरात सादर. ▶१९०१: 'चित्रपती' व्ही. शांताराम यांचा जन्मदिन. ▶१९०४: महाराष्ट्रात घराघरांत आढळणाऱ्या ल. रा. पांगारकर संकलित भक्तिमार्गप्रदीची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. ▶१९२८: 'पंजाब केसरी' लाला लजपतराय यांचा स्मृतिदिन. ▶१९५२: सरदार विठ्ठलराव लक्ष्मणराव ठुबे यांचे निधन. महाराष्ट्रातील एक प्रमुख कॉन्ट्रॅक्टर म्हणून ते ओळखले जात. ▶१९६२: शिवाजी विद्यापीठ स्थापना. ▶१९६७: आसामातील प्रसिद्ध निसर्गकवी रघुनाथ चौधरी यांचे निधन.निसर्गातील पक्षांचे त्यांना विशेष वेड असल्याने 'विहंगकवी' म्हणून ते ओळखले जात. ▶१९७०: चंद्रावर आठ चाकाची ल्युनो खोद ही गाडी फिरू लागली. ▶१९९६: ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, स्वातंत्र्यसैनिक, भारतातील कम्युनिस्ट चळवळीचे प्रारंभापासूनचे नेते कॉमेड श्रीनिवास गणेश सरदेसाई यांचे निधन. ▶१९९९: ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक रामसिंह परदेशी यांचे निधन.

**राशीभविष्य** ▲ **मेष** : तणाव कमी होईल. ▲ **वृषभ** : कामात विलंब होईल. ▲ **मिथुन** : उत्साह कमी होईल. ▲ **कर्क** : आनंददायक दिवस. ▲ **सिंह** : गृहसौख्य लाभेल. ▲ **कन्या** : योग्य व्यक्तींशी संपर्क होईल. ▲ **तुळ** : वसुलीस अनुकूल दिवस. ▲ **वृश्चिक** : महत्वाची कामे होतील. ▲ **धनु** : जबाबदाऱ्या वाढतील. ▲ **मकर** : उलाढाल वाढेल. ▲ **कुंभ** : अपेक्षित बातमी कळेल. ▲ **मीन** : कामात प्रगती होईल.

**चिंतन** जीवनाचा अर्थ समजून घेण्यासाठी खरे शिक्षक उत्सुक असतात. खरा कलावंत एकवेळ उपाशी राहील. पण आपले कलानिर्मितीचे कार्य मध्येच अपुरे सोडणार नाही. खऱ्या शिक्षकाचे, गुरूचेही तसेच असावयास हवे. शिकवणे, विद्या देणे हे गुरूच्या बाबतीत तंत्र नसून त्याच्या जीवनाचा तो मंत्र व्हायला हवा. — जे. कृष्णमूर्ती

# माझी लडकी बहिण योजनाः महिला सक्षमीकरणासाठीचा जगातील सर्वात मोठा माईक्रो फाइनेंस उपक्रम

महाराष्ट्राची माझी लाडकी बहिण योजना ही महिलांना आर्थिक सहाय्य यापेक्षा अधिक प्रभावी आहे. राज्यभरातील महिलांच्या जीवनाला आकार देणारा हा एक परिवर्तनशील उपक्रम आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुति सरकारने सुरू केलेली ही योजना महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी मासिक पैसे देते, ज्यामुळे महिलांना उद्योजक बनण्यासाठी पाठपुरावा करण्यास आणि आर्थिक साक्षरता निर्माण करण्यास सक्षम करते. बऱ्याचदा 'मोफत' म्हणून नाकारल्या जाणाऱ्या पारंपरिक कल्याणकारी उपाययोजनांप्रमाणे, ही योजना दरमहा ₹1,500 देते-लवकरच ₹2,100 पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव आहे-ज्यामुळे महिलांना आर्थिक अडथळे दूर करण्यासाठी आणि आत्मनिर्भरता निर्माण करण्यासाठी संसाधने आणि ज्ञानाने सुसज्ज केले जाते. महाराष्ट्रातील 2.6 कोटींहून अधिक महिलांना या योजनेचा लाभ झाला असून अनेकांनी त्यांच्या उद्योजकतेच्या प्रवासाला सुरुवात केली आहे, ज्यामुळे हा जगातील सर्वात मोठा मायक्रोफायनान्स उपक्रम बनला आहे.

### आर्थिक स्वातंत्र्याचा मार्ग :

माझी लाडकी बहिण योजना सातत्यपूर्ण उत्पन्न निर्माण केले आहे ज्याचा वापर महिला लहान व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा विस्तार करण्यासाठी करू शकतात, ज्यात शिवणकाम, लहान किरकोळ दुकाने आणि अन्न प्रक्रिया यासारख्या उपक्रमांसाठी बीज भांडवल म्हणून काम केले जाते. ₹2,100 पर्यंत प्रस्तावित वाढ महाराष्ट्रातील महिला उद्योजकांना आणखी मदत करू शकते, ज्यामुळे त्यांना त्यांचे प्रयत्न स्वतंत्रपणे टिकवून ठेवण्यासाठी आर्थिक स्वायत्तता आणि आत्मविश्वास प्राप्त करण्यास मदत होईल. याबाबत पुण्यातील सुशीला शिंदे सांगतात की, "या योजनेमुळे मी माझ्या शिवणकामाच्या यंत्राची दुरुस्ती करू शकले आणि एक लहान शिवणकाम व्यवसाय सुरू करण्यासाठी यंत्र सामुग्री खरेदी करू शकले. मला आता कोणावरही अवलंबून राहण्याची गरज नाही; मी माझ्या कुटुंबासाठीही कमावते".








### आर्थिक साक्षरता आणि आत्मविश्वास वाढवणे :

या योजनेसाठी आधारशी बँक खाते जोडणे आवश्यक असल्याने महिलांमध्ये आर्थिक साक्षरतेस चालना मिळत आहे. ज्यांच्याकडे बँक खाते नव्हते अशा अनेकांना आता बचत, गुंतवणूक आणि मूलभूत हिशेब राखणे-व्यवसाय व्यवस्थापित करण्यासाठी आवश्यक कौशल्ये समजते. ग्रामीण महाराष्ट्रात, महिला त्यांच्या पैशाचे प्रभावीपणे व्यवस्थापन करण्यास शिकत आहेत, त्यांच्या मासिक वेतनाकडे आर्थिक सुरक्षा निर्माण करण्याची आणि त्यांच्या भविष्याचे नियोजन करण्याची संधी म्हणून पाहत आहेत. सातारा येथील रेखा पाटील यांनी सांगितले की, "पूर्वी माझ्याकडे बँक खाते नव्हते आणि बँकेत जाण्यास मला संकोच वाटत होता. पण आता, मी या पैशाकडे माझ्या आर्थिक स्वातंत्र्याची सुरुवात म्हणून पाहतो. मी एक लहान बचत खातेही उघडले आणि माझा खर्च अधिक चांगल्या प्रकारे हाताळायला शिकत आहे".

### स्वयंसहाय्यता गट आणि सामूहिक उद्योगांचे सक्षमीकरण :

ग्रामीण भागात, ही योजना स्वयंसहाय्यता गटांच्या (एसएचजी) निर्मितीला चालना देत आहे, जो सूक्ष्म वित्तपुरवठ्याचा एक महत्त्वाचा घटक आहे. हे गट महिलांना संसाधने एकत्रित करण्यास, सामूहिक सौदेबाजीची शक्ती वाढविण्यास आणि समवयस्कांना कर्ज देण्यास सक्षम करतात. असे गट ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वपूर्ण आहेत, ज्यामुळे महिलांना त्यांच्या समुदायांमध्ये परिवर्तन घडवून आणू शकतील असे मोठे उपक्रम हाती घेता येतात. नाशिकच्या स्वयंसहाय्यता गटाच्या सदस्या सविता गायकवाड सांगतात की, "या योजनेच्या मासिक मिळकतीचा वापर करून आम्ही सात जणी स्वयंसहाय्यता गट सुरू करण्यासाठी आणि घरी बनवलेले अल्पोपहार विकण्यासाठी एकत्र आलो आहोत. ही पहिली दिवाळी होती जेव्हा आम्ही आमच्या नफ्यातून कुटुंबासाठी काहीतरी विकत घेतले. ही योजना आम्हाला एकत्र काहीतरी तयार करण्याची शक्ती देते".

### कामगारांच्या सहभागाला आणि आर्थिक समावेशकतेला प्रोत्साहन :

माझी लाडकी बहिण योजनेतून मिळणारे सातत्यपूर्ण उत्पन्न अधिक महिलांना कामाच्या ठिकाणी प्रवेश करण्यास किंवा पुन्हा प्रवेश करण्यास सक्षम करते. या योजनेच्या आर्थिक पाठिंब्याने, महिला आता वाहतूक, कौशल्य विकास आणि शिक्षण यासारख्या आवश्यक खर्चाची भरपाई करू शकतात, ज्यामुळे त्यांना पूर्वी आर्थिक अडचणींमुळे दुर्गम असलेल्या नोकऱ्या मिळू शकतात. कोल्हापूरच्या गीता मोरे या तरुणीने आपले आभार व्यक्त केलेः "या योजनेमुळे मला ब्युटीशियन अभ्यासक्रमासाठी पैसे देण्याचे स्वातंत्र्य मिळाले. आता, माझ्याकडे माझा स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी कौशल्ये आणि निधी आहे-यामुळे मला एक नवीन उद्देश मिळाला आहे".

महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याला चालना देऊन माझी लाडकी बहिण योजना स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना देते. महिला छोट्या व्यवसायात गुंतवणूक करतात आणि आर्थिक कौशल्ये प्राप्त करतात, त्यामुळे गावे आणि तालुक्यांच्या आर्थिक सुधारणेच्या भागावर सकारात्मक परिणाम होतो, ज्यामुळे स्थानिक जीडीपीमध्ये योगदान मिळते. महिला उद्योजकांचे हे वाढते जाळे महाराष्ट्रातील ग्रामीण आणि शहरी समुदायांच्या आर्थिक वाढीसाठी एक शक्तिशाली चालक आहे. महिलांच्या आर्थिक आकांक्षांमध्ये सांस्कृतिक बदल घडवून आणणे आर्थिक पाठिंब्याच्या पलीकडे, ही योजना महिलांना स्वतःला आर्थिक योगदानकर्ते म्हणून पाहण्याची प्रेरणा देत आहे. त्यांच्या मासिक उत्पन्नाची क्षमता ओळखून, अनेकजण उद्योजकीय स्वप्नांचा पाठपुरावा करण्यासाठी प्रेरित होतात, ज्यामुळे आर्थिक लैंगिक विषमता दूर होण्यास मदत होते. माझी लाडकी बहिण योजना हा महाराष्ट्रातील महिलांना आर्थिक सहाय्य, साक्षरता आणि राज्याच्या वाढत्या जीडीपीमध्ये योगदान देण्यासाठी त्यांना सक्षम करून, आर्थिक लिंगभेद दूर करण्याचा एक अग्रगण्य उपक्रम आहे. स्वातंत्र्य आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन ही योजना महाराष्ट्रातील महिलांच्या आर्थिकदृष्ट्या सक्षम भविष्यासाठी भक्कम पाया रचत आहे. ■

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## मार्केटयार्डमध्ये सोलापूर जिल्ह्यातून दाखल

# सिडलेस कलिंगडाची आवक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** मार्केट यार्डातील फळबाजारात सोलापूर जिल्ह्यातून सिडलेस कलिंगडाची आवक सुरू झाली आहे. हे कलिंगड रंगाला हिरवे असून त्यावर पांढरे पट्टे आहेत. हे कलिंगड आकारानेही मोठे आहे. त्यात बियांचे प्रमाण कमी असून आतील भाग लालभडक आहेत. चवीला अधिक गोड असलेल्या या कलिंगडाला ग्राहकांची पसंती आहे. मात्र, सद्य:स्थितीत आवक कमी असल्याने दरही अधिक आहेत. आवक वाढल्यानंतर दर कमी होणार आहेत. नोव्हेंबर महिन्यांत सुरू होत असलेला कलिंगडाचा हंगाम सुरू झाला आहे. सध्या आवक कमी असली, तरी येत्या काळात आवक वाढत जावून ती उन्हाळ्यात मे महिन्यांपर्यंत कायम राहते. आवक कमी आणि मागणी अधिक असल्याने कलिंगडाला अधिकचा दर मिळत आहे.मात्र, आवक वाढल्यानंतर दरातही घट होईल, अशी माहिती व्यापारी पांडुरंग सुपेकर यांनी दिली.

सिडलेस कलिंगडाला घाऊक बाजारात प्रतिकिलोला १८ ते ३० रूपये दर मिळत आहे. तर इतर प्रकारच्या कलिंगडाला १५ ते २५ रूपये दर मिळत आहे. आणखी काही दिवस कलिंगडाची आवक वाढणार नसल्याने दर स्थिर राहणार असल्याचा अंदाजही सुपेकर यांनी वर्तविला आहे.

विविध प्रकारच्या कलिंगडाचा हंगाम सुमारे नोव्हेंबरमध्ये सुरू होतो. त्यानंतर डिसेंबरपासून आवक वाढण्यास सुरूवात होते. फेब्रुवारीमध्ये रोजची आवक ४० ते ५० टनापर्यंत होते. मार्च, एप्रिल, मे या तीन महिन्यांत कलिंगडाला ग्राहकांकडून मोठी मागणी असते. या काळात मात्र किलंगडाचे घाऊक बाजारातील प्रतिकिलोचे दर ८ ते २० रूपयापर्यंत असतात. बाजारात सिंबा, सोनिया प्लस, जन्नत, मन्नत, मेलोडी, शुगर क्विन, सिडलेस आदी प्रकारचे कलिंगड विक्रीसाठी दाखल होत असतात. पुण्यातून गोवा, अहमदाबाद, दिल्ली बेंगलुरू आदी ठिकाणी कलिंगड पाठविले जाते.

### आवक कमी दर जास्त

**पुणे, नगर, सातारा, सोलापूर जिल्ह्यांतून कलिंगडाची आवक होत असते. सद्य:स्थितीत सिडलेस कलिंगडाची दररोज ३ ते ४ टनाची आवक होत आहे. इतर प्रकारच्या कलिंगडाचीही ३ ते ५ टनाची आवक होत आहे. ही आवक कमी असल्याने दर अधिक आहेत.**

## महिला सुरक्षेसाठी २४ तास हेल्पलाईन सुरु करणार : गणेश भोकरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुलींच्या, महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आहे. शहरात गुन्हेगारी वाढलेली आहे. कोयता गँगची दहशत, दिवसाढवळ्या होणाऱ्या हत्या यामुळे पुण्यात भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे शहराला भयमुक्त व सुरक्षित करण्यासाठी मनसैनिकांची फौज काम करते आहे. येत्या काळात महिला सुरक्षेसाठी २४ तास चालणारी हेल्पलाईन सुरु करणार आहे, असे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार गणेश भोकरे यांनी सांगितले.

गणेश भोकरे गेल्या अनेक वर्षांपासून महिलांच्या सुरक्षेचा लढा देत आहेत. त्यांची छेड काढणाऱ्यांना, अत्याचार करणाऱ्यांना कठोर शासन करण्याचे काम ते करत आहेत. अनेक आंदोलनाच्या माध्यमातून त्यांनी महिलांना सुरक्षित वातावरण मिळण्यासाठी पोलीस प्रशासनाला निवेदने दिली आहेत. युवकांचे प्रश्न मांडण्याचे काम त्यांनी केले. सोशल मीडियाच्या माध्यामातून, तसेच त्यांच्याबरोबर हजारो युवक जोडले गेले आहेत. युवकांचे प्रतिनिधित्व करणारे भोकरे यांची युवक, महिला वर्गासाठी काम करण्याची तळमळ युवकांना भावत आहे



"महिलांशी गैरवर्तन करणाऱ्यांना आजवर अनेकदा चोप दिला आहे. पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. यापुढे महिलांना अधिक सुरक्षित वातावरण निर्माण व्हावे, संकटकाळात त्यांना त्वरित मदत मिळावी, यासाठी ही हेल्पलाईन २४ तास कार्यरत राहील. हजारो मनसैनिक यासोबत जोडले जातील. त्यामुळे शहराच्या सर्व भागात त्यांना त्वरित मदत मिळेल आणि त्यांच्यावर होणारा अत्याचार रोखून गुन्हेगारांना शिक्षाही देता येईल." - गणेश भोकरे

**» Selected**

## दहावी एसएससी बोर्ड परीक्षेबाबत रोटरीच्या वतीने मोफत मार्गदर्शन



**पुणे :** एसएससी म्हणजेच दहावीच्या बोर्ड परीक्षेला काही दिवसच उरले आहेत. या अनुषंगाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी रोटरी क्लब युवा आणि स्कॉलरमाइंड यांच्या संयुक्त विद्यमाने "१० वी सक्सेस मंत्रा" मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. यशवंतराव चव्हाण सभागृह कोथरूड येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी रोटरी क्लब युवाच्या अध्यक्ष दीपा बडवे, सचिव अर्चिता मडके, प्रकल्प समन्वयक श्रीकांत जोशी, एसएससी बोर्ड सदस्य मार्गदर्शक एसएससी बोर्ड सदस्य डॉ.सुलभा विधाते विषय शास्त्र, एसएससी बोर्ड सदस्य मार्गदर्शक जयश्री अत्रे विषय गणित, मार्गदर्शक मंजुषा वैद्य विषय आयएमपी स्टडी टेक्निक, आदी मान्यवरांच्या बरोबरच (१२००) बाराशेहून अधिक विद्यार्थी विद्यार्थिनी व पालक उपस्थित होते.

## पीआयएमएसईमध्ये ग्रंथालय कार्यशाळेचे आयोजन

**पुणे :** आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांसाठी शिक्षणात ऑनलाइन साधनांचा वापर" या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना ऑनलाइन संसाधने, डिजिटल साधने व आधुनिक ग्रंथालय तंत्रज्ञानाचा वापर अधिक प्रभावीपणे करण्याचे कौशल्य प्रदान करणे हे होते. प्रमुख वक्ते प्रा. (डॉ.) मीनल केदार ओक, ग्रंथपाल, एमईएस मॅनेजमेंट अँड करिअर कोर्सेस यांनी ई-संसाधनांवरील सखोल माहिती आणि प्रत्यक्ष उदाहरणे सादर केली. त्यांचे संवादात्मक सत्र विद्यार्थ्यांसाठी अत्यंत माहितीपूर्ण आणि प्रेरणादायी ठरले. कार्यक्रमात पीआयएमएसईच्या विविध अभ्यासक्रमांतील ५० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्साही सहभाग घेतला. डॉ. पोरिनिता बॅनर्जी, प्रभारी संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ग्रंथालय समितीच्या समन्वयाने हे सत्र यशस्वीपणे पार पडले.

## 'काव्यसुमने' संग्रह प्रकाशन



**पुणे :** आपल्या मातृभाषेची गोडी अमृतासमान असते.जगात कुठेही गेलो आणि कितीही भाषा शिकलो तरी मातृभाषेचा लळा जिव्हाळा कधी संपत नाही आणि जेव्हा आपल्या या प्रिय भाषेत काव्यनिर्मिती होते तेव्हा आपल्या मातृभाषेचा खरा सन्मान होतो', अशा शब्दात प्रसिध्द कवयित्री, साहित्य अकादमी पारितोषिक प्राप्त लेखिका डॉ मंजुषा कुलकर्णी यांनी आपले काव्य आणि भाषाविषयक विचार व्यक्त केले. कालिंदी कुलकर्णी यांच्या "काव्यसुमने" या कवितासंग्रह प्रकाशन समारंभात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. डॉ. मंजुषा कुलकर्णी यांचे हस्ते 'काव्यसुमने' संग्रहाचे प्रकाशन झाले. व्यासपीठावर ज्येष्ठ कवी वसंत बिवरे, कवयित्री अमृता खाकुर्डीकर, लेखक देवा झिंजाड उपस्थित होते.

**राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा**

## बदल्यांचे गुऱ्हाळ आता बंद होणार

**पुणे :** बदली प्रक्रियेत एखाद्या शिक्षकाने चुकीची माहिती भरून शासनाची दिशाभूल केल्यास त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येणार असल्याचे राज्याचे कार्यासन अधिकारी नितीन पवार यांनी स्पष्ट केले आहे. राज्यातील शिक्षकांचे दरवर्षी लांबणारे बदल्यांचे गुऱ्हाळ आता बंद होणार आहे. यापुढे एकाच वेळापत्रकानुसार संपूर्ण राज्यात जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हा अंतर्गत बदल्या होणार असून ३१ मेपर्यंत बदली प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे.

पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांसाठीचे सुधारित धोरण १८ जून २०२४ च्या शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार तसेच यापूर्वी शासनाने वेळोवेळी तयार केलेल्या धोरणानुसार शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांची प्रक्रिया ऑनलाइन पोर्टलद्वारे राबविण्यात येते. परंतु, नागपूर उच्च न्यायालयात दाखल अवमान याचिकेवरील २५ ऑक्टोबरच्या सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने बदल्यांसाठीचे ऑनलाइन पोर्टल हे संपूर्ण बदली प्रक्रियेदरम्यान संपूर्ण राज्यासाठी दिलेल्या वेळापत्रकानुसारच कार्यान्वित असावे असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार यापुढे दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या जिल्हांतर्गत बदली प्रक्रियेसाठी सर्वसाधारणपणे संचमान्यतेची प्रक्रिया पूर्ण होऊन शाळांमधील शिक्षकांची संख्या निश्चित झाल्यानंतर, संबंधित जिल्हा परिषदेने ऑनलाइन बदली प्रक्रियेसाठी आवश्यक माहितीची पूर्वतयारी करण्याची प्रक्रिया सुरू करावी.

### असे आहे वेळापत्रक...

शिक्षकांच्या याद्या प्रसिद्ध करणे - १ जानेवारी ते २८ फेब्रुवारी
उपलब्ध रिक्त पदे निश्चित करणे - १ ते ३१ मार्च
बदलीसाठी आवश्यक सर्व डाटा जिल्हा परिषदेने तयार करून तो डाटा विन्सीस कंपनीस उपलब्ध करून देणे - १ ते २० एप्रिल
समानीकरणांतर्गत रिक्त पदे निश्चित करणे - २१ ते २७ एप्रिल
शिक्षकांसाठी रिक्त जागा घोषित करणे, त्यांना पसंतीक्रम भरण्यास वेळ देणे व त्यांच्या बदल्या करणे - २८ एप्रिल ते ९ मे
बदली अधिकार प्राप्त शिक्षकांसाठी रिक्त जागा घोषित करणे, त्यांना पसंतीक्रम भरण्यास वेळ देणे व त्यांच्या बदल्या करणे - १० ते २१ मे
विस्थापीत शिक्षकांसाठी रिक्त जागा घोषित करणे, त्यांना पसंतीक्रम भरण्यास वेळ देणे व त्यांच्या बदल्या करणे - २२ ते २७ मे
अवघड क्षेत्रातील रिक्त जागा भरणे २८ मे ते ३१ मे

## स्वागत..

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पुणे :** केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांची पुणे जिल्ह्यात भाजपा उमेदवारांच्या प्रचारार्थ दौऱ्यात उपस्थिती होती. याप्रसंगी कोहिनूर ग्रुपचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी शहराध्यक्ष धीरज घाटे उपस्थित होते

## डेक्कन लिटरेचर फेस्टिव्हलमध्ये दुरजॉय दत्ता यांचा तरुणाईसोबत संवाद

# संख्येपेक्षा नात्याची गुणवत्ता महत्त्वाची

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'मी तरुणाईचा लेखक आहे. तरुणाईशी जोडलेला आहे. तरुणाईविषयी लिहिणारा आहे. मात्र, संख्येपेक्षा मानवी नात्यांची गुणवत्ता महत्त्वाची असते, यावर माझा ठाम विश्वास आहे', असे मत लोकप्रिय युवा लेखक दुरजॉय दत्ता यांनी संवाद साधताना व्यक्त केले. दकनी अदब फाउंडेशन आयोजित डेक्कन लिटरेचर फेस्टिव्हल अंतर्गत रविवारचे दुसरे सत्र, तरुणाईच्या उत्स्फूर्त सहभागाने रंगतदार झाले. दुरजॉय दत्ता यांची तरुणाईमधील प्रचंड लोकप्रियता या सत्रादरम्यान रसिकांनी अनुभवली. लेखिका सुधा मेनन यांनी दत्ता यांच्याशी संवाद साधला. महोत्सव समन्वयक मोनिका सिंग यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी महोत्सवाचे आयोजक जयराम कुलकर्णी आणि मनोज ठाकूर हे देखील उपस्थित होते.

"वाढत्या वयाने काहीशी परिपक्वता आली असावी', असे मिष्किलपणे म्हणत दुरजॉय दत्ता यांनी मानवी नातेसंबंधांवर भाष्य केले. "सध्याची पिढी इन्स्टाग्रामवरच्या रील्ससारखे जगते. काही सेकंदांचा त्यांचा अटेंन्टिव्हनेस असतो. अशा वेळी लेखक म्हणून तरुणाईला दोनशे पानांपर्यंत टिकवून ठेवणे, हे मोठे आव्हान आहे. काही सेकंदाचे रील आणि काही पानांचा मजकूर, यात लक्षवेधक काय ठरेल, हा आजच्या लेखकांपुढचा यक्षप्रश्न आहे.

- युवा लेखक, दुरजॉय दत्ता

## मेथी तेजीत, फळभाज्यांचे दर स्थिर

**पुणे :** मार्केट यार्डातील घाऊक बाजारात मागणीच्या तुलनेत फळभाज्यांची आवक चांगली होत आहे. बहुतांश फळभाज्यांचे दर आहेत. गेल्या आठवड्याच्या तुलनेत कोथिंबिरेच्या दरात घट झाली असून, मेथीचे दर तेजीत असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून मिळून ९० ते १०० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून ८ ते १० टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून प्रत्येकी ४ ते ५ टेम्पो कोबी, कर्नाटकातून २ टेम्पो पावटा, कर्नाटक आणि गुजरातमधून २ ते ३ टेम्पो घेवडा, आंध्र प्रदेश, तमिळनाडूतून मिळून ३ ते ४ टेम्पो शेवगा, मध्य प्रदेशातील इंदूर भागातून ६ ते ७ टेम्पो गाजर, गुजरातमधून ३ टेम्पो भुईमूग शेंग, मध्य प्रदेशातून ५ ते ६ टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

## सिग्रेट शाळेत विद्यार्थ्यांनी लुटला मनमुराद आनंद...

# कौशल्य मेळा व धमाल जत्रा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिग्रेट पब्लिक स्कूल न्यू मध्ये बालदिनी 'कौशल्य मेळा - धमाल जत्रा' आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेच्या प्राचार्या डॉ. अजिता परबत यांच्या हस्ते करण्यात आले, तर प्रमुख पाहुणे ऋषिराज सावंत, विश्वस्त जे एस पी एम, टि एस एस एम यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाला अधिक रंगत आली. कार्यक्रमाला कॅम्पस डायरेक्टर डॉ. शशिकांत थिटे यांचा पाठिंबा लाभला. कार्यक्रमाला कॅम्पस कोऑर्डिनेटर विकास जाधव उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी पॉक्सो कायद्यावर आधारित नाटिका सादर करून एक महत्त्वपूर्ण सामाजिक संदेश दिला. या नाटिकेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये लैंगिक शोषणाच्या मुद्द्यावर जागरूकता निर्माण करणे हा होता. यावेळी मुख्याध्यापिका सीमा यादव, समन्वयिका अनुजा जाधव, अनिता कोरे, उल्का नाईक, प्रियांका काटे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुषमा जाधव यांनी केले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि मेहनतीला मान्यता देणारा हा कार्यक्रम पालक व विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरला.



### विद्यार्थ्यांची जत्रेत धमाल ...

आर्थिक व्यवहाराचे तसेच उद्योग व्यवसायाचे प्रशिक्षण मिळावे यासाठी सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी फूड स्टॉल्स, गेम स्टॉल्स आणि स्व हस्ते निर्मित वस्तूचे स्टॉल्स उभारले होते. विद्यार्थ्यांनी कौशल मेळ्यात चविष्ट खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, खेळांचे स्टॉल्स च्या माध्यमातून धमाल जत्रेला रंगतदार बनवले. पूर्व प्राथमिक विभागातील चिमुकल्यांसाठी टॉय बाईकस आणि टॉय कार प्रमुख आकर्षण होते. सर्व विद्यार्थ्यांनी या स्टॉल्सचा मनमुराद आनंद लुटला.

ही नाटिका पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संवाद वाढवणारी व सुरक्षिततेविषयी सजगता निर्माण करणारी ठरली. यामुळे शाळा हा फक्त शिक्षणाचा नव्हे तर सामाजिक जबाबदारी स्वीकारणारा आणि भविष्य घडवणारा मंच असल्याचे दाखवून दिले. शाळेतील ६० विद्यार्थ्यांनी खास बाल दिनानिमित्त ही नाटिका सादर केली.

## रेल्वे प्रशासनाबद्दल साहित्यप्रेमींमध्ये नाराजी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सरहद, पुणे आयोजित ९८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यंदा दिल्लीत होत आहे. फेब्रुवारी २०२५ मध्ये होणाऱ्या या संमेलनासाठी पुणे ते दिल्ली विशेष रेल्वे मिळावी, यासाठी रेल्वे मंत्रालयाकडे प्रयत्न सुरू आहेत. केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही यासाठी विशेष प्रयत्न केले. मात्र, पुणे ते दिल्ली सवलतीच्या दरात विशेष रेल्वे देण्यास रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या कार्यालयाने नकार दिल्याचे संयोजकांना कळविण्यात आले. त्यामुळे साहित्यप्रेमींनी नाराजी व्यक्त केली आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्याच्या पार्श्वभूमीवर दिल्लीचे संमेलन दिमाखात व्हावे, असे संयोजकांकडून प्रयत्न सुरू आहेत. २०१५ साली तत्कालीन रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांनी दोन रेल्वे यासाठी मंजूर केल्या होत्या. म्हणूनच ७० वर्षांनंतर दिल्लीत होणाऱ्या संमेलनासाठी केंद्र सरकारने रेल्वे मंजूर करण्यासाठी सरहद संस्थेकडून प्रयत्न सुरू होते. मात्र, रेल्वेमंत्र्यांनी नकार दिल्याने संयोजकांसह साहित्यप्रेमींची निराशा झाली आहे.

## धायरी भागात दोन गटात हाणामारी


**धायरी :** वैमनस्यातून दोन गटात हाणामारी झाल्याची घटना सिंहगड रस्त्यावरील धायरी भागात घडली. याप्रकरणी परस्पर विरोधी फिर्यादीवरुन दोन गटांविरुद्ध सिंहगड रस्ता (नांदेड सिटी) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत स्वप्नील संतोष खिरीड (वय २०, रा. लायगुडे वस्ती, अंबाईदरा, धायरी) याने सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, अविनाश शिळीमकर, कुणाल जाधव, आदित्य म्हस्के, अथर्व दोडके, अथर्व शिंदे यांच्यासह साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक जाधव आणि उपनिरीक्षक बुनगे तपास करत आहेत

## श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती मंदिरात दीपोत्सव व तुळशी विवाह

# पंचपक्वांन्नाच्या नैवेद्याचे संस्थांना दान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती' येथे त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त दीपोत्सव, तुळशी विवाह आणि ५६ भोग चा नैवेद्य करण्यात आला. यावेळी विविध पंच पक्वान आणि फळाची आरास बाप्पा समोर साकारण्यात आली होती. श्रीमंत भाऊसाहेब रंगारी ट्रस्टने नेहमी प्रमाणे सामाजिक भान राखून बाप्पाला दाखविण्यात येणाऱ्या नैवद्यातील सर्व मिठाई, फराळ आणि फळे सामाजिक संस्थांना देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार दत्तवाडी येथील देवतारू आश्रम आणि मुळशी खोऱ्यातील कातकर वस्ती वरील ३०० विद्यार्थ्याना शिक्षण देणाऱ्या आणि दररोज ९० मुलांना जेवण पुरविणाऱ्या पौड येथील 'डोनेट ऐड' संस्था आणि भाजे येथील बालग्राम केंद्र यासर्वांना हे सर्व नैवेद्यचे पदार्थ देण्यात येणार आहे.



### दिव्यांच्या सजावटीने बाप्पाचे मंदिर उजळले

त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती मंदिरात दिवे लावून फुलांनी सुंदर सजावट करण्यात आली होती. काचेच्या ग्लासमधील दिव्यांनी संपूर्ण मंदीर उजळून निघाले होते. यावेळी भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. ट्रस्टचे सर्व पदाधिकारीही यावेळी उपस्थित होते.

#रा

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे पिंपरी चिंचवडवासियांना आश्वासन

# रेडझोन, निळ्या पूररेषेतील बांधकामांचा प्रश्न मार्गी लागणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी:** पिंपरी-चिंचवड शहरातील शास्तीकर, साडेबारा टक्के परतावा यांसारखे अवघड प्रश्न आपण सोडवले. काळजी करू नका आमदार महेश लांडगे यांनी रेड झोन आणि निळ्या पुररेषेतील बांधकामे हा प्रश्न बराच पुढे नेला आहे. येत्या काळात रेड झोन आणि निळ्या पूररेषेतील बांधकामांचा प्रश्न देखील सोडवला जाणार असल्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. दरम्यान, महाराष्ट्रातील अनेक उद्योग गुजरातला पळवले जात असल्याचे 'फेक नेरेटिव्ह' शरद पवार आणि त्यांची कन्या सुप्रिया सुळे करत असून 'फेक नेरेटिव्ह'ची यांच्याकडे फॅक्टरी आहे, अशा शब्दांत फडणवीस यांनी टीका केली.

महायुतीचे भोसरी विधानसभा मतदारसंघातील अधिकृत उमेदवार महेश लांडगे यांच्या प्रचारार्थ चिखली म्हेत्रे वस्ती येथे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर आमदार अमित गोरखे, शिवसेनेचे उपनेते इरफान सय्यद , समन्वयक विजय फुगे, माजी महापौर मंगला कदम, राहुल जाधव, नितीन काळजे, माजी उपमहापौर शरद बोऱ्हाडे, माजी स्थायी समिती सभापती विलास मडिगेरी, संतोष लोंढे, राष्ट्रवादीच्या महिला शहराध्यक्ष कविता आल्हाट आदी उपस्थित होते.

" हाथी चले बाजार कुत्ते भोंके हजार" ...

देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी




गेल्या दहा वर्षात महेश लांडगे यांनी केलेल्या कामांचे कौतुक केले. या मतदारसंघात निवडणुकीदरम्यान विरोधकांकडून होत असलेल्या आरोपांचा फडणवीस यांनी चांगला समाचार घेतला ते म्हणाले शब्दशः अर्थ घेऊ नका पण एक म्हण आहे, " हाथी चले बाजार कुत्ते भोंके हजार" असाच काहीसा प्रकार भोसरी विधानसभा मतदारसंघात सुरू आहे. महाराष्ट्रातील संत महात्म्यांना देखील आरोपांना सामोरे जावे लागले आपण तर "किस झाड की पत्ती" असे म्हणत त्यांनी महेश लांडगे यांचे कौतुक केले. आपण आरोप प्रत्यारोपांना उत्तर न देता तुमचे काम सांगितले. ही खूप मोठी गोष्ट आहे असे फडणवीस म्हणाले.काम करणाऱ्या माणसाला बदनाम केले जाते पण तुम्ही चिंता करू नका भोसरीतील नागरिकांचा तुमच्यावर विश्वास आहे. तुमचा कोणी 'बाल ही बाका करू शकत नाही.' पिंपरी चिंचवडचे चित्र २०१४ नंतर बदललेले सर्वांनीच पाहिले आहे. मेट्रो, फ्लायओवर, इतर इन्फ्रास्ट्रक्चर या गोष्टी २०१४ नंतर वेगाने आपण तयार केल्या.

**कंपन्या बाहेर गेल्या हा 'फेक नॅरेटिव्ह'...**

महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला पळवले जात असल्याचा आरोप वारंवार शरद पवार आणि त्यांची कन्या सुप्रिया सुळे यांच्याकडून केला जात आहे. मात्र हा आरोप धादांत खोटा असून हे दोघे 'फेक नेरेटिव्ह'ची फॅक्टरी आहे. गेल्या काही काळात असेही सांगितले गेले की हिंजवडीतील ३६ कंपन्या बाहेर गेल्या याची मी माहिती घेतली त्यानंतर असे दिसून आले महाविकास आघाडीच्या काळात १९ कंपन्यांनी आपले नवीन कॅम्पस सुरू केल .त्यांनी फक्त आपला विस्तार दुसरीकडे केला. पण तो विस्तार महाराष्ट्राच्या बाहेर केला नाही. असेही ते म्हणाले.

> जागे व्हा, छत्रपतींचे नाव घ्या. हे धर्म युद्ध आहे. एक रहेंगे तो सेफ रहेंगे एवढेच लक्षात ठेवा. आमदार महेश लांडगे यांना भरघोस मतांनी विजयी करा. महायुतीचे सरकार आणण्यासाठी प्रत्येक उमेदवार निवडून येणे महत्त्वाचे आहे. महेश लांडगे यांना साथ पिंपरी-चिंचवडमधील उर्वरित सर्व प्रश्न मार्गी लावतो.
>
> **- देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.**

> आमच्यावर कितीही आरोप होऊ दे. परंतु, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप होतात. तेव्हा हळहळ वाटते. फडणवीस यांनी कधीही कुठल्या पक्षाचा, जातीचा, धर्माचा म्हणून मी घेऊन गेलेल्या व्यक्तीचे काम केले नाही. यांचे काम करतो हा आपल्याला मतदान करणार आहे का हे देखील विचारले नाही? माझ्या माय माऊलींसाठी पोलीस आयुक्तालय केले. त्याचा फायदा कोणाला होईल असा प्रश्न विचारला नाही. म्हणूनच भोसरी विधानसभेत आरोप होत असताना त्याबद्दल प्रत्युत्तर मी दिले नाही. कारण, माझ्यासमोर फडणवीस यांचा आदर्श आहे मी माझे काम करत राहणार आहे.
>
> **- महेश लांडगे, उमेदवार भोसरी, भाजप, महायुती.**



## भोसरी मतदारसंघातील १७ मतदान केंद्रात बदल

**पिंपरी :** भोसरी विधानसभा मतदारसंघातील १७ मतदान केंद्रांच्या ठिकाणांमध्ये बदल केला आहे. त्यात बोऱ्हाडेवाडी मोशीतील चार, चिखलीतील तीन, वडमुखवाडी चऱ्होली पाच आणि दिघीतील पाच या मतदान केंद्रांचा समावेश आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी रेवणनाथ लबडे यांनी दिली.

मतदारांच्या सोयीसाठी जुन्या केंद्रांच्या ठिकाणी बदललेल्या ठिकाणांबाबत दिशादर्शक फलक लावण्यात येणार आहेत. त्या-त्या परिसरातील मतदारांना मतदान केंद्राचे ठिकाण बदलल्याबाबत लेखी स्वरुपात कळविले आहे. स्वीप टीमद्वारे याबाबत जनजागृती करण्यात येत आहे. मतदारांनी बदललेल्या मतदान केंद्रांनुसार योग्य ठिकाणी जाऊन मतदान करावे, असे आवाहनही लबडे यांनी केले आहे.

## भयमुक्त निवडणुकीसाठी १०१ गुन्हेगार हद्दपार



**पिंपरी :** राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. प्रचार शिगेला पोहोचला आहे. अनेक उमेदवारांनी ही निवडणूक करो या मरो अशी घेतली आहे. त्यामुळे निवडणुकीत साम, दाम, दंड, भेद अशा सर्व अस्त्रांचा वापर होण्याची शक्यता असते. दरम्यान निवडणूक प्रक्रिया शांततेत, सुरळीत आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी पोलिसांनी विशेष खबरदारी घेतली आहे. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अखत्यारीत पिंपरी, चिंचवड, भोसरी हे तीन मतदारसंघ तर खेड, खडकवासला, मुळशी, मावळ या मतदारसंघाचा काही भाग येतो. सर्वच पोलीस ठाण्यांच्या हद्दीत प्रतिबंधात्मक कारवाया केल्या जात आहेत.

दरम्यान, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी मावळ विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या तळेगाव दाभाडे, तळेगाव एमआयडीसी, शिरगाव आणि देहूरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगारांची कुंडली काढण्याचे काम गुंडा विरोधी पथकाकडे सोपविले. गुंडा विरोधी पथकाने चार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शरीराविरुद्ध गुन्हे दाखल असलेल्या १०१ गुन्हेगारांची कुंडली काढली. त्यानुसार या गुन्हेगारांना १५ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर आणि २३ नोव्हेंबर रोजी सकाळी सहा वाजल्यापासून २४ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री बारा वाजेपर्यंत मावळ तालुक्यातून हद्दपार करण्यात आले आहे. मतदानासाठी येणाऱ्या नागरिकांना धमकावणे तसेच आपल्या दहशतीचा मतदान प्रक्रियेवर प्रभाव पाडणे, असे संभाव्य प्रकार टाळण्यासाठी पिंपरी चिंचवड पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

थेटसामना


# चिंचवडचा सर्वांगिण विकास करणार- भाऊसाहेब भोईर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड या शहराला उद्योगनगरी अशी ओळख आहे. ती सर्वश्रुत आहे. परंतु नव्याने सांस्कृतिक नगरी म्हणून पिंपरी चिंचवड शहर ओळखले जाऊ लागले. चिंचवडचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचा विश्वास चिंचवड विधानसभेचे अपक्ष उमेदवार भाऊसाहेब भोईर यांनी व्यक्त केला.

भाऊसाहेब भोईर यांची उद्योग नगर, दळवी नगर, भोईर नगर, इंदिरा नगर, प्रेमलोक पार्क याठिकाणी पदयात्रा झाली. या वेळी नागरिकांशी संवाद साधताना त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

भाऊसाहेब भोईर म्हणाले, "मी गेली २५ वर्ष राजकारण आणि समाजकारणात आहे. तसेच



सांस्कृतिक क्षेत्रातील कार्य संपूर्ण देशात माहिती आहे. साहित्य, कला, क्रीडा क्षेत्रातील भरीव कार्य देखील सर्वश्रुत आहे. शिवाय उद्योग नगर, दळवी नगर, भोईर नगर, इंदिरा नगर, या भागात नागरिकांची मोठी फळी उभी आहे. आकुर्डी ते चिंचवड असा रस्ता बांधला आहे. तो आजतागायत सुस्थितीत आहे. 'एमआयडीसी'कडून ५२ गुंठे जमीन मिळवून वाल्हेकरवाडी, निगडी प्राधिकरण, रावेत, मामुर्डी परिसरासाठी मोठा जलकुंभ बांधला. त्यामुळे या भागाला पुरेसा पाणी पुरवठा होत आहे. भौतिक विकासाबरोबरच शहराची पारंपारिक संस्कृती, म्हणजे आपल्या शहराचे लोकवैभव जतन करण्यासाठी व तरुण पिढीला कला, क्रीडा आणि संस्कृतीची गोडी लावण्यासाठी नाट्य परिषदेची शाखा सुरू केली. अनेक कलावंत घडविले. दिवंगत प्रा. रामकृष्ण मोरे सरांच्या व थोरामोठ्यांच्या विकासाभिमुख मार्गानेच मी मार्गक्रमण करत आहे. त्यांनी दाखविलेल्या मार्गानेच लोककल्याणाचा लढा लढत आहे."असेही ते म्हणाले.

# राज्यात महायुतीचे सरकार विराजणार- खासदार बारणे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महायुतीच्या माध्यमातून राज्यात अनेक मोठी कामे झाली आहेत. राज्यात मतदारांचा कल महायुतीच्या बाजूने आहे. २३ नोव्हेंबर नंतर राज्यात महायुतीचे सरकार बहुमताने विराजमान होईल असा विश्वास खासदार व शिवसेनेचे स्टार प्रचारक श्रीरंग बारणे यांनी येथे केले. अण्णा बनसोडे यांच्या प्रचारात मी सहभागी आहे. त्यांना मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. समोरच्या उमेदवाराचा परिचय सुद्धा मतदारांना नाही त्यामुळे बनसोडे यांचा विजय निश्चित आहे असेही खासदार बारणे म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे उमेदवार आमदार अण्णा



बनसोडे यांच्या प्रचारार्थ मोहन नगर, महात्मा फुले नगर, काळभोर नगर भागात प्रचारफेरी काढण्यात आली. यावेळी मतदारांशी संवाद साधताना खासदार श्रीरंग आप्पा बारणे बोलत होते.

यावेळी आरपीआयच्या महिला प्रदेशाध्यक्ष चंद्रकांता सोनकांबळे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, शिवसेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या माजी महिला शहराध्यक्ष वैशाली काळभोर, ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर कांबळे, माजी उपमहापौर राजू मिसाळ, माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे, राजू दुर्गे, शितल शिंदे, सतीश दरेकर, शैलेश मोरे, आरपीआयचे शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, भाजप शहर उपाध्यक्ष गणेश लंगोटे, पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेचे उपाध्यक्ष संजय जगताप, युवक, युवती व महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या. या प्रचार फेरीला मतदारांचा उदंड प्रतिसाद लाभला.

# काँग्रेसने संविधान तोडण्याचे पाप केले- गडकरींचे टीकास्त्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** काँग्रेसने 'गरिबी हटाव'च्या घोषणा दिल्या. मात्र, शेतकरी, सामान्य वर्गाची गरिबी न हटवता जातिवाद, सांप्रदायिक वाद देशात निर्माण केला. संविधान बदलण्याच्या खोट्या बतावण्या करून, संविधान तोडण्याचे पाप काँग्रेसनेच केले. आता तेच आमच्यावर उलट आरोप करत आहेत, अशी टीका केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी वाकड येथे केली.

चिंचवड विधानसभेचे महायुतीचे उमेदवार शंकर जगताप व भोर-वेल्हा-मुळशी मतदारसंघाचे उमेदवार शंकर मांडेकर यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, आमदार अश्विनी जगताप, अमित



गोरखे, 'आरपीआय'च्या महिला प्रदेशाध्यक्षा चंद्रकांता सोनकांबळे, गोरक्षनाथ कांबळे, शहर कार्याध्यक्ष शत्रुघ्न काटे, नाना काटे, मोरेश्वर शेडगे, रणजित कलाटे, राजेश पिल्ले, संदीप कस्पटे, आरती चोंधे, प्रशांत शितोळे, मोरेश्वर भोंडवे, शरद ढमाले आदी उपस्थित होते.

"गडकरी म्हणाले, जगातील सर्वात वेगाने शहरीकरण आणि औद्योगिकरण होणारे पिंपरी चिंचवड शहर आहे. या शहरीकरणाचा आणि औद्योगिकरणाचा ताण मूलभूत सोयी सुविधांवर पडतो. त्याचाच परिणाम म्हणजे शहरातील वाढती वाहतूक कोंडीची समस्या ही आहे. मात्र या वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून आपण पिंपरी चिंचवड आणि पुणे शहरात एलिव्हेटेड रस्ते निर्मितीवर भर दिला आहे. शहराला वाहतूक कोंडीतून मुक्त करण्यासाठी पुणे ते बंगळूर रस्ता जोडणार आहे. ८० हजार कोटींच्या उड्डाणपुलाला मंजुरी दिली आहे.

आगामी काळात पुणे जिल्ह्यात १ लाख कोटी रुपयांची रस्त्यांची कामे मार्गी लागतील ज्यामुळे पिंपरी चिंचवड आणि पुणे शहर वाहतूक कोंडी मुक्त शहर होईल असे आश्वासन, गडकरी यांनी दिले.

## राहुल कलाटेंच्या पदयात्रेला नागरिकांचा उत्फूर्त प्रतिसाद

चिंचवड थेरगावकर ग्रामस्थ महाविकास आघाडीचे उमेदवार राहुल कलाटे यांच्या खंबीरपणे पाठीशी उभे राहिल्याचा प्रत्येय थेरगावातील परिवर्तन पदयात्रेत आला. या पदयात्रेत अबाल वृद्ध नागरिक महिला आणी युवकांनी रेकॉर्ड ब्रेक गर्दी केली होती. थेरगाव परिसरात कलाटे यांचे आगमन होताच हलगी तुतारीच्या कडाडणाऱ्या आवाजात, फटाक्यांची आतिषबाजी अन जागोजागी फुलांची पुष्पवृष्टी करत जोरदार स्वागत करण्यात आले. यंदा आमचं ठरलंय - वार फिरलंय, परिवर्तन घडणारच, राहुल दादा आमदार होणारच या घोषणांनी थेरगाव परिसर दुमदमून गेला होता.

राहुल कलाटे यांच्या प्रचारार्थ थेरगाव गणेश नगर मधील गणपती मंदिर, परिसरातील सर्व कॉलनी, पडवळ नगर, गुजर नगर, सोळा नंबर परिसर, अशोका सोसायटी, कैलास मंगल कार्यालय, धनगर बाबा मंदिर, तापकीर चौक, बारणे चौक, पदमजी पेपर मिल, दत्तनगर पूर्ण परिसरात परिवर्तन पद यात्रा काढण्यात आली. यावेळी, अनेक वर्ष या परिसरात प्रलंबित असलेल्या समस्यांचे गाऱ्हाणे नागरिकांनी मांडले. थेरगावकर जनतेला आता बदल हवा असून, यंदा विकासाचा नवा आश्वासक चेहरा आम्हाला हवा असल्याने यावेळेस थेरगावकर राहुल कलाटे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करणार अशी ग्वाही दिली.



यावेळी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, माजी नगरसेवक संपत पवार, मनोहर पवार, विशाल बारणे, विशाल पवार, संभाजी बारणे, शरद गुजर, नितीन पाडाळे, निखील गुजर, अमित गुजर, गणेश गुजर, दीपक तरडे, महेश बारणे, विनय बारणे, शरद बारणे, बबलू चांदणे, सुरेश गुजर, प्रकाश गुजर, विठ्ठल गुजर, यांच्यसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मतदान जनजागृतीसाठी धावल्या विंटेज कार

पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघात मतदानाचे प्रमाण वाढावे याबाबत जनजागृती करण्यासाठी महापालिकेच्या वतीने शहरात पहिल्यांदाच "भव्य विंटेज कार आणि बाईक रॅली व प्रदर्शनाचे" आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ऐतिहासिक दुर्मिळ कार व बाईक्स पाहण्यासाठी नागरिकांनी एकच गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळाले.

सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीत येणाऱ्या पिंपरी, भोसरी आणि चिंचवड मतदार संघात मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी महापालिकेच्या वतीने मतदार जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने संत तुकारामनगर येथील एच.ए. मैदानावर विंटेज कार आणि बाईक्स चे प्रदर्शन भरविण्यात आले होते. यावेळी कार व बाईक पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली.

महापालिकेच्या वतीने भरविण्यात आलेल्या विंटेज कार प्रदर्शनाचा हेतू मतदार जनजागृती करून शहरातील मतदानाचे प्रमाण वाढावे, हा असल्याचे मत



अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी मांडले. मतदान करणे हे लोकशाहीतील मतदारांचे आद्य कर्तव्य असल्याचे देखील ते म्हणाले. दरम्यान, कोकणे चौक पिंपळे सौदागर येथून या विंटेज कार व बाईक रॅलीची सुरुवात अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपआयुक्त अण्णा बोदडे यांच्या हस्ते फ्लॅग दाखवून करण्यात आली.

## मतदान केंद्रामध्ये मोबाईल घेऊन जाण्यास बंदी



**पिंपरी :** - लोकसभा निवडणुकीत मतदान केंद्रावर मोबाइल घेऊन जाण्यास बंदी घालण्यात आली होती. ऐनवेळी मोबाइल बंदीचा निर्णय घेतल्याने मतदारांची पंचाईत झाली होती. त्यामुळे घरातून मतदारांनी मोबाइल घेऊन आल्यानंतर मोबाइल ठेवायचा कुठे, असा प्रश्न अनेकांना पडला होता. त्यामुळे मतदानाची टक्केवारी घसरली होती. मात्र, निवडणूक विभागाने विधानसभेलाही मतदान केंद्रात मोबाइल घेऊन जाण्यास बंदी घातली आहे. गोपनीयतेचा भंग होऊ नये, याकरिता जिल्हा प्रशासनाने निर्णय घेतल्याचे सांगण्यात येत आहे.

लोकसभा निवडणुकीत मतदारसंघातील केंद्रांच्या शंभर मीटरच्या आत मोबाइल नेण्यास बंदी घातली होती. निवडणूक विभागाने मतदानाच्या दोन-तीन दिवस अगोदर अचानक घेतलेल्या या निर्णयाने मतदारांनी नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे लोकसभेप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही मतदान केंद्रावर मोबाइल घेऊन जाण्यास बंदी घातल्याने त्याचा मतदानावर परिणाम होणार का, हे पाहावे लागणार आहे.

# तिरंगी लढतीत कोण फिरविणार 'सोन्याचा नांगर'...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** छत्रपती श्री शिवाजी महाराजांनी माँ साहेब जिजाऊंच्या साथीने याच पुण्यात सोन्याच्या नांगराने शेती नांगरली, याच पुण्याचा केंद्रबिंदू असलेल्या पुण्याच्या कसबा पेठेतूनच त्यांनी स्वराज्याची मूहूर्तमेढ रोवली आणि याच कसब्यातून श्रीगणेशाची प्रतिष्ठापना केली.विशेष म्हणजे थोरल्या बाजीराव पेशव्यांनी

राष्ट्रसंचार कसबा वार्तापत्र

देशालाच नव्हे तर जगाला हेवा वाटेल असा शनिवारवाडा याच पुण्याच्या मध्यवर्ती भागात बांधला, त्याच कसबा पेठेत आज सर्वच पक्षांचे कुरघोडीचे राजकारण सुरू आहे. राजकारण्यांच्या याच 'क्लिष्ट' राजकारणाचा आता मतदारांनाच कंटाळा आला आहे, त्यामुळे या मतदारसंघात कोणता उमेदवार समोरच्या उमेदवारावर कुरघोडी करणार याकडे केवळ शहराचेच नव्हे तर संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले आहे. त्यातूनच ' सोन्याचा नांगर' फिरविण्याचे भाग्य कोणाच्या नशीबी येणार यावरच या मतदारसंघातील विजयाचे ' गणित' अवलंबून असणार आहे.

कसब्याचे राजकारण तसे पहिल्यापासूनच शांत आणि संयमी असेच राहिले आहे. मात्र पोटनिवडणुकीपासून याच राजकारणाला दृष्ट लागली आहे. विरोधी आमदाराने महाविकास आघाडीच्या उमेदवारावर अगदी जहरी टीका केल्याने त्यावेळचे राजकारण फिरले होते, त्यामुळे कधी नव्हे ते विरोधी गटाच्या उमेदवाराचा विजय झाला होता. परिणामी सर्वच पक्षांनी या निवडणुकीत अगदी पहिल्यापासूनच ही निवडणुक



कशी शांततेत पार पडेल आणि त्याचा फायदा आपल्यालाच होइल असा सर्वच पक्षांचा प्रयत्न सुरू होता. मात्र; मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची या मतदारसंघात पुन्हा एकदा कुरघोडीचे राजकारण सुरू झाले आहे. त्यातच दोन दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची याच शांत कसब्यात जंगी सभा झाली, या सभेच्या माध्यमातून पुन्हा एकदा कुरघोडीच्या राजकारणाला खतपाणी घातले गेले. या सभेत फडणवीस यांनी विद्यमान आमदार रविंद्र धंगेकर यांची संभावना थेट ' नाटकी आमदार' अशी केली गेली, त्यांच्या या वाक्याने कसब्याच्या राजकारणात मोठा ट्विस्ट निर्माण झाला आहे. त्यांच्या या आरोपांवर धंगेकर यांनी संयमी भूमिका घ्यावी आणि या आरोपांना उत्तर देऊ नये अशी सर्वसामान्य मतदारांची भावना होती. मात्र; शिवसेनेच्या मुशीत वाढलेल्या धंगेकर यांना या आरोपामुळे शांत बसविलेच गेले नाही आणि त्यांनी टोकाची भूमिका घेत थेट फडणवीसांवर जहरी आरोप केले. त्यामुळे कसब्यातील राजकारणाला आता प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात एक वेगळाच वास येऊ लागला आहे.

त्यातच मनसेचे उमेदवार गणेश भोकरे यांनी फी न भरल्याने शालेय शिक्षणापासून दूर राहिलेल्या दोन मुलांची फी भरुन त्यांना त्यांच्या शिक्षणाचा हक्क मिळवून दिला; हे त्यांनी राजकारणासाठी केले अथवा या मुलांच्या भवितव्यासाठी केले याचे उत्तर खुद्द त्यांनाच देता येणार आहे. मात्र; त्यांचे हे महान कार्य विरोधकांच्या चांगलेच जिव्हारी लागले. त्यांनी थेट यासंदर्भात सोशल मिडियावर व्हायरल झालेले वृत्त आणि वृत्तपत्रांमध्ये आलेल्या बातम्यांचा आधार घेत थेट निवडणुक आयोगाकडे तक्रार केली, त्यातूनच निवडणुक आयोगाने भोकरे यांना नोटीस बजावून खुलासा करण्याच्या सूचना केल्या. त्यामुळे शांत आणि संयमी असलेल्या कसबा मतदारसंघाचे राजकारण कोणत्या थराला जाऊन पोचले आहे, याची प्रचिती येत आहे. मात्र; आता राजकारण्यांच्या या कुरघोडीच्या राजकारणाला जनता वैतागले आहे. त्यामुळे या मतदारसंघाला आता कुरघोडीच्या राजकारणाची नव्हे तर विकासाच्या राजकारणाची अपेक्षा आहे, त्यासाठीच देवभोळा असलेल्या या मतदारसंघातील जनतेने आता त्यासाठी खुद्द देवानांच पाण्यात ठेवले आहे.

### • या आहेत जनतेच्या अपेक्षा...!

- ▶ जुन्या वाड्यांचा पुनर्विकास व्हावा
- ▶ अरुंद रस्त्याचे रुंदीकरण व्हावे
- ▶ जुन्या गटार वाहिन्या बदलाव्यात
- ▶ वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लावावा
- ▶ वादग्रस्त वसाहती स्थलातंरीत कराव्यात
- ▶ वाडेमालक आणि भाडेकरु यांच्यात समेट घडवावा
- ▶ ऐतिहासिक वास्तूंच्या परिसरात विकास व्हावा

राष्ट्रसंचार

off the Record

## नात्यागोत्यांना उधाण

यंदाची विधानसभा निवडणुकीचा प्रचार शेवटच्या टप्प्यात रंगतदार अवस्थेत आला आहे, त्यासाठी नेत्यांचे घरोघरी हेलपाटे वाढले आहेत. त्यातूनच मतदारांची मते मिळविण्यासाठी प्रचारामध्ये नात्यागोत्यांच्या राजकारणाला चांगलेच उधाण आले आहे. त्यासाठी मामा, आत्या, काका, तात्या, आबा असा मतदारांचा उल्लेख केला जात आहे. त्यामुळे कधी नव्हे ते एवढा मोठा नेता आदबीने बोलत असल्याने मतदारराजाही चांगलाच सुखावला जात आहे. मात्र; नात्यागोत्यांना आलेले हे उधाण असेच शेवटपर्यंत टिकवून ठेवा अशी माफक अपेक्षा आता मतदारराजा करु लागला आहे.

## सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे काय...!

उमेदवारी अर्ज दाखल केल्यापासून सर्वच उमेदवारांचा घरोघरी प्रचार सुरू आहे, त्यातच प्रचारसभा आणि पदयात्रा यामुळे निवडणुकीचा चांगलाच माहोल तयार झाला आहे. त्यामुळे आता आपलाच विजय या थाटात प्रत्येक उमेदवार वावरु लागला आहे. त्यातच एका उमेदवाराला त्याच्या जवळच्या कार्यकर्त्याने एक चांगला सल्ला दिला आणि आपण पीएमपीच्या बसथांब्यावर आणि बसमध्ये जाऊन प्रचार करु असे या उमेदवाराला सुचवले. आयडिया भन्नाट असल्याने या उमेदवाराने तात्काळ या प्रस्तावाला होकार दिला, त्यानुसार हे उमेदवार आणि पंचवीस ते तीस कार्यकर्ते वडगावशेरीच्या बसथांब्यावर भल्या सकाळीच दाखल झाले. या उमेदवारांना आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना पाहाताच सकाळच्या कोवळया उन्हात या प्रवाशांच्या कपाळावर चांगल्याच आठ्या आल्या, तरीही त्यांना सामोरे जाणे गरजेचेच होते. त्याचवेळी या उमेदवाराने तावातावाने बोलण्यास सुरूवात केली, आश्वासने देत समोरच्या उमेदवारापेक्षा मीच किती चांगला आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी एक वयस्कर आजोबा पुढे झाले आणि त्यांनी थेट या उमेदवाराला फैलावर घेण्यास सुरूवात केली. बाकीच काय नको पण तेवढ बससाठी काय केले ते आधी सांगा असा संतप्त सवाल केला. आजोबांच्या या थेट प्रश्नामुळे या उमेदवाराचा आणि त्यांच्या कार्यकर्त्यांचा चेहरा पाहाण्यासारखा झाला होता.

## स्मशानभूमीतही प्रचार...!

मतदारसंघातील लग्न, वास्तुशांती, पूजा या सुखाच्या कार्यक्रमासह अंत्यविधी आणि दहाव्याच्या कार्यक्रमाला हजेरी लावणे हे काही नेते त्यांचे आद्यकर्तव्य समजतात. विशेष म्हणजे त्यासाठीच त्यांचा नेहमी आटापिओटा सुरू असतो, आता तर निवडणुका असल्याने या कार्यक्रमांना हजेरी लावणे प्रत्येक नेता क्रमप्राप्त समजत आहे. त्यातूनच सुखदुखांच्या या कार्यक्रमासाठी नेत्यांचा आणि त्यांच्या कार्यकर्त्यांचा राबता चांगलाच वाढला आहे, याठिकाणी भाषणे करायला मिळत असल्याने कधीही अशा कार्यक्रमांना उपस्थित न राहाणारे नेतेही याठिकाणी जात आहेत. मात्र; भाषणाच्या शेवटी मला मतदान करा हे सांगायलाही ते विसरत नाहीत. त्यामुळे सुखदुखाच्या कार्यक्रमातही नागरिकांची चांगलीच करमणूक होत आहे.

### ज्येष्ठ नागरिकही म्हणतात...!

# दादा तुमचा साधेपणा खूपच भावतो!

## सिद्धार्थ पॅलेसमधील नागरिकांशी चंद्रकांत दादांचा संवाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील मंत्रीमंडळातील ज्येष्ठ मंत्री, भाजपाचे एक वरिष्ठ नेते अशी तुमची राज्यभरात प्रतिमा आहे. मात्र; मतदारसंघात वावरताना तुम्ही तुमची ही प्रतिमा बाजूला ठेऊन सर्वसामान्य नागरिकांमध्ये मिसळता. तुमचा हाच साधेपणा आम्हाला खूपच भावतो अशा शब्दात कोथरुडमधील ज्येष्ठ नागरिकांनी चंद्रकांतदादांच्या संदर्भात आपल्या भावना व्यक्त केल्या.

कोथरुड मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार चंद्रकांतदादा पाटील यांनी आज कोथरुड मधील जोशी म्युझियम परिसरातील सिद्धार्थ पॅलेसमधील नागरिकांची भेट घेऊन संवाद साधला. यावेळी माजी नगरसेवक दीपक पोटे, नगरसेविका मंजुश्री खर्डेकर, अ‍ॅड. मिताली सावळेकर, भाजपा नेते प्रशांत हरसुले प्रभाग क्रमांक १३ च्या अध्यक्षा अ‍ॅड. प्राची बगाटे, प्रतिक खर्डेकर, विनिता काळे उपस्थित होते.



"४० टक्के कर सवलती मुळे सर्व पुणेकरांना दिलासा मिळाला आहे. तसेच, मेट्रो सारख्या प्रकल्पामुळे कोथरुड मधील नागरिकांचा प्रवास सुखकर झाला आहे, मी कोथरूडकरांच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहणार आहे."
— चंद्रकांतदादा पाटील उमेदवार महायुती कोथरुड

यावेळी सोसायटीचे पदाधिकारी कोल्हटकर म्हणाले की, "दादा, तुम्ही महाराष्ट्राचे वरिष्ठ मंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते म्हणून मोठे आहातच; पण या मंत्रीपदापेक्षा तुमच्यातला कार्यकर्ता आणि साधेपणा आम्हाला खूप भावतो." त्यावर चंद्रकांतदादा पाटील यांनीही नम्रपणे कतज्ञता व्यक्त केली.

# मतमोजणीसाठी निरीक्षकांचे प्रशिक्षण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खडकवासला विधानसभा मतदारसंघाकरिता २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार असून, मतमोजणी प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी नियुक्त सूक्ष्म निरीक्षकांचे सिंहगड कॉलेज, आंबेगाव बु. येथील खडकवासला निवडणूक कार्यालयात प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या वेळी निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. यशवंत माने, सहाय्यक निवडणूक अधिकारी किरण सुरवसे, नायब तहसीलदार सचिन आखाडे, अधिकारी अंकुश गुरव, तसेच प्रशिक्षक प्रा. माधुरी माने आणि प्रा. तुषार राणे उपस्थित होते.

खडकवासला

प्रशिक्षणादरम्यान, डॉ. माने यांनी सूक्ष्म निरीक्षकांना मतमोजणी प्रक्रियेची काळजीपूर्वक समज करून घेण्याचे मार्गदर्शन केले. "प्रक्रियेदरम्यान काही अडचणी आल्यास वरिष्ठांचे मार्गदर्शन तत्काळ घ्यावे," असे ते म्हणाले.किरण सुरवसे यांनी मतमोजणी प्रक्रियेबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली. त्यांनी गोपनीयतेची शपथ, मतमोजणी बैठक व्यवस्था, कर्मचारी संख्या, ईव्हीएम मतमोजणी, १७ सी फॉर्म, आणि टपाली मतदान मोजणी प्रक्रियेची विस्तृत माहिती दिली.

या प्रशिक्षणात सूक्ष्म निरीक्षकांनी सहभाग घेतला.प्रशिक्षणाच्या आयोजनात प्राजक्ता वनारसे आणि सुवर्णा गुजर या प्रशिक्षण विभागाच्या आयोजकांचे महत्त्वाचे योगदान राहिले.या प्रशिक्षणामुळे खडकवासला मतदारसंघातील मतमोजणी प्रक्रिया अधिक पारदर्शक व यशस्वी होण्यास मदत होणार आहे.

### मोबाईलला बंदी...!

● प्रशिक्षणादरम्यान, मतमोजणी कक्षात मोबाइल वापरण्यास बंदी असल्याने निरीक्षकांना मोबाइल सोबत न आणण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. सर्व प्रशिक्षकांनी या नियमाचे काटेकोरपणे पालन करावे, अशा सूचनाही यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. यशवंत माने यांनी केल्या.

# काँग्रेसची हेटाळणी भाजपाला महागात पडेल

## खासदार अमोल कोल्हे यांचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आमदार रवींद्र धंगेकर यांनी पुणेकरांसाठी, तसेच कसबा मतदारसंघातील नागरिकांसाठी तळमळीने काम केले. जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी हा माणूस पोटतिडकीने लढला आणि त्यांच्या या कामाला नाटक असे संबोधून ज्येष्ठ भाजप नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची हेटाळणी केली आहे. त्यांची ही हेटाळणी सर्वस्वी गैर आहे आणि ती कसब्यात भाजपला महागात पडेल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांनी दिला.

खासदार डॉ. कोल्हे यांनी आज कसबा मतदारसंघात धंगेकर यांच्यासाठी पदयात्रा काढली. लाल महालात माँसाहेब जिजाऊ व छत्रपती शिवरायांचे दर्शन घेऊन त्यांनी पदयात्रेला प्रारंभ केला. नंतर त्यांनी दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराचेही दर्शन घेतले. अखिल मंडई मंडळाच्या गणपतीची आरतीही डॉ. अमोल कोल्हे यांच्या हस्ते झाली. तसेच मंडई परिसरात महात्मा जोतिबा फुले यांच्या पुतळ्यासही पुष्पहार अर्पण करून त्यांनी वंदन केले. तसेच मंडईतील व्यापाऱ्यांशीही संवाद साधला.

यावेळी मोहन जोशी, अभय छाजेड, अंकुश काकडे, रवींद्र माळवदकर, अण्णा थोरात, बाळासाहेब मारणे, संजय मोरे, विशाल धनवडे, गणेश नलावडे, अक्षय माने आदी उपस्थित होते.

### हा गुन्हा आहे का?

● पोटनिवडणुकीत शानदार विजय मिळविल्यानंतर आमदार रविंद्र धंगेकर यांनी भल्याभल्यांना घाम फोडला आहे, त्यांनी भ्रष्ट कारभाराची मुद्देसुद मांडणी केल्यानेच शासनाला पळताभुई थोडी झाली आहे. त्यामुळेच धंगेकर यांची संभावना ' नाटकी आमदार' अशी केली जात आहे, त्यांचा हा आरोप कसब्यातील मतदार कदापीही सहन करणार नाही असेही डॉ. कोल्हे यांनी स्पष्ट केले.



"शहरातील अवैध पब्ज, मादक द्रव्यांचा पुणे शहराला पडत असलेला विळखा, पोर्शे कार अपघात प्रकरण या महत्त्वाच्या प्रश्नांसह धंगेकर यांनी आमदारकीच्या दीड वर्षाच्या काळात लोकांच्या प्रश्नांवर तळमळीने काम केले आहे. त्यांच्या या कामांची नाटक म्हणून अवहेलना करणे भाजपला महागात पडणार आहे. "
— खासदार डॉ. अमोल कोल्हे

### जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांचे आदेश

# दिव्यांग आणि ज्येष्ठ मतदारांना सुविधा द्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दिव्यांग आणि ज्येष्ठ मतदारांना सुविधा देण्यासाठी प्राधान्य द्या, असे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक निर्णय अधिकारी डॉ.सुहास दिवसे यांनी दिले.

हडपसर विधानसभा मतदार संघातील स्ट्रॉंग रूम व साहित्य वाटप केंद्रास डॉ.सुहास दिवसे यांनी साधना शैक्षणिक संकुल हडपसर येथे भेट देऊन पाहणी केली, त्यावेळी त्यांनी हे आदेश दिले.यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. स्वप्नील मोरे, जिल्हा समन्वय अधिकारी - महेश सुधळकर, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी नागनाथ भोसले, श्रीमती शैलजा पाटील, अमोल पवार, नायब तहसीलदार श्रीमती जाई कोंडे उपस्थित होते.

त्यांनी हडपसर विधानसभा मतदारसंघातील महात्मा फुले विद्यानिकेतन संस्थेचे ज्ञानप्रबोधिनी प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, ससाणेनगर, हडपसर व एस.एन.बी.पी. स्कूल, सातवनगर, हडपसर या मतदान केंद्रांना भेटी दिल्या.



### रोटरी क्लब व सरस्वती मा. विद्यालयाने केली मतदान जनजागृती

● रोटरी क्लब डेक्कन जिमखाना व सरस्वती माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मतदान जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी रोटरी क्लब डेक्कनचे अध्यक्ष अविनाश पेंडसे, अनघा पेंडसे, सरस्वती विद्यालयाचे कैलास सरतापे व किरण कोल्हे आदी मान्यवरांच्या बरोबरच रोटरी सदस्य व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

" मतदान केंद्रांची पाहणी दरम्यान मतदान केंद्रांमध्ये प्रवेश करण्यासाठी आणि केंद्रातून बाहेर जाण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असावी, दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांसाठी रँम्प, व्हीलचेअर इत्यादींची व्यवस्था करावी."
— डॉ. सुहास दिवसे,
जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक निर्णय अधिकारी

#रा

## कानोसा कार्यकर्त्यांचा

### चेतन तुपे यांच्यात विकास करण्याची धमक

- संभाजीराव मोरे, सामाजिक कार्यकर्ते

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** माजी खासदार स्व. विठल तुपे पाटील यांच्यामुळेच हडपसर मतदारसंघाचा मोठ्या प्रमाणावर कायापालट झाला आहे, एक सर्वसामान्य आणि तळागाळातील जनतेचे सर्वाभिमुख नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे मतदारसंघातील जनता पाहात होती. त्यांच्या या दूरदृष्टीच्या स्वभावामुळेच मतदारसंघातील अनेक कामे मार्गी लागली आहेत.

विशेष म्हणजे मतदारसंघात अनेक शाळा, महाविद्यालये आणि सर्वसामान्यांसाठी रुग्णालये उभी राहिली आहेत. त्याचा लाभ मतदारसंघातील आणि बाहेरगावच्या नागरिकांना होत आहे, त्यामुळेच मतदारसंघातील जनता स्व. विठल तुपे पाटील यांना देवाच्या स्थानी मानत आहेत. वडिलांच्याच पावलावर पाऊल ठेऊन आमदार चेतन तुपे पाटील यांनी गेल्या काही वर्षांपासून समाजकार्य सुरू केले आहे, त्यांनी नगरसेवकपदाच्या कारकिर्दीत या मतदारसंघात महापालिकेचा आणि राज्य शासनाचा मोठ्या प्रमाणावर निधी आणून विकासाची गंगा आणली. विशेष म्हणजे करोनाच्या काळात संपूर्ण जग थांबले होते, कोणताही नेता घाबरुन घराच्या बाहेर पडत नव्हता. मात्र; आमदार चेतन तुपे पाटील यांनी स्वत:ची आणि कुटुबांच्या जीवाची पर्वा न करता समाजकार्यात स्वत:ला झोकून दिले. त्यांच्या या कार्यामुळेच अनेकांना याकाळात जीवदान मिळाले आहे, त्याशिवाय करोनाचा काळ संपल्यानंतर पुन्हा विकासकामांची गंगा आणण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न सुरू केले. त्यामुळे हडपसर मतदारसंघाला पुन्हा एकदा अशाच अभ्यासू आणि विकासकामांची आवड असलेल्या आमदाराची गरज आहे, त्यातूनच तुपे पाटील यांना या मतदारसंघातील जनता मोठ्या मताधिक्क्याने विधानसभेत पाठविणार आहे

### आंदोलनाला हिंसक वळण; मैतेईंचा २४ तासांचा अल्टिमेटम

# मणिपूरमध्ये मुख्यमंत्री, मंत्र्यांच्या घरांवर हल्ले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंफाळ :** मणिपूरमध्ये पुन्हा एकदा हिंसाचार उसळला आहे. संतप्त जमावाने मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांच्या खासगी निवासस्थानावरही हल्ला केला. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. बिरेन सिंग त्या वेळी घरी नव्हते. अन्य मंत्र्यांच्या घरावरही हल्ले करण्यात आले.



मुख्यमंत्र्यांच्या घरावर हल्ला करणाऱ्या जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या.

राज्य सरकारने अलीकडेच इंफाळमध्ये संचारबंदी लागू केली आहे. येथील तीन जणांच्या हत्येनंतर उसळलेल्या निदर्शनांच्या पार्श्वभूमीवर सहा जिल्ह्यांत इंटरनेट सेवा बंद करण्यात आली आहे. आंदोलकांनी इम्फाळमध्ये दोन मंत्री आणि तीन आमदारांच्या घरांवर हल्ला केला. त्यानंतर आंदोलनाला हिंसक वळण लागले. मिळालेल्या माहितीनुसार, इंफाळ पश्चिम जिल्ह्यातील लानफेले संकेथेल येथील आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री सपम रंजन यांच्या निवासस्थानावरही जमावाने हल्ला केला. त्याचवेळी जमावाने ग्राहक व्यवहार आणि सार्वजनिक वितरण मंत्री एल. सुसिंद्रो सिंग यांच्या घरालाही लक्ष्य केले.

मुख्यमंत्री सिंह यांचे जावई आणि भाजप आमदार आरके इमो यांच्या घराबाहेरही आंदोलक जमले होते. या वेळी आंदोलकांनी सहा जणांच्या हत्याकांडावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली होती. २४ तासांत दोषींना अटक करण्याची मागणी आंदोलकांनी केली होती. केशमथोंग मतदारसंघातील तिड्डीम रोड येथील अपक्ष आमदार सपम निशिकांत सिंह यांच्या घराबाहेरही आंदोलकांनी निदर्शने केली. या वेळी आंदोलकांनी आमदारांच्या मालकीच्या स्थानिक वृत्तपत्राच्या कार्यालयावरही हल्ला केला. जिरीबाम जिल्ह्यातील बेपत्ता झालेल्या सहापैकी तीन जणांचे मृतदेह शुक्रवारी रात्री मणिपूर-आसाम सीमेवर जिरी आणि बराक नद्यांच्या संगमाजवळ सापडले होते. यामध्ये काल रात्री आसाममधील सिलचर येथे एक महिला आणि दोन मुलांचे मृतदेह आणण्यात आले. पोलिस शवविच्छेदन अहवालाची वाट पाहत आहेत. ओळखीसाठी छायाचित्रे गोळा करण्यात आली आहेत.

दरम्यान, पोलिसांनी सांगितले, की बिष्णुपूर जिल्ह्यातील इरेंगबाम मॅनिंग भागात संशयित अतिरेक्यांची सुरक्षा दलांशी संक्षिप्त चकमक झाली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे त्यांनी सांगितले. १४ नोव्हेंबर रोजी, गृह मंत्रालयाने इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील सेकमाई आणि लमसांग, इम्फाळ पूर्वेतील लामलाई, बिष्णुपूरमधील मोइरांग, कांगपोकपीमधील लिमाखोंग आणि जिरीबाम जिल्ह्यातील जिरीबाम अंतर्गत भागात 'अफ्स्पा' कायदा पुन्हा लागू केला.

दरम्यान, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी मणिपूरच्या घटनेवरून संताप व्यक्त करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली. ७ नोव्हेंबरपासून आतापर्यंत १७ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. संघर्षग्रस्त भागांच्या यादीत नवीन जिल्हे जोडले जात आहेत आणि आग सीमेवरील ईशान्येकडील राज्यांमध्ये पसरत आहे. मणिपूर या सुंदर सीमावर्ती राज्यात तुम्ही पूर्णपणे अपयशी ठरला आहात. भविष्यात तुम्ही मणिपूरला गेलात, तरी राज्यातील जनता कधीही अशी टीका त्यांनी केली.


#### ना एकसंघ, ना सुरक्षित!

● तुमच्या डबल इंजिन सरकारमध्ये ना मणिपूर एकसंघ आहे, ना मणिपूर सुरक्षित आहे. मे २०२३ पासून राज्य अकल्पनीय वेदना, विभाजन आणि वाढत्या हिंसाचारातून जात आहे. आपल्या लोकांचे भवितव्य उद्ध्वस्त झाले आहे. भाजपला त्यांच्या घृणास्पद विभाजनवादी राजकारणामुळे मणिपूर जाळायचे आहे, असा आरोप खर्गे यांनी केला.

## » Selected

### झाशी मेडिकल कॉलेज आगीचा अहवाल सादर, कारण समोर

**लखनऊ :** झाशी येथील मेडिकल कॉलेजच्या नवजात शिशू कक्षाच्या अति दक्षता विभागाला लागलेल्या आगीशी संबंधित



अहवाल मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना सादर करण्यात आला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, झाशीचे विभागीय आयुक्त आणि डीआयजी यांनी मुख्यमंत्र्यांना अहवाल सादर केला आहे. या अहवालात आगीचे कारण स्पष्ट करण्यात आले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या आगीचे कारण विद्युत अपघात आहे. स्वीच बोर्डला आग लागल्याने हा प्रकार घडला; परंतु सायंकाळी पाच वाजता झालेल्या शॉर्टसर्किटकडे दुर्लक्ष झाले असते, तर हा प्रकारच घडला नसता, असे सांगण्यात येते. नवजात मुलांच्या कक्षात पाण्याची सोय करणे वैद्यकीयदृष्ट्या योग्य मानले जात नाही, असे कारण देण्यात आल आहे.

### जळगावमध्ये साडेपाच कोटींचे सोने-चांदी जप्त

**जळगाव :** सध्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र चोख बदोबस्त असून नाक्यानाक्यावर पोलिसांकडुन वाहनांची तपासणी सूरू आहे. अशाच एका तपासणीदरम्यान पोलिसांनी ४ किलो सोने व ३४ किलो चांदी जळगावमधून जप्त केली आहे. या सोन्या चांदीची किंमत ५ कोटी ५९ लाख ६१ हजाराच्या घरात आहे. यानंतर पोलिसांनी वाहन चालकाची चौकशी केली असता शहरातील तीन ज्वेलर्स मालकांचे हे सोने चांदी असल्याची माहिती समोर आली आहे.

### दहावी बारावी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून यंदा दहावी, बारावीची परीक्षा दहा दिवस आगोदर घेतली जाणार आहे. बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारीपासून, तर इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेबाबत विद्यार्थ्यांच्या मनात भीती असते. अशावेळी परीक्षेदरम्यान येणाऱ्या अडचणी आणि स्मरणशक्तीचे गणित आताच जुळवावे लागणार आहे. दहावीचा पहिला पेपर मराठी, हिंदी व इतर प्रथम भाषा या विषयांचा राहील. दरम्यान वेळापत्रकानुसार कला, वाणिज्य, विज्ञान, एमसीव्हीसी आदी शाखांची परीक्षा होणार आहेत.

### सोलापूरकरांचे नागरी विमानसेवेचे स्वप्न सत्यात

**सोलापूर :** सोलापूरकरांची बहुप्रतिक्षित थेट विमानसेवा सुरू होणार आहे. होटगी रोड सोलापूर विमानतळावरून फ्लाय ९१ एअरलाईन्सची विमानसेवा २० डिसेंबर २०२४ पासून सुरू होणार असून मुंबई आणि गोवा यांसारख्या महत्त्वाच्या शहरांसाठी थेट उड्डाणे दिली जाणार आहेत. ही सेवा सुरू करण्यासाठी सोलापूर विकास मंचाच्या अथक प्रयत्नांमुळेच हे स्वप्न साकार होऊ शकले आहे. सोलापूर जिल्ह्यात महामार्गाची कनेक्टिव्हिटी वाढल्यानंतर स्मार्ट सिटीतील सोलापूरकरांना आता विमानसेवेची प्रतीक्षा होती. पुणे, मुंबईतील एमआयडीसी हाऊसफुल झाल्यानंतर सोलापूर शहर- जिल्ह्यात उद्योगवाढीला मोठा वाव आहे, पण येथे आयटी कंपन्या नाहीत, मोठ्या प्रमाणावर रोजगार देणारे व अपेक्षा पूर्ण करणारे नवीन उद्योग नाहीत. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात दरवर्षी पाच हजार अभियंते शिक्षण पूर्ण करतात, पण नोकरीच्या निमित्ताने बहुतेकजण परजिल्ह्यातच जातात. दरम्यान, आता सोलापूर जिल्ह्यात कासेगाव, कुंभारी, मोडनिंब, अतिरिक्त चिंचोली या ठिकाणी नवीन एमआयडीसींचे प्रस्ताव आहेत.



नायजेरिया येथे आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे उत्स्फुर्त स्वागत करण्यात आले.

## मोदी यांना आणखी एका देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अबुजा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या तीन देशांच्या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात रविवारी आफ्रिकन देश नायजेरियाला पोहोचले. पंतप्रधान मोदी यांचे विमान अबुजा, नायजेरिया येथे उतरले. तेथे त्यांचे नायजेरियन सरकारचे मंत्री न्यासोम इझेनवो वाइके यांनी जोरदार स्वागत केले.

नायजेरिया सरकारच्या मंत्र्याने आदरार्थी म्हणून अबुजा शहराच्या चाव्या पंतप्रधान मोदी यांना दिल्या. खरे तर ही चावी नायजेरियातील जनतेने पंतप्रधान मोदींप्रती दाखविलेल्या आदर आणि विश्वासाचे प्रतीक आहे. यानंतर आता नायजेरिया मोदी यांना 'द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द नायजर'या पुरस्काराने सन्मानित करणार असल्याची माहिती समोर आली आहे. मोदी यांना प्रदान करण्यात येणारा हा १७ वा आंतरराष्ट्रीय पुरस्कार असेल. राणी एलिझाबेथ या एकमेव परदेशी मान्यवर आहेत, ज्यांना १९६९ मध्ये हा 'द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द नायजर' हा पुरस्कार मिळाला आहे. यानंतर मोदी हे दुसरे विदेशी असणार आहेत, ज्यांचा या पुरस्काराने सन्मान होणार आहे.

मोदी यांचा पश्चिम आफ्रिकन प्रदेशाचा पहिला दौरा आहे. ते सध्या नायजेरिया, ब्राझील आणि गयाना येथे थांबलेल्या पाच दिवसांच्या दौऱ्यावर आहे. नायजेरियाच्या दौऱ्यानंतर मोदी यांचा ब्राझीलचा दौरा आहे. या देशांसोबत भारताचे राजनैतिक आणि आर्थिक संबंध दृढ करण्यासाठी हा दौरा महत्त्वपूर्ण आहे.

## शिवसेनेच्या दोन गटांत 'पोस्टर वॉर!'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील प्रचाराच्या तोफा उद्या थंडावतील. निवडणूक प्रचारातील अंतिम टप्प्यात आज शिवसेना प्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची पुण्यतिथी होती. त्यांच्या स्मृतिदिनी शिवसेना विरूद्ध शिवसेना असा सामना रंगला आहे.

मुंबईत शिंदे गट आणि उद्धव गटात पोस्टर वॉर सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाने उद्धव ठाकरे गटाला डिवचले आहे. ठाकरे गटावर जोरदार प्रहार चढवला आहे. या पोस्टरची मुंबईतच नाही, तर राज्यभर 'सोशल मीडिया'वर पण चर्चा रंगली आहे.




बाळासाहेब ठाकरे यांचे एक वक्तव्य शिंदे गटाने प्रसिद्ध केले आहे. विविध वृत्तपत्रात त्याची जाहिरात आणि होर्डिंग लावण्यात आले आहे.

बाळासाहेब ठाकरे यांच्या मोठ्या छायाचित्रासह यामध्ये वाक्य देण्यात आले आहे. 'मी, माझी शिवसेना कधीच काँग्रेस होऊ देणार नाही.' असे बाळासाहेबांचे वाक्य प्रसिद्ध करण्यात आले आहे, तर उद्धव यांनी पण जाहिरात दिली आहे. भीती, भूक, भ्रष्टाचाराचा अंध:कार आता दूर करणार मशाल, असे वाक्य त्यावर लिहिले आहे.

## मुकुट विश्वसुंदरीचा

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**कोपनहेगन :** डेन्मार्कची व्हिक्टोरिया केजर थेलविग हिने ७३ व्या 'मिस युनिव्हर्स'चा किताब जिंकला आहे. डेन्मार्कच्या सौंदर्यवतीने 'मिस युनिव्हर्स' स्पर्धा जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे.

## महाराष्ट्रात महाविकास नव्हे, महाविनाश आघाडी : शिवराजसिंह

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** महाविकास आघाडीसह आणि राहुल गांधी यांच्याकडे विकासाचे कुठलेही व्हीजन नाही. केवळ जाहीर सभामधून खोटी आश्वासने देत जनतेची दिशाभूल करतात. राज्यामध्ये महाविकास आघाडीकडे विकासाचे कुठलेही मॉडेल नसून ही केवळ महाविनाश



आघाडी असल्याची टीका केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केली.

चौहान नागपुरात आले असता ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. या वेळी शिवराजसिंह म्हणाले, की राहुल गांधी देशात एक आणि विदेशात वेगळे वक्तव्य करुन जनतेची दिशाभूल करतात. राज्यात महाविनाश आघाडी तयार करण्यात आली आहे. त्यांच्याजवळ विचार, व्यवहार आणि कुठलीही नीती नाही. जाती व धर्मावर केवळ राजकारण करण्याचे काम आघाडी सरकार करत आहे. मध्य प्रदेशमध्ये राबविण्यात आलेली लाडली बहीण योजना यशस्वी झाली आहे. तेथील गोरगरीबांना आर्थिक दृष्ट्यासक्षम करण्यासाठी योजना सुरू केल्यानंतर अनेक महिलांनी त्याच्या भरवश्यावर स्वत:चे उद्योग सुरू केले आहेत.

मध्य प्रदेश सरकार ही योजना चांगल्या पद्धतीने राबवित असून त्यासाठी १६ हजार कोटींची तरतुद करण्यात आली आहे. क्रॉग्रेसने जाहिरनाम्यात महिलांना तीन हजार रुपये देण्याची घोषणा केली मात्र काँग्रेसच्या घोषणा फसव्या असतात, अशी टीका त्यांनी केली.

## लहान मुलांवरुनचा वाद टोकाला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पाटणा :** पूर्णिया येथे लहान मूल खेळत असताना वाद झाला आणि दोन पक्षांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या मारामारीत एका तरुणाचा मृत्यू झाला.

या घटनेत दोन्ही बाजूचे दोन महिलांसह १० जण जखमी झाले आहेत. त्यापैकी चौघांची प्रकृती गंभीर आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून मृतदेह ताब्यात घेतला. या प्रकरणाची चौकशी करण्यात येत आहे. शनिवारी सायंकाळी उशिरा ही घटना घडली. दिनेश साहनी (४० वर्षे) असे मृताचे नाव असून तो दरभंगा जिल्ह्यातील बैनीपूर नवतोलिया येथील रहिवासी आहे. जखमींमध्ये मृताचे वडील फुलचन साहनी (६० वर्षे), आई फुलिया देवी, दोन भाऊ मिथुन साहनी आणि क्रांती साहनी यांचा समावेश आहे. दुसऱ्या गटाचे सुबोध सिंह, विजय कुमार, अजय कुमार, संजय कुमार, मंजय कुमार आणि रेखा देवी हे जखमी आहेत.

## इस्त्रायलच्या पंतप्रधानांच्या घरावर बॉंबहल्ले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तेलअवीव :** गेल्या वर्षभरापासून पश्चिम आशियामध्ये तणावपूर्ण वातावरण आहे. या तणावाच्या पार्श्वभूमीवर इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्या घराला बॉम्बने लक्ष्य करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, उत्तर इस्रायलच्या सीझेरिया शहरात नेतन्याहू यांच्या घराच्या दिशेने दोन फ्लॅश बॉम्ब टाकण्यात आले; पण सुदैवाने हे बॉम्ब घराबाहेरील बागेत पडल्याने जीवीत हानी टळली.



सुरक्षा यंत्रणांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी सीझेरिया शहरात नेतन्याहू यांच्या निवासस्थानाजवळ दोन बॉम्ब टाकण्यात आले. पोलिस आणि अंतर्गत सुरक्षा यंत्रणेच्या संयुक्त निवेदनात सांगण्यात आले, पंतप्रधानांच्या निवासस्थानाबाहेरील बागेत दोन बॉम्ब पडले.

#### इस्त्रायलच्या हल्ल्यात दहा ठार

● शनिवारी, गाझा शहरातील शाती निर्वासित छावणीतील शाळेवर इस्रायलने केलेल्या हल्ल्यात दहा पॅलेस्टिनी ठार तर २० जण जखमी झाले आहेत. या निर्वासित शिबिरात लोकांवर उपचार केले जात असून सध्या ते विस्थापित कुटुंबांना आश्रय देत असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. शाळेत अजूनही लोक ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. तिथे बचाव कार्य चालू आहे.

### शेजारच्या देशांना धास्ती; आवाजाच्या पाच पटीहून अधिक गती

# हायपरसॉनिक क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भुवनेश्वर :** 'डीआरडीओ'ने रविवारी (दि.१७) ओडिशाच्या किनारपट्टीवरील एपीजे अब्दुल कलाम बेटावरून लांब पल्ल्याच्या हायपरसॉनिक क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वीरित्या पूर्ण केली. यावर बोलताना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी 'एक्स'वर पोस्ट करून 'डीआरडीओ'च्या टीमचे कौतुक केले. हे हायपरसॉनिक क्षेपणास्त्र भारतीय सशस्त्र दलाच्या सर्व सेवांसाठी १५०० किमीपेक्षा जास्त श्रेणीसाठी विविध पेलोड वाहून नेण्यासाठी डिझाइन केलेले आहे.



या वेळी ते म्हणाले, की ओडिशाच्या किनारपट्टीपासून दूर असलेल्या डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम बेटावरून लांब पल्ल्याच्या हायपरसॉनिक क्षेपणास्त्राची यशस्वी उड्डाण चाचणी यशस्वी केली. या चाचणीमुळे भारताने एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. हा सर्वांसाठी एक ऐतिहासिक क्षण आहे. या महत्त्वपूर्ण कामगिरीने आपला देशाचा निवडक गटात समावेश झाला आहे. प्रगत लष्करी तंत्रज्ञानाची क्षमता असलेल्या राष्ट्राचे, सशस्त्र दलांचे आणि उद्योगाचे अभिनंदन करतो. दरम्यान, 'आरएम'ओ इंडियाच्या अधिकृत हँडलने मिशनची एक क्लिप पोस्ट केली जिथे क्षेपणास्त्र चाचणी पाहिली जाऊ शकते.

'डीआरडीओ' आणि सशस्त्र दलाच्या वरिष्ठ शास्त्रज्ञांच्या उपस्थितीत ही उड्डाण चाचणी घेतली.

#### हायपरसॉनिक क्षेपणास्त्र क्षमता?

● अहवालानुसार, सध्या जगातील केवळ पाच देशांकडे हायपरसॉनिक क्षेपणास्त्रांची क्षमता आहे. अमेरिका, रशिया, चीन, फ्रान्स आणि भारत; मात्र इराणकडूनही अशा प्रकारच्या क्षेपणास्त्रांची चाचणी घेतल्याचे वृत्त आहे. याशिवाय ब्रिटन, इस्रायल, ब्राझील आणि दक्षिण कोरियामध्ये हे तंत्रज्ञान विकसित केले जात आहे.

#रा

# पुण्यातील शास्त्रज्ञांमुळे जगासमोर आली खरी माहिती
# ताम्हिणी घाटात विक्रमी पावसाची नोंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दरवर्षी जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत या भागात सरासरी ९ हजार मिलिमीटर पाऊस पडतो. मात्र पुणे अन् रायगड जिल्ह्यांना जोडणारा ताम्हिणी हा घाटदेखील देशाला सर्वाधिक पाऊस देतो. यावर पुण्यातील चार ज्येष्ठ हवामान तज्ज्ञांनी संशोधन करून 'रॉयल मेट्रोलॉजिकल सोसायटी' या जगातील प्रतिष्ठित शोधपत्रिकेत अवघ्या जगाला नवी माहिती दिली आहे. या घाटातील तब्बल ३८ वर्षांच्या पर्जन्याची आकडेवारीच बोलकी आहे. मात्र, तरीही ताम्हिणी घाटाच्या विक्रमी पावसाची नोंद देशाने घेतली नाही. तरीही सर्वाधिक पाऊस मेघालय राज्यातील चेरापुंजी अन् मोसमीराम या गावात पडतो, अशी नोंद सर्वत्र आहे.

देशात सर्वाधिक पाऊस कुठे पडतो? हा प्रश्न सामान्यज्ञान स्पर्धेत हमखास विचारला जातो. आयएएस किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेतही हा प्रश्न परीक्षार्थी पाठ करून जातात. त्याचे छापील उत्तर एकच येते मेघालय राज्यातील चेरापुंजी हे गाव. मात्र, अलिकडच्या काळात त्याच राज्यातील मोसमीराम या गावाने चेरापुंजीलाही मागे टाकत पहिला क्रमांक मिळवल्याची नवी नोंद आहे. मात्र, मान्सूनने ताम्हिणी घाटाचे नाव चर्चेत आले. कारण तेथे यंदा जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत सुमारे १० हजार मिमीच्या जवळपास पाऊस पडला. ताम्हिणी येथे दरवर्षीची सरासरी कमीत कमी ५ ते ६हजार मिमी इतकी आहे, मात्र प्रत्यक्षात तेथे ९ हजार ते ९ हजार ५०० मिमी पाऊस पडतो. यंदा जून ते सप्टेंबर या काळात येथे तब्बल ९ हजार ८०० मिमी म्हणजे सुमारे दहा हजार मिमीच्या पाऊस झाला आहे.

**ताम्हिणी घाटाच्या पावसाची वैशिष्ट्ये**

- ताम्हिणीचा मान्सूनचा पाऊस हा वाऱ्याच्या दिशेने असलेल्या स्थानकांपेक्षा जास्त आहे.
- सर्वमान्यपणे स्वीकारल्या जाणाऱ्या मताच्या विरुद्ध हे संशोधन आहे. कारण पर्वतांच्या बाजूने पाऊस कमी पडतो, हे खोडून काढले आहे.
- अल निनो असो किंवा ला-निना असो दुष्काळातही तेथे एका दिवसात तब्बल ६९५ मिमी पाऊस पडल्याची नोंद आहे. तीन दिवसांचा सरासरी पाऊस १०५५ मिमी गणला गेलाय.
- ताम्हिणीजवळील मुळशी कॅम्प, शिरगाव, दावडी आणि आंबवणे या घाटमाथ्यावरील गावांसह महाबळेश्वर येथील मोसमी पावसाचे प्रमाण जास्त आहे.
- ताम्हिणी हे स्टेशन मुळा नदीपात्रातील हवामान शास्त्रीय उपविभाग आहे.
- या शास्त्रज्ञांनी अभ्यासासाठी घाटमाथ्यावरील मुळशी- कॅम्प, शिरगाव, दावडी, आंबवणे आणि ताम्हिणी क्षेत्राची निवड केली.
- महाराष्ट्रात सर्वाधिक पाऊस महाबळेश्वर येथे पडतो असे मानले जाते. पण, ताम्हिणीचा पाऊस त्याच्या दीड ते पावणेदोन पटीने जास्त आहे.
- पुण्यातील या चारही शास्त्रज्ञांनी देशातील इतर दिग्गज हवामान शास्त्रांचे दावे खोडत ताम्हिणीचे महत्त्व पटवून दिले.
- एका दिवसात ताम्हिणी घाटावर तब्बल ४०० ते ८०० मिमी पाऊस मान्सून मोसमात पडतो.

## बोलेरोच्या धडकेत महिला ठार



**शिक्रापूर :** पिंपळे जगताप येथील शिक्रापूर-चाकण रस्त्यावर बोलेरोच्या धडकेत दुचाकीवरुन चाललेली अश्विनी गणेश सासवडे हि महिला जागीच ठार होऊन त्यांचा मुलगा रुद्र सासवडे सुदैवाने बचावला असल्याची घटना घडली. शिक्रापूर पोलिसांनी अज्ञात बोलेरो चालकावर गुन्हा दाखल केला आहे. शिक्रापूर-चाकण रस्त्यावरुन गितांजली हॉटेलमधून अश्विनी सासवडे या त्यांच्या मुलाला सोबत घेऊन दुचाकीहून शिक्रापूरडे जात असताना, बोलेरो वाहनाची अश्विनी यांच्या दुचाकीला जोरदार धडक बसली. पाठीमागे बसलेला त्यांचा मुलगा रुद्र याने दुचाकीहून उडी मारून तो बाजूला गेला.

» Selected

## श्रीराम मंदिरात काकडा आरती समारोप उत्साहात



**उरुळी कांचन :** कोजागिरी पौर्णिमा ते त्रिपुरी पौर्णिमा असे काकडा आरतीचे नियोजन दरवर्षी प्रमाणे श्रीराम मंदिरात मोठ्या उत्साहात करण्यात आले होते. या काकडा आरतीचा समारोपाची समाप्ती मोठ्या उत्साहाच्या वातावरणात हभप विशाल इंगळे यांच्या हरि किर्तन सेवेने करण्यात आली. कार्तिक मास सुरुवात झाल्यापासून दररोज काकडा आरती व ग्रामदेवतांना अभिषेक करण्यात येतो. काकड आरती दरम्यान पहाटेची भूपाळी, भजन, किर्तन, पूजन आदी कार्यक्रम दररोज करण्यात आले. कार्तिक मास काकडा आरती समारोह समाप्ती निमित्ताने पहाटे ६ वाजता सामूहिक काकडा आरती करण्यात आली. महिनाभर ज्या भाविकांनी काकडा आरती साठी सहकार्य केले त्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उरुळी कांचन मधील ग्रामपंचायत, सरपंच, उपसरपंच, ग्रा.प.सदस्य, भैरवनाथ समितीचे सर्व पदाधिकारी, श्री देवस्थान समितीचे सर्व विश्वस्त, श्रीराम जन्मोत्सव समिती कार्यकारणी सदस्य, श्रीराम बचत गट, समस्त महिला वर्गाने विशेष परिश्रम घेतले. माऊली कांचन, प्रा. के. डी. कांचन, सरपंच अमितबाबा कांचन, तुकाराम न. कांचन, हभप सुरेश कांचन, युवराज कांचन, विनोद कांचन, महादेव कांचन, अशोक कसबे, संजय वनारसे, रोहिदास मुरकुटे, चंद्रकांत पवार, लालासो कांचन, विलास लोंढे, शरद कुंभार, अवधूत राऊत यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## पिकअप रस्त्यावर जळून खाक

**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा गावाच्या हद्दीमध्ये वढू बुद्रुक ते सणसवाडी रस्त्यावर एका पिकअप वाहनाला अचानकपणे लागलेल्या आगीने पिकअप पूर्णपणे जळून खाक झाली. शिक्रापूर पोलिसांनी आकस्मात



जळीत प्रकरणी नोंद केली आहे. वढू बुद्रुक येथील विशाल गुंडाळ हे त्यांच्या ताब्यातील पिकअप घेऊन सणसवाडीकडे जात असताना, कोरेगाव भीमा गावच्या हद्दीमध्ये आल्यानंतर गाडीच्या पुढील भागातून अचानकपणे धूर येऊ लागल्याने, विशाल यांनी खाली उतरुन पिकअपचे बोनेट उघडत असतानाच अचानक पिकअपला मोठी आग लागली. दरम्यान, विशाल यांनी आग विझवण्याच्या प्रयत्न केला. मात्र, आगीत वाहन पूर्णपणे जळून खाक होऊन खाक झाले. सुदैवाने कोणतीही हानी यामध्ये झाली नाही. शिक्रापूर पोलिसांनी आकस्मात जळीत प्रकरणी नोंद केली आहे.

## सासवडला पुष्पक रथाचे लोकार्पण

**सासवड :** सासवड शहर व परिसरातील मृत व्यक्तींना स्मशानभूमी पर्यंत नेण्यासाठी बनवण्यात आलेल्या शववाहिनी म्हणजेच पुष्पक रथाचे लोकार्पण नुकतेच करण्यात आले. सामाजिक क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानच्या वतीने हा उपक्रम कार्यान्वित करण्यात आला आहे. श्री संत सोपानदेव महाराज यांच्या जन्मोत्सव निमित्ताने आणि त्रिपुरारी पौर्णिमेच्या दिवशी या रथाचे संत सोपानदेव मंदीर परिसरात देवस्थानचे हभप अ‍ॅड गोपाळ महाराज गोसावी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. देवस्थानचे चोपदार सिद्धेश शिंदे, ज्येष्ठ नागरिक संघटनेचे संजय काटकर व स्वप्नील महाराज काळाणे यांनी या प्रसंगी प्रतिष्ठानच्या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप यांनी उपस्थितांचे आभार मानले. तुकाराम गिरमे, दादासाहेब भुजबळ, ऊत्तम जगताप, संभाजी महामुनी, पांडुरंग जगताप, बबन टिळेकर,बाळासो जगताप, सनीनाना जगताप, बिट्टू शिवरकर, बेबी जगताप, गणेश चौधरी, ओंकार निरगुडे आदी या प्रसंगी उपस्थित होते

# संजीवन समाधीनिमित्त आळंदी येथे अखंड हरिनाम सप्ताह

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अवसरी :** माऊलींच्या पायी वारी सोहळ्यातील आजामेळा दिंडी क्रमांक २६ च्या वतीने आळंदी देवाची (ता. खेड) येथील धर्मशाळेत कैवल्य सम्राट चक्रवर्ती ज्ञानेश्वर महाराज संजीवन सोहळ्यानिमित्त शुक्रवार (दि. २१ ) ते गुरुवार (दि. २८ ) नोव्हेंबर रोजी अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित केला आहे, असे या सप्ताहाचे संयोजक हभप मधुकर महाराज गायकवाड यांनी सांगितले.

या सप्ताहात पहाटे ५ ते ७ काकडा भजन, सकाळी ७ ते ९ श्री ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी १० ते ११ गाथा भजन, सायंकाळी ५ ते ६ वाजता प्रवचन, सायंकाळी ६ ते ७ वाजता हरिपाठ, रात्री ७ ते ९ वाजता वारकरी सांप्रदायिक श्रीहरी कीर्तने असे दैनंदिन कार्यक्रम संपन्न होणार आहेत. तसेच या सप्ताहात संतोष महाराज गावडे (गावडेवाडी), गणेश महाराज हिंगे (अवसरी बुद्रुक), पंढरीनाथ तांबे सर (अवसरी खुर्द), प्राचार्य डॉ . पांडुरंग गायकवाड (मंचर), अर्जुन महाराज पंचरास (लोणी), संजीवनी ताई गायकवाड /मंडलिक (लांडेवाडी), नानासाहेब लोंढे (खेड), बाळासाहेब लोंढे (खेड), डॉ. हेमलता सोळवंडे (काळेवाडी, पुणे), रवींद्र महाराज कांबळे (पुणे), संभाजी महाराज लोंढे (पुणे), अनाजी महाराज शेळके (गावडेवाडी), सुरेश महाराज गावडे (गावडेवाडी) या महाराजांची प्रवचन रूपाने सेवा होणार आहे.

या अखंड हरिनाम सप्ताहात हभप तान्हाजी महाराज तांबे (शिरदाळे), हभप संदीप महाराज गावडे (आळंदी), हभप अशोक महाराज हाकाळे गेवराई (बीड), हभप दत्तात्रय महाराज रुकारी (कोल्हारवाडी), हभप दीनानाथ महाराज शिंदे (आदर्श ग्राम गावडेवाडी), हभप भीमाताई ज्ञानदेव लोंढे (वारू, ता . मावळ), हभप आदिनाथ महाराज जुन्नरकर (खडकी) यांची वारकरी सांप्रदायिक श्रीहरी कीर्तने होणार आहेत. या सप्ताहाची सांगता सप्ताहाचे संयोजक हभप मधुकर महाराज गायकवाड यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे.

## त्रिपुरा पौर्णिमेनिमित्त जेजुरी गडावर दीपोत्सव

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या श्री खंडोबा मंदिर गडकोटावर त्रिपुरा पौर्णिमा निमित्त दीपोत्सव साजरा करण्यात आला.त्यानिमित्त जेजुरी खंडोबा मंदिरासमोरील भव्य आकर्षक रांगोळी काढण्यात आली तसेच शेकडो दिवे लावून दीपोत्सव साजरा करण्यात आला.

# श्री केदारेश्वर मंदिरात त्रिपुरी दीपोत्सव



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** येथील श्री केदारेश्वर मंदिरात मोठ्या उत्साहात दीपोत्सव साजरा करण्यात आला. मंदिराचा संपूर्ण परिसर दिव्यांनी उजळून निघाला. या संपूर्ण परिसर व गाभारा यात १००० पेक्षा जास्त दिवे लावण्यात आले होते. राजगुरुनगर परिसरातील या मंदिरास ऐतिहासिक वारसा आहे. हे मंदिर किमान १५० ते २०० वर्ष जुने आहे. गाभाऱ्यातील शिवलिंग हे वालुकामय खडकाचे आहे. पूर्वी हे मंदिर पूर्ण लाल विटांचे होते व बाहेरील सभा मंडपास दक्षिण, उत्तर व पूर्व असे तीन दरवाजे होते. पुढील काळात मंदिराचा जिर्णोद्धार केला गेला.

मंदिराच्या मागील पश्चिम बाजूस जी समाधी आहे ती केशव गोपाळ दीक्षित यांची आहे. १८१८ साली इंग्रज राजवट आल्यावर केशव दीक्षित व त्यांचे पुतणे विनायक दीक्षित हे किल्ले अहमदनगर येथे जाऊन हेंद्री पॉटींजर या कलेक्टर भेटले. मराठी राज्यात मिळालेल्या इनामांच्या सनदा कायम करून घेतल्या. पूर्वी समाधीच्या मागे पश्चिम दिशेला मंदिराच्या मठाची वास्तू होती. संत चंडीराम महाराज व त्यांचे गुरु शेषाद्री महाराज हे अकोला, वाडा, घोडेगाव, चास मार्गे प्रवास करत खेड येथे आले असताना त्या दोघांचे वास्तव्य याच केदारेश्वर मंदिराच्या मठात व परिसरात होते. मंदिराच्या दक्षिणेस वैशंपायन यांची समाधी आहे. अशा या पुरातन मंदिर परिसरात त्रिपुरी पौर्णिमेनिमित्त त्रिपुर लावण्यासाठी महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. शरद दीक्षित, सतीश दीक्षित, सुदर्शन दीक्षित, ओंकार राऊत, मंदार खाडे, मंदार शिंदे, प्रशांत चव्हाण,रोहित मुळूक, सुरेश शेलार, देव रावळ, चैतन्य घोलप, अजिंक्य सातकर आदींनी संपूर्ण परिसरालत व महादेवाच्या गाभाऱ्यातील शिवपिंडीला फुलांची फुलांची व दिव्यांची सजावट केली.

पान १ वरून

## उद्धव ठाकरे हे जनाब उद्धव...

अमरावतीमध्ये दर्यापूर विधानसभा मतदारसंघातील खल्लार या गावात नवनीत राणा यांच्या सभेदरम्यान शनिवारी रात्र राडा झाला. यावेळी नवनीत राणा यांचे भाषण सुरू असताना काही लोकांनी जोरदार घोषणाबाजी करत गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. यावेळी नवनीत राणा यांच्या दिशेने खुर्च्या फेकत काही लोकांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर आज नवनीत राणा यांनी माध्यमांशी संवाद साधत काल झालेल्या सभेत नेमके काय घडले, याबाबत माहिती सांगितली.

नवनीत राणा म्हणाल्या की, ज्या गावात हा प्रकार घडला, ते गाव ठाकरे गटाच्या तालुकाध्यक्षांचे आहे. आधी व्यासपीठावरून गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी परवानगी दिल्यानंतर आम्ही सभेसाठी व्यासपीठ उभे केले होते. मात्र, त्यानंतर त्या सभेला मला उशीर झाला. हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर ते सभेसाठी आलेल्या महिला आणि लोकांबाबत अपशब्द बोलत होते. त्यांना बघून शिट्या मारत होते. अशा पद्धतीचा व्यवहार त्यांनी केला, असा आरोप त्यांनी केला.

## उपकेंद्र सुरू करण्यास हिरवा कंदील

कतारमध्ये शैक्षणिक केंद्र सुरू केले. या केंद्रात बी.एस्सी (संगणकशास्त्र), मानसशास्त्र आणि एमबीए हे पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू केला आहे.

कतारमधील जवळपास ४५१ विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतला असून, येथील प्रतिसाद पाहत नव्याने विचारणा झालेल्या चार देशांमध्येही शैक्षणिक उपकेंद्र सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने सांगितले.

## पुणे शहर पोलिस सहआयुक्तांनी काढले आदेश

आचारसंहितेमध्ये नमुद केलेल्या नियमातील तरतुदीनुसार प्रतिबंधित बाबी घेवून जाण्यास मनाई करण्यात आली आहे. मतदान केंद्रांचे (इमारतीचे) १०० मीटर परिसराचे आतील सर्व व्यावसायिक दुकाने, रेस्टॉरन्ट, टपऱ्या (अत्यावश्यक सेवा वगळून) सर्व आस्थापना बंद ठेवावेत. तसेच सर्व राजकीय व्यक्ती किंवा राजकीय पक्षाशी संबंधीत कोणतीही व्यक्ती ते ज्या विधानसभा मतदार संघाचे मतदार नाहीत, त्या मतदार संघात थांबणेस / वास्तव्य करणेस प्रतिबंध करण्यात आले आहे. या कालावधील बेकायदेशीर जमाव करणे, सार्वजनिक सभा / बैठका घेणे. पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोक एकत्र येणे व पदयात्रा बंदी घालण्यात आली आहे.

## ...तोफा थंडावणार

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिलेला नारा राज्यात किती प्रभावी ठरतो, हे २३ तारखेला स्पष्ट होईल. महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार यांनीही बटेंगे तो कटेंगे राज्यात चालणार नाही, असे सांगितले.

## ... जुन्नरमध्ये धक्का

उडाली. एका इंस्टाग्राम पेजवरून नारायणगाव आणि जुन्नर परिसरातल्या काही ग्रुपवर ही चित्रफीत व्हायरल केली गेली. तालुक्यातील शरद सोनवणे समर्थक महिलांनी तातडीने आळेफाटा पोलीस स्टेशनवर रात्री उशिरा मोर्चा काढला.

## ...बॅगचीही तपासणी

असलेल्या बॅगा आणि साहित्याची निवडणूक आयोगाच्या कर्मचा-यांकडून तपासणी करण्यात आली. यावेळी त्यांच्या बॅगेत कपडे, पाण्याची बॉटल, वर्तमानपत्र आणि काही महत्त्वाची कागदपत्रे त्या बॅगेत सापडले.

**जाहीर प्रकटन**

तमाम बारामती, ता. बारामती, जि. पुणे येथील लोकांना कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. राहुल दरबार पवार, रा. बी-५०१, रेलिकॉन गार्डन सोसायटी, दत्तनगर चौक, कात्रज, पुणे-४६ यांनी दिलेल्या माहितीवरून व दाखविलेल्या कागदपत्रावरून खाली वर्णन केलेले मुळ दस्त व नोंदणी पावती हरविले बाबत जाहिर प्रकटन देणे संदर्भात कळविलेवरून हे जाहिर प्रकटन देण्यात येते की, श्री. राहुल दरबार पवार यांनी मे. उत्कर्ष डेव्हलपर्स अँड असोसिएटतर्फे श्री. नितीन पोपट जगताप यांच्याकडुन श्री. राहुल दरबार पवार यांनी मूळ साठेखत दिनांक १२/०३/२०१२ रोजी दस्त नं. २३३६/२०१२ अन्वये साठेखत करून घेतलेले होते. तथापि सदरील मुळ साठेखत दस्त हा दिनांक ०१/११/२०२४ रोजी श्री. राहुल दरबार पवार यांचेकडून गहाळ झालेला असून त्या संदर्भात त्यांनी पुणे शहर पोलीस भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात रितसर तक्रार नोंदविलेली आहे. सदर तक्रारीचा एफआयआर नं. १६४१६८/२०२४ दिनांक १७/११/२०२४ नोंदवलेली आहे. श्री. राहुल दरबार पवार यांनी सदरील मिळकतीवर कर्ज घेणेकरिता वित्तीय संस्था यांचेकडे कर्ज प्रकरण केलेले असून सदर कर्ज प्रकरणाकरिता मुळ साठेखत दस्त सदर वित्तीस संस्थेस देणे आवश्यक आहे. सबब सदर मुळ साठेखत दस्त कोणास सापडल्यास तो त्यांनी खाली नमुद केलेले माझे पत्त्यावर अथवा आमचे अशिलाचे पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसात आणून द्यावे तसेच सदरील मुळ साठेखत दस्ताचे आधारे कोणीही, कोणत्याही स्वरूपाचे व्यवहार करू नयेत.

येणे प्रमाणे जाहीर प्रकटन दिले असे.

**सही व शिक्का/ अशिलांतर्फे**
**अ‍ॅडव्होकेट श्री. सुनिल ईश्वर वसेकर**
**लॉयर्स चेंबर्स, गाळा नं. १३, न्यायमंदिराजवळ, भिगवण रोड, बारामती, जि. पुणे/ मो.नं. ९९६०११४३११**

## चाकण बाजारभाव : एकूण उलाढाल ४ कोटी ९० लाख रुपये

# कांद्याच्या आवकेत घट; डांगर भोपळा, मिरची, बटाट्याची आवक वाढली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये डांगर भोपळा, परवल व हिरव्या मिरचीची मोठी आवक झाली. बटाटा, लसूण व मेथीचे भाव तेजीत राहिले. एकूण उलाढाल ४ कोटी ९० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ९०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ३५० क्विंटलने घटली. कांद्याचा कमाल भाव ६,००० रुपयांवर स्थिरावला. बटाट्याची एकूण आवक २ हजार ५०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक १,००० क्विंटलने वाढली. बटाट्याचा कमाल भाव ३,८०० रुपयांवर पोहोचला. लसणाची एकूण आवक ५० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ३० क्विंटलने वाढली. लसणाचा कमाल भाव ३२,००० रुपयांवर पोहोचला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३९५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला २ हजार रुपयांपासून ते ४ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.



**शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे –**

- **कांदा** - एकूण आवक - ९०० क्विंटल. भाव क्रमांक - १. ६,००० रुपये, भाव क्रमांक २. ५,००० रुपये, भाव क्रमांक ३. ३,००० रुपये.
- **बटाटा** - एकूण आवक - २,५०० क्विंटल. भाव क्रमांक १. ३,८०० रुपये, भाव क्रमांक २. २,९०० रुपये, भाव क्रमांक ३. २,५०० रुपये.

**फळभाज्या :** फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

टोमॅटो - २९० क्विंटल (२,००० ते ३,००० रू. ), कोबी - २३६ क्विंटल ( २,५०० ते ३,००० रू.), फ्लॉवर - २०८ क्विंटल ( २,००० ते २,५०० रु.), वांगी - ८३ क्विंटल ( ४,५०० ते ५,५०० रु.), भेंडी - ७८ क्विंटल ( ४,५०० ते ५,५०० रु.), दोडका - ६३ क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु.), कारली - ७६ क्विंटल ( २,५०० ते ३,५०० रु.), दुधीभोपळा - ६३ क्विंटल ( १,००० ते ३,००० रु.), काकडी - ११८ क्विंटल ( ८०० ते १,५०० रु.), फरशी - ५८ क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु.), वालवड - ५६ क्विंटल ( ६,००० ते ८,००० रुपये), ढोबळी मिरची - १७० क्विंटल ( ५,००० ते ७,००० रु.), चवळी - ४० क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), शेवगा - ३३ क्विंटल ( ५,००० ते ७,००० रु.), गाजर - १५० क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु.), गवार - ५६ क्विंटल (५,००० ते ८,००० ),.

**पालेभाज्या :** चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे -

मेथी - एकूण १० हजार ९५० जुड्या ( २,००० ते ३,००० रुपये ), कोथिंबीर - एकूण ३२ हजार ५०० जुड्या ( ५०० ते ८०० रुपये,), शेपू - एकूण ४ हजार १०० जुड्या ( १,००० ते १,४०० रुपये ), पालक - एकूण ३,६८० जुड्या (१,००० ते १,५०० रुपये),.

**जनावरे :** चाकण येथील जनावरांच्या बाजारात विक्रीसाठी आलेल्या ४५ जर्शी गाईपैकी ३५ गाईची विक्री झाली.( १०,००० ते ४०,००० रु.), ८५ बैलांपैकी ७५ बैलांची विक्री झाली.( १०,००० ते ४०,००० रु.), ११० म्हशीपैकी ९० म्हशींची विक्री झाली. ( २०,००० ते ८०,००० रु.), ९ हजार ९२० शेळ्या - मेंढ्यापैकी ९,४४० शेळ्यांची विक्री झाली. ( २,००० ते १५,००० रु.),. #रा

# अन्यथा धरण उशाशी अन् शेतकरी उपाशी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** मी कधीही दुसऱ्याच्या तोंडातला घास काढणार नाही. डिंभे धरणाचे ओव्हरफ्लोचे पाणी सोडायचे आहे, ते वरच्या पातळीवरच झाले पाहिजे, याची खबरदारी आपण घेणार आहोत. अन्यथा धरण उशाशी अन् जुन्नरचा शेतकरी उपाशी हे चालणार नाही, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ओतूर येथे बोलताना स्पष्ट केले.

महायुतीचे उमेदवार तथा विद्यमान आमदार अतुल बेनके यांच्या प्रचारार्थ सभेत अजित पवार बोलत होते. यावेळी पुणे म्हाडाचे अध्यक्ष तथा माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील, जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर, जुन्नर बाजार समितीचे सभापती संजय काळे, पांडुरंग पवार, गणपतराव फुलवडे, पूजा बुट्टे, सूर्यकांत ढोले,




भाऊ देवाडे, पापा खोत, मारुती वायाळ, काळूराम शेळकंदे, फिरोज पठाण, उज्ज्वला शेवाळे, सुप्रिया लेंडे, पुष्पाताई गोसावी, प्रकाश ताजणे, विकास दरेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले की, नगरच्या भाषणात पावसाचा पडणारे पाणी पश्चिमेकडे जाऊन समुद्राकडे जाते ते वळवण्यासाठी ८५ हजार कोटींच्या प्रकल्पाला मान्यता दिली. प्रकल्पाचे पाणी आपल्याला नाशिक आणि नगर जिल्ह्यामध्ये आणायचे आहे, असे सांगण्याचा नगरच्या सभेत मी प्रयत्न करीत होतो; परंतु माझ्या भाषणाच्या क्लिप मध्ये छेडछाड करून चुकीच्या पद्धतीने व्हायरल करण्यात आली.

जुन्नर विधानसभेच्या निवडणुकीत अतुल बेनके तालुक्याला धडाकेबाज आमदार लाभलेला आहे. ते मतदारसंघातील सिंचनाचा, रोजगाराचा, पाण्याच्या प्रश्नासाठी सातत्याने काम करीत असून जुन्नरकरांच्या सुखदुःखात सहभागी होत आहे. त्यांनी कधी जातीपातीचा, नात्यागोत्याचा विचार केला नाही. आम्ही सर्व धर्म समभाव विचाराचे आहोत. महायुतीचे सरकार आणण्यासाठी आपल्या पवित्र मतांची गरज असून अतुल बेनके यांना बहुसंख्य मतांनी विधानसभेत पाठवा, असे आवाहन त्यांनी केले.



## डिंभे धरणावरून अजित पवार यांनी दिला इशारा



## बेनके यांना पुन्हा विधानसभेवर पाठवायचे आहे...

● जुन्नर शहरात मोठे रॅली निघाल्याचे कळले; परंतु त्याचे रुपांतरण मतदानात झाले पाहिज, अन्यथा फतवा निघाला असे सांगून मतपरिवर्तन करू नका. स्व. वल्लभ बेनके हयात नसताना अतुल बेनके यांची पहिली निवडणूक आहे. त्याला याला पोरका करायचा नाही. बेनके कुटुंबीयाने जुन्नरची खूप सेवा केली आहे. मी स्वतः अतुल बेनके यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा आहे. अतुल हे कष्ट करणारा, शांत स्वभावाचा आहे. त्यांना बहुसंख्या मतांनी अतुल बेनके यांना पुन्हा विधानसभेत पाठवून स्व. वल्लभ बेनके यांना श्रद्धांजली वाहायची आहे, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले.

## अजित पवारांचा बारामतीत झंझावात



**बारामती :** विधानसभा निवडणुकीचा प्रचार ऐन भरात आला असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्रात सर्वत्र सभा घेण्याचा धडाका कायम ठेवला आहे. त्याचवेळी त्यांच्या स्वतःच्या बारामती मतदारसंघातही त्यांनी गावोगावी जात ग्रामस्थांची थेट भेट घेण्याचे धोरण अवलंबले आहे. कऱ्हावागज गावात जाऊन अजित पवार यांनी ग्रामस्थांची स्नेहपूर्ण भेट घेतली. गावातील अनेक वर्षे प्रलंबित पाण्याचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार आहे, त्या दिशेने वेगाने पावले टाकली जात आहेत. पिण्याचे आणि शेतीसाठी पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध केले जाईल. अन्य विकास कामे देखील हाती घेतली जातील, असा शब्द त्यांनी गावकऱ्यांना दिला.

बारामतीतील माळेगाव खु. आणि ढाकाळे या गावांनाही त्यांनी भेट दिली, ग्रामस्थांशी मनमोकळा आपलेपणाचा संवाद साधला. गावातील प्रलंबित कामांकडे जातीने लक्ष देऊन ती मार्गी लावू, असा विश्वास दिला. तसेच गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेत त्यावर ठोस पावले उचलू, असे आश्वस्त केले.

राज्यात विधानसभा निवडणुकांच्या प्रचाराचा अंतिम टप्पा सुरु आहे. अनेक नेते दावे-प्रतिदावे करत आहेत. अशातच "सर्वांगीण विकासासाठी आगामी निवडणुकीमध्ये महायुतीच्याच सर्व उमेदवारांना निवडून देत राज्यात युतीची सत्ता आणायची आहे. बारामतीकरांनीही लोकसभेला जशी आमची गंमत केली, तशी करू नये," अशी साद उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मतदारांना घातली आहे. अजित पवार यांनी शनिवारी बारामती तालुक्यात वेगवेगळ्या ठिकाणी प्रचार सभा घेतल्या. त्यात बोलत असताना त्यांनी ही अपेक्षा व्यक्त केली आहे.

# दिलीप मोहिते-पाटील मंत्रिमंडळात असतील

## एक लाखाच्या मताधिक्याने विजयी करण्याचे अजित पवार यांचे आवाहन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** दिलीप मोहिते पाटील माझ्या सोबत मंत्रिमंडळात असतील. त्यांना एक लाखाच्या मताधिक्याने विजयी करा. नाशिक फाटा ते राजगुरुनगर पर्यंत मेट्रो आणणार हा आमचा वादा असून, शासकीय योजना सुरू राहण्यासाठी मतदारांनी महायुतीला साथ द्यावी, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

खेड आळंदी विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रचार सभेचे आयोजन चाकण येथे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी अजित पवार बोलत होते.

अजित पवार म्हणाले की, महायुतीच्या सर्वात जास्त जागा निवडूण येण्यासाठी आम्ही सर्वजण एकत्र येऊन काम करत आहोत. मंचावर सगळे जण महायुतीचे पदाधिकारी एकत्र आहेत. केंद्रात आपल्या विचारांचे सरकार आहे. लोकसभा निवडणुकीत पॉइंट ६ टक्के मते फक्त कमी पडली. विरोधकांनी चुकीचा नरेटिव्ह सेट केला. घटना बदलणार आहेत, असे सांगितले. फेक नरेटिव्ह विरोधकांनी सेट करुन जनतेत संभ्रम तयार करण्याचे काम केले, असा आरोप त्यांनी केला. आमच्या सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला. उसावरील इन्कम टॅक्स रद्द केला. शेतकऱ्याच्या उसाला चांगला हमी भाव आम्ही देतोय. नाशिक फाटा ते राजगुरुनगर पर्यंत आम्ही मेट्रो करतोय. हा आमचा वादा आहे. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी अतिक्रमणे हटविली, त्यामुळे छोटे व्यवसायिक नाराज झाले. पण सगळ्यांना खुश ठेवताना काही जण नाराज होतात, असेही ते म्हणाले. सूत्रसंचालन आदेश टोपे यांनी, तर आभार राम गोरे यांनी मानले.



# शेतकऱ्यांचे संसार सुरक्षित ठेवणे हेच माझे काम

## सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांचे प्रतिपादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आंबेगाव:** आंबेगाव, शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे हक्काचे पाणी नगर जिल्ह्यात जाऊ नये, याचसाठी आपण राजकीय निर्णय घेतले. तालुक्यातील जनतेचे संसार सुरक्षित ठेवणे, हेच माझे काम आहे. आपण पाण्यासाठी ही निवडणूक लढवत आहोत. जनतेने मला पुन्हा एकदा संधी द्यावी, असे प्रतिपादन सहकारमंत्री व महायुतीचे उमेदवार दिलीप वळसे पाटील यांनी केले.

घोडेगाव (ता. आंबेगाव ) येथे आंबेगाव शिरूर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार दिलीप वळसे पाटील यांच्या प्रचारार्थ महाविजय निर्धार सभा झाली. यावेळी वळसे पाटील बोलत होते. माजी खासदार व म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, शरद सहकारी बँकेचे अध्यक्ष देवेंद्रशेठ शहा, भीमाशंकर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे, भाजपा किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय थोरात, वसंत काळे, माजी सभापती कैलासबुवा काळे, सखाराम घोडेकर, अजय आवटे, सुर्यकांत वाघमारे, अजित काळे, रूपाली झोडगे, सरपंच अश्विनी तिटकारे, क्रांती गाढवे, रत्ना गाडे, ज्योती घोडेकर, तुलसी भोर, दादाभाऊ पोखरकर, नवनाथ हुले, संतोष सैद, कपिल काळे, कपिल सोमवंशी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.



घोडेगाव (ता. आंबेगाव ) येथे महाविजय निर्धारसभेत बोलताना महायुतीचे उमेदवार दिलीप वळसे पाटील.

दिलीप वळसे पाटील म्हणाले, प्रत्येक निवडणुकीत देश किंवा राज्य पातळीवर एखादा विषय असतो. त्यावर निवडणूक लढवली जाते. मात्र, आता आपल्यासमोर डिंभे धरणाच्या पाण्याचा प्रश्न उभा राहिला आहे. डिंभे धरणाला बोगदा करण्यासाठी नगर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी रोहित पवार, खासदार नीलेश लंके, घनश्याम शेलार, उद्धव ठाकरे, अण्णा हजारे एकत्र आले आहेत. हा बोगदा झाला, तर डिंभे धरण तीन महिन्यातच रिकामे होऊन तालुक्यात पुन्हा दुष्काळी स्थिती निर्माण होईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. देवदत्त निकम यांनी बोगद्यावर बोलणे टाळून ईडी, सीबीआयच्या भीतीमुळेच आपण पवारांची साथ सोडल्याचे सांगत सुटले आहेत. मात्र, माझ्यासाठी पाण्याचा विषय हा महत्त्वाचा असून, काही झाले तरी मी शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी बोगद्याद्वारे नगर जिल्ह्यात जाऊ देणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.



# माऊली कटके यांचा विजय निश्चित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिरूर :** आजच्या या प्रचार सभेला जमलेली गर्दी बघता माऊली कटके यांचा विजय आजच निश्चित झालेला आहे. याच विजयाच्या जोरावर सध्या बंद असलेला घोडगंगा सहकारी साखर कारखाना पुढल्या वर्षी सुरू करणार आहे. उसाचा गळीत हंगाम सुरू झाला आहे. आपल्या उसाचे काय होणार? म्हणून शेतकरी वर्ग घाबरलेला आहे. मात्र, शेतकऱ्यांनो तुम्ही घाबरू नका. तुमच्या शेतातील ऊस नेण्यासाठी दौंड शुगर, अंबालिका, पराग, श्रीनाथ म्हस्कोबा, सोमेश्वर व माळेगाव कारखान्याला सांगू. तुमच्या शेतात उसाचे एक टिपरु सुद्धा दिसू देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे.

शिरूर हवेली विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर कटके यांच्या प्रचारानिमित्त न्हावरे येथील सभेत ते बोलते होते. शिरूर हवेली विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर कटके यांच्या प्रचारानिमित्त न्हावरे येथे रविवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास सभेचे आयोजन करण्यात आले होते.

# आंबेडकरी चळवळीला प्रस्थापित राजकारणात प्रतिष्ठा कधी ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** सत्ताधारी राजकारणी पक्षा सह विरोधकांना देखील "पुरोगामी चेहरा "आत्मसात करण्यासाठी आंबेडकरी चळवळ व समाज आपल्या पक्षामध्ये निवडणुक काळात असणे आवश्यक व गरजेचे वाटते. फुले, शाहू आंबेडकर, अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांची चळवळ नेटाने पुढे चालविणाऱ्या नेतृत्वाला पक्षीय राजकारणात प्रवेश दिला जातो मात्र तालुकास्तरावर त्यांना राजकीय प्रक्रियेत डावलले जात असल्याने आंबेडकरी जनतेत पक्षीय कार्यपध्दती बद्दल नाराजीची भावना निर्माण होताना दिसत आहे.

दलित बहुजन समाजातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते यांचा केवळ मागासवर्गीय नेतृत्वाचा चेहरा दलित मतावर डोळा ठेवून त्याचा



नुसता पक्षीय प्रवेश केला जातो परंतु त्यांना राजकारणातील प्रक्रियेत समावून घेतले जात नाही अशी नाराजीची भावना समाजात आहे. समाजाच्या हिताच्या प्रश्नांना व मतदारांना महत्व प्राप्त करून देता येत नसेल तर सध्याच्या विधानसभा निवडणूकीसह आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणुकात आंबेडकरी चळवळीची ताकद समाज निश्चितपणाने दाखविल.

तसेच दलित बहुजन समाज नेत्यानी एकत्र येऊन भविष्य काळाचा निकाल या निवडणुकीच्या निमित्ताने घेणे गरजेचे आहे नाही. केवळ राजकीय निवडणुका कामासाठी समाजाचा व त्यांच्या नेतृत्वाचा वापर होणार असेल आणि निवडणूका नंतर सत्तेचा उपयोग समाजासाठी होणार नसेल तर स्वार्थासाठी पाठींबा देणा-या व राजकीय कामासाठी दुसऱ्या पक्षात जावून काम करणाऱ्या नेत्यांना नेतृत्वाला समाजात मते मागण्यासाठी समाज फिरु देणार नाही.त्यांना जाब विचारेल अशी तीव्र प्रतिक्रिया मागासवर्गीय समाजातून उमटत आहे.

**तात्यांची उणीव पण रत्नाकरची उपेक्षा**

तालुक्यातील मागासवर्गीय समाजातील 'दलितांच्या राजकारणाचे समाज कारणाचे दादूमिया' म्हणून ओळख असणारे स्मृती शेष रत्नाकर मखरे (तात्या) पूर्वाश्रमीचे महार व आताचे नवबौध्द, मातंग, चर्मकार समाजातील व बहुजन समाजातील वंचित, अन्यायग्रस्त, पिडीत लोकांना न्याय मिळवून देणारे, त्यांच्या आत्मसन्मानासाठी, स्वाभिमानासाठी प्रयत्न करणारे, फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीचे नेतृत्व करणारे "मखरे तात्या" त्यांचे पश्चात ही पहिलीच विधानसभा निवडणुक पार पडत आहे.

» क्रमशः

#रा

# लाडक्या बहीणींना पैसे मिळू न देणाऱ्या आघाडीला धडा शिकवा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिरूर :** लाडक्या बहीण योजनेतून महिलांना पैसे मिळू नये यासाठी महाविकास आघाडीने खूप प्रयत्न केले. यासाठीच त्यांनी कोर्टात देखील धाव घेतली. परंतू राज्यातील महायुतीच्या सरकारने लाडकी बहीण योजनेतून महिलांना आर्थिक सक्षम साक्षर करण्याचे काम केले. महायुतीला राज्यातील तमाम महिलांचे पाठबळ मिळणार आहे. बहिणींना पैसे मिळू न देणाऱ्या महाविकास आघाडीला धडा शिकवण्यासाठी आपण महायुतीचे उमेदवार दिलीप वळसे पाटील यांना प्रचंड बहुमताने विजयी करावे, असे आवाहन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी केले.

रांजणगाव गणपती येथे आंबेगाव शिरूर विधानसभा



मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार दिलीप वळसे पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित महाविजय महिला निर्धार मेळावा संपन्न झाला. यामध्ये रूपाली चाकणकर बोलत होत्या. यावेळी माजी खासदार व म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, सिनेअभिनेते सयाजी शिंदे, माजी आमदार पोपटराव गावडे, शरद बँकेचे अध्यक्ष देवेंद्रशेठ शहा, किरणताई वळसे पाटील, राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्राच्या संचालिका पूर्वा वळसे पाटील, जयश्री पलांडे, भाजपाचे पक्षनिरीक्षक अतुल ब्रम्हभट, सुनिता गावडे, मानसिंग पाचुंदकर, आदी मान्यवर उपस्थित होते. रुपाली चाकणकर म्हणाल्या की, महायुती सरकारने शेतकऱ्यांसाठी विज माफीची योजना आणली. मुलींसाठी मोफत शिक्षणाची योजना आणली. योजनांचा महिलांना चांगला फायदा झाल्याने महिला या आर्थिक सक्षम व साक्षर झाल्या आहेत. त्यामुळे महायुतीच्या पाठीमागे मातृशक्ती एकवटली आहे, असा दावा त्यांनी केला.



'सर्वांना माहित आहे की परदेशात येऊन मालिका जिंकणे किती मोठी गोष्ट आहे, गेल्यावर्षी आपण येथे आलो, तेव्हा १-१ अशी बरोबरी झाली होती. यावेळी आपण २-१ अशी आघाडी झाल्यानंतरही आपण निर्णय घेतला की आपण कसं खेळायला पाहिजे. मला वाटते, प्रत्येकाने जबाबदारी घेतली. त्यामुळे श्रेय प्रत्येकाला जाते. — सुर्यकुमार यादव

आज ही खेळी संघाला मालिका जिंकण्यासाठी खूप महत्त्वाची होती. मी फक्त मूलभूत गोष्टींचे अनुसरण करण्याचा प्रयत्न करीत होतो. जसे मी गेल्या सामन्यात केले होते. मी शांत होतो. सलग दोन शतके, एक अविश्वसनीय भावना आहे. मी आत्ता ते व्यक्त करू शकत नाही." — तिलक वर्मा



## महिला आशियाई चॅम्पियन ट्रॉफी : चीनवर ३-० ने मात

# भारताचे वर्चस्व कायम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** महिला आशियाई अजिंक्यपद करंडक हॉकी स्पर्धेत आपली हुकुमत सिद्ध करताना भारताने बलाढ्य चीनचा ३-० असा पराभव केला. या विजयासह भारताने गटात अव्वल स्थान कायम ठेवले आहे. शनिवारी झालेल्या या सामन्यात भारताकडून संगीता कुमारी (३२ वे मिनिट), सलिमा टेटे (३७) आणि दीपिका (६०) यांनी गोल केले. दीपिका या स्पर्धेत सर्वाधिक आठ गोल करून आघाडीवर आहे.

चीनविरुद्धच्या या सामन्यात भारताने सुरुवातीपासून आक्रमक खेळ केला. पहिल्या काही सेकंदातच भारताला पेनल्टी कॉर्नर मिळाला. दीपिकाने जोरदार फटका मारून गोल करण्याचा प्रयत्न केला; परंतु चीनची गोलरक्षक सुरँग वू हिने भक्कमपणे चेंडू अडवला.

भारताच्या या आक्रमक खेळाविरुद्ध चीनला मधूनच प्रतिआक्रमण करता येत होते; मात्र वर्चस्व मिळवणाऱ्या भारताकडून पहिल्या अर्धाला पाच मिनिटे शिल्लक असताना शर्मिलाने मध्य रेषेवरून चेंडू घेत सुनेलिताकडे पास दिला. तिने लगेचच दीपिकाकडे चेंडू दिला; पण गोल थोडक्यात हुकला.

पहिल्या अर्धात गोल शून्य बरोबरी होता. दुसऱ्या अर्धात चीनने आक्रमण केले. त्यांच्या चेंगचेंग लिऊ हिने मारलेला चेंडू भारताची गोलरक्षक बिछूच्या हातून निसटला; परंतु रिबाँड झालेला चेंडू मारण्यासाठी तेथे चीनची दुसरी खेळाडू नव्हती. आक्रमण-प्रतिआक्रमणाच्या खेळात दुसऱ्या अर्धातही गोल झाला नाही.

तिसऱ्या अर्धात मात्र भारताने आपल्या खेळात अधिक सुसूत्रता आणली. सुशीलाच्या पासवर आक्रमण करणाऱ्या संगीता कुमारीने पहिला गोल केला. पाच मिनिटानंतर प्रीती दुबे हिने अनमार्क असलेल्या सलिमा टेटेकडे चेंडू दिला आणि तिने कोणतीही चूक न करता चेंडू गोलजाळ्यात मारला. पाच मिनिटांत दोन गोल झाल्यामुळे भारतीयांचा आत्मविश्वास वाढला.

## मोहम्मद शमी पुनरागमनाच्या सामन्यातच ठरला मॅचविनर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** रणजी ट्रॉफी २०२४-२५ स्पर्धेतील पहिला टप्पा शनिवारी संपला. पहिल्या टप्प्यातील शेवटच्या फेरीतील सामन्यातून भारताचा अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शामीने पुनरागमन केले. शामी नोव्हेंबर २०२३ पासून स्पर्धात्मक क्रिकेटपासून दुखापतीमुळे दूर होता. त्याच्या टाचेवर शस्त्रक्रियाही करण्यात आली. त्यानंतरही त्याला गुडघ्याच्या दुखापतीचाही त्रास जाणवला होता. त्यामुळे त्याचे पुनरागमन लांबले. त्याची निवड आगामी ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठीही करण्यात आलेली नाही.

मात्र आता शामीने पुनरागमनाच्या सामन्यात दमदार कामगिरी करत त्याची दावेदारी ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी ठोकली आहे. त्याने या सामन्यातून त्याची तंदुरुस्ती देखील सिद्ध केली.

शामीने बंगालकडून मध्य प्रदेशविरुद्ध पुनरागमन केले. या सामन्यात बंगालने ११ धावांनी रोमांचक विजयही मिळवला. शामी या सामन्यात बंगालसाठी मॅचविनर खेळाडू ठरला. इंदूरला झालेल्या या सामन्यात बंगालने प्रथम फलंदाजी करताना सर्वबाद २२८ धावा केल्या होत्या. बंगालकडून शाहबाज अहमदने ९२ धावांची खेळी केली, तर कर्णधार अनुस्तुप मुजुमदार याने ४४ धावा केल्या. मध्य प्रदेशकडून गोलंदाजी करताना आर्यन पांडे आणि कुलवंत खेजरोलिया यांनी प्रत्येकी ४ विकेट्स घेतल्या.

त्यानंतर फलंदाजीला उतरलेल्या मध्य प्रदेशला पहिल्या डावात सर्वबाद १६७ धावाच करता आल्या.

## मातोश्री, हेमराज संघाचे विजय

**पुणे :** मातोश्री इलेव्हन, हेमराज मृत्यूंजय यांनी निलेश भिंताडेस्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने आयोजित पुणे जिल्हा टेनिस प्रीमियर एन. बी. ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत आपापल्या प्रतिस्पर्ध्यावर मात केली. वडगाव बुद्रुक



येथील सिंहगड रोडवरील मैदानावर ही स्पर्धा सुरू आहे.पहिल्या लढतीत मातोश्री इलेव्हन संघाने टिंगरे सरकार ग्रुपवर २७ धावांनी मात केली.मातोश्री इलेव्हन संघाने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ८ षटकांत ३ बाद १०४ धावाकेल्या. दिलीप वर्माने २३ चेंडूंत सात षटकार व दोन चौकारांसह नाबाद ६३ धावाकेल्या. त्याला कर्णधार राजेश पवारची उत्तम साथ लाभली. पवारने १९ चेंडूंत दोन षटकार व तीन चौकारांसह ३३ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल टिंगरे ग्रुप संघाला ८बाद ७७ धावा केल्या. यात धीरज गच्चेने अवघ्या सहा धावांत टिंगरे ग्रुपचा निम्मा संघ गारद केला. 'ड' गटात मातोश्री इलेव्हन संघाचा हा पहिलाच विजय आहे. यानंतर दुसऱ्या लढतीत हेमराज मृत्युंजय संघाने शिरसाठ संघावर ५३धावांनी मात केली. हेमराज संघाने प्रथम फलंदाजी करताना ६ बाद १११ धावापर्यंत मजल मारली. अनिकेत ताकवनेने २१ चेंडूंत पाच षटकार व चार चौकारांसह ५५ धावा केल्या.लक्ष्याचा पाठलाग करताना शिरसाठ स्पोर्ट्स संघाला ७ बाद ५८ धावाच करता आल्या.

## परंदवाल स्पोर्टस क्लबचा मोठा विजय; श्लोकचे द्विशतक

**पुणे :** लायन्स क्लब पुणे रहाटणी च्या वतीने आयोजित लायन्स ज्युनियर लीग १३ वर्षाखालील एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत श्लोक



मुसमाडे (नाबाद १६० धावा) याने केलेल्या धडाकेबाज द्विशतकी खेळीच्या जोरावर परंदवाल स्पोर्टस क्लब संघाने २ एन क्रिकेट अकादमी संघाचा ३२८ धावांनी दणदणीत विजय मिळवला. फोर स्टार मैदान हिंजवडी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत प्रथम फलंदाजी करताना परंदवाल स्पोर्टस क्लब संघाने ५० षटकात ४ बाद ४०८ धावाचे भक्कम आव्हान उभे केले. यात श्लोक मुसमाडेने १११ चेंडूत २८ चौकारासह नाबाद १६० धावांची धडाकेबाज खेळी केली. त्याला पार्थ डी. याने ५९ चेंडूत १० चौकारासह ५५ धावा काढून साथ दिली. या जोडीने दुसऱ्या विकेसाठी ६२ चेंडूत १०१ धावांची भागीदारी करून संघाला चांगली सुरुवात करून दिली. त्यानंतर स्वराज पिंगळे ३०, संस्कार फेरे २७, अर्णव इंगळे नाबाद २७, श्रेयस पवार २२ यांनी धावा केल्या. हे आव्हान २ एन क्रिकेट अकादमी संघ पेलू शकला नाही. त्यांचा डाव १९.५ षटकात सर्वबाद ८० धावावर संपुष्टात आला. यात साईराज विडेने ३९ धावा काढून थोडासा प्रतिकार केला. विजयी संघाकडून विराज फराटे (३-२२), वृषांक खोत (२-१५), ऋषी वर्मा (१-४) यांनी सुरेख गोलंदाजी करत संघाला ३२८ धावांनी विजय मिळवून दिला.

## कसोटी सामन्यापूर्वी स्टार खेळाडू दुखापतीतून सावरला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतीय संघ बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीसाठी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर पोहोचला आहे. या दौऱ्यात भारतीय संघ यजमान ऑस्ट्रेलियाविरुद्ध पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची अंतिम फेरी गाठण्यासाठी भारतासाठी ही मालिका खूप महत्त्वाची आहे. कसोटी मालिकेतील पहिला सामना २२ नोव्हेंबरपासून (शुक्रवार) पर्थमधील ऑप्टस स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. या सामन्यापूर्वी टीम इंडियाला आनंदाची बातमी मिळाली आहे.

पर्थ कसोटीपूर्वी भारतीय संघासाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. स्टार फलंदाज केएल राहुलने पुन्हा एकदा नेटमध्ये फलंदाजीला सुरुवात केली आहे. भारत अ विरुद्धच्या सराव सामन्यात राहुलला प्रसिध कृष्णाचा चेंडू लागल्याने दुखापत झाली होती. वेगवान चेंडू राहुलच्या उजव्या हाताच्या कोपराला लागला होता. यामुळे त्याला मैदानाबाहेर जावे लागले होते. मात्र, राहुल आता या दुखापतीतून पूर्णपणे सावरला आहे. पहिल्या सामन्यात कर्णधार रोहित शर्माच्या अनुपस्थितीत केएल राहुल यशस्वी जयस्वालसह डावाची सुरुवात करेल, अशी अपेक्षा आहे.

## 'जर सुरुवात चांगली झाली नाही तर...'

**नवी दिल्ली :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटी मालिकेला सुरुवात होण्यास एका आठवड्यापेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे. दोन्ही संघ तयारीत व्यस्त आहेत, तर माजी क्रिकेटपटूंनी आगामी बॉर्डर गावस्कर ट्रॉफीबाबत अनेक भाकीत केले आहेत. पर्थमध्ये विजयाची नोंद करून संघाला दमदार सुरुवात करावी लागेल.

जतिन सप्रूच्या यूट्यूब चॅनलवर बोलताना हरभजन सिंग म्हणाला, " टीम इंडिया पुन्हा एकदा बॉर्डर गावस्कर ट्रॉफी जिंकण्याची शक्यता ५०-५० टक्के आहे. मी भारताने अलीकडे खेळलेल्या क्रिकेटचा विचार करत नाही, कारण इथली परिस्थितीत वेगळी होती. चांगल्या फलंदाजाकडे पाहून देखील असे वाटत होते की त्यांना फलंदाजी कशी करावी हे माहित नाही."

## 'माझ्याशी कोणी संपर्कच साधला नाही

# शार्दुल ठाकूरने ऑस्ट्रेलिया दौऱ्यातून वगळण्यावर सोडलं मौन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारताच्या कसोटी संघाचा बहुप्रतिक्षित ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील सामन्यांना २२ नोव्हेंबरपासून सुरुवात होत आहे. या दौऱ्यात भारतीय संघ ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळणार असून या मालिकेतील पहिला सामना २२ नोव्हेंबरपासून पर्थमध्ये खेळला जाणार आहे. दरम्यान, या पाचही कसोटी सामन्यांसाठी भारतीय संघाची निवड यापूर्वीच बीसीसीआयने केली आहे.

या संघात अनेक नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. पण या मालिकेसाठी वेगवान गोलंदाज शार्दुल ठाकूरला संधी मिळालेली नाही. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या.

शार्दुल म्हणाला, 'मी पूर्ण तंदुरुस्त आहे आणि ऑस्ट्रेलिया दौरा मोठा आहे, त्यामुळे संधी कधीही येऊ शकते.'

'त्यानंतर इंग्लंडचा संघही मर्यादीत षटकांच्या मालिका खेळण्यासाठी भारतात येत आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धाही होणार आहे. त्यामुळे असून बरेच क्रिकेट होणार आहे. त्यामुळे नक्कीच कधीतरी संधी मिळू शकते.'

'सध्या तरी माझे लक्ष माझा फिटनेस आणखी चांगला करण्यावर, माझ्या गोलंदाजीत आणखी सुधारणा करण्यावर आहे आणि मला जेव्हाही मैदानात उतरायचे आहे, तेव्हा माझे सर्वोत्तम द्यायचे आहे.'

## अहान भट्टाचार्य, समायरा चौधरी यांना विजेतेपद



**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या तर्फे आयोजित पीएमडीटीए मानांकन बाऊन्स टेनिस अकादमी १२ वर्षाखालील ब्रॉन्झ सिरिज टेनिस २०२४ स्पर्धेत अहान भट्टाचार्य, समायरा चौधरी यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून विजेतेपद संपादन केले. बाऊन्स टेनिस अकादमी, लॉ कॉलेज रोड येथील टेनिस कोर्टवर पार पडलेल्या या स्पर्धेत मुलांच्या गटात अंतिम फेरीत अव्वल मानांकित अहान भट्टाचार्यने तिसऱ्या मानांकित आध्रीत गुप्ताचा ४-२, ४-१ असा पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला. मुलींच्या गटात अंतिम लढतीत तिसऱ्या मानांकित समायरा चौधरीने दुसऱ्या मानांकित सान्वी गोसावीचा ४-२, ४-१ असा सहज पराभव करून विजेतेपद पटकावले. स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना करंडक व प्रशस्तिपत्रक अशी पारितोषिके देण्यात आली.

# सोलापूर, अष्टपैलू संघाची आगेकूच; इकोल टी-२० करंडक - सम्यक शहा, दीपक सामनावीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** सोलापूर स्टार इलेव्हन संघाने राजस्थान रॉयल्स अकादमी संघाचा तर अष्टपैलू स्पोर्ट्स संघाने सांगली जिल्हा क्रिकेट असोसिएशन संघाचा पराभव करताना इकोल स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इकोल टी-२० करंडक स्पर्धेत विजयी आगेकूच कायम राखली.

शिंदे हायस्कुलच्या मैदानावर झालेल्या पहिल्या लढतीमध्ये सोलापूर स्टार इलेव्हन संघाने राजस्थान रॉयल्स अकादमी संघाला २ गडी राखून पराभूत केले. प्रथम फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्स अकादमी संघाने निर्धारित २० षटकांत ९ बाद १११ धावा केल्या. यामध्ये अद्वय सिधयेने २५, साव्या गजराजने १६ तर वेदांत पाटीलने १४ धावांचे योगदान दिले. जय पांढरे, पुष्कराज खराडे व अक्षय पांचार्य यांनी प्रत्येकी २ तर बाळकृष्ण काशीद व निखिल दोरनालने प्रत्येकी १ गडी बाद केला. सोलापूर स्टार इलेव्हन संघाने १९.५ षटकांत ८ बाद ११२ धावा करताना विजय साकारला. सम्यक शहाने ३४ धावांची खेळी करताना संघाला विजय मिळवून दिला. त्याला आदर्श नागोजीने १४ तर अक्षय पंचार्यने १८ व कर्णधार बाळकृष्ण काशीदने १६ धावा करताना सुरेख साथ दिली. केदार बजाज, निमिर जोशी, वेदांत पाटील यांनी प्रत्येकी २ तर रवींद्र जाधव व निलय नेवासकर यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.

दुसऱ्या लढतीमध्ये अष्टपैलू स्पोर्ट्स संघाने सांगली जिल्हा क्रिकेट असोसिएशन (एसडीसीए) संघाला ६ गडी राखून पराभूत केले. प्रथम फलंदाजी करताना एसडीसीए संघाने निर्धारित २० षटकांत ७ बाद १४६ धावा केल्या.

## सर्वोत्तम खेळ करणे हेच विजयाचं सूत्र : सुर्यकुमार यादव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** संजू सॅमसन आणि तिलक वर्मा यांनी झंझावाती शतके करून उभारलेली २० षटकांतील २८३ ही धावसंख्या आफ्रिकन फलंदाजांना झेपलीच नाही. त्यांचा डाव १४८ धावांत संपुष्टात आला. या मालिकेत सलग दोन शतके करणारा तिलक वर्मा सामन्यात आणि मालिकेत सर्वोत्तम ठरला.

परिस्थितीनुसार खेळात बदल करणे हे आमचे उघड गुपित आहे. गतवर्षी आम्ही जोहान्सबर्गमधील या मैदानात खेळलो तेव्हाही असाच आक्रमक खेळ केला होता. तोच पवित्रा आम्ही यावेळीही कायम ठेवला. उत्तम खेळ करत राहणे हाच आमचा विचार असतो. आम्ही निकाल गृहीत धरून खेळ करत नाही, असे सूर्यकुमार म्हणाला.

## 'तो जे बोलला ते योग्यच...'

**नवी दिल्ली :** या मालिकेला पर्थ येथील पहिल्या सामन्याने सुरुवात आहे. सध्या नुकतीच मायदेशात न्यूझीलंडविरुद्धची कसोटी मालिका गमावल्याने भारतीय संघ आणि कोच गौतम गंभीर दबाव आहे. दरम्यान या मालिकेला सुरुवात होण्यापूर्वी रिकी पॉन्टिंगने मोठे वक्तव्य केले होते, ज्यावर गंभीरने सडेतोड उत्तर दिल्याने त्याच्यावर टीका होत आहे. अशात सौरव गांगुली त्याच्या समर्थनार्थ पुढे आला आहे. एका मुलाखतीत सौरव गांगुलीने म्हटले आहे की, गौतम गंभीर जसा आहे तसाच राहील. गांगुली म्हणाला, "मला असे म्हणायचे आहे की गंभीरला त्याच्या परिस्थितीत सोडले पाहिजे. मी पाहिले की पत्रकार परिषदेत तो जे बोलला त्यावर खूप टीका झाली. तो असाच आहे आणि केकेआरने आयपीएलचे जेतेपद पटकावले होते.

# मुंबईसाठी करो वा मरो परिस्थिती, महाराष्ट्राचे पॅकअप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतातील प्रतिष्ठेची देशांतर्गत स्पर्धा म्हणजे रणजी ट्रॉफी. रणजी ट्रॉफी २०२४-२५ हंगामही सप्टेंबरमध्ये सुरू झाला होता. या हंगामातील आता पहिला टप्पा शनिवारी (१६ नोव्हेंबर) संपला. आता दुसरा टप्पा पुढीलवर्षी जानेवारीमध्ये सुरू होणार आहे.

दरम्यान, पहिल्या टप्प्यात अनेक खेळाडूंकडून अफलातून खेळ पाहायला मिळाला. अनेक खेळाडूंनी आपल्या खेळाने प्रभावित केले. काही संघांची अपेक्षेप्रमाणे कामगिरी झाली, तर काही संघांची अगदीच खराब कामगिरी झाली.


प्रत्येक संघ पहिल्या टप्प्यात ५-५ सामने खेळले. ३८ संघात होणाऱ्या या स्पर्धेत मुख्यत: एलिट आणि प्लेट अशी विभागणी केलेली आढळते. एलिटमध्ये ३२ संघांची चार गटात विभागणी करण्यात आली होती. प्रत्येक गटात ८ संघ आहेत.

तसेच प्लेटमध्ये ६ संघ खेळत आहेत. दरम्यान, या पाचही गटांमध्ये बडोदा, विदर्भ, हरियाना, तामिळनाडू आणि गोवा या संघांनी पहिल्या टप्प्यानंतर अव्वल स्थान मिळवले आहे. ए गटात बडोदा, जम्मू-काश्मीर, मुंबई, सेनादल, त्रिपुरा, ओडिशा, महाराष्ट्र आणि मेघालय हे आठ संघ आहेत. या गटात बडोदाने अव्वल क्रमांक मिळवला आहे.

## ब्राझीलच्या व्हिंडरसन नुनेसला केलं पराभूत

# अमेरिकेत भारतीय बॉक्सर नीरज गोयतचा दबदबा!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतीय बॉक्सर नीरज गोयत नुकताच नेटफ्लिक्सवरील प्रसिद्ध शो द ग्रेट इंडियन कपिल शोमध्ये आला होता. यावेळी त्याने सांगितले होते की अमेरिकेमध्ये होणाऱ्या चॅम्पियनशिपचा तो भाग असणार आहे. आज त्याचा पहिला सामना झाला आणि त्याने कमाल करून दाखवली. आज त्याचा सामना लाईव्ह झाला या सामन्यांमध्ये विजय मिळवल्यानंतर भारतीय प्रेक्षकांनी त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे.

याआधी अंडरकार्ड सुपर मिडलवेट लढतीत नीरज गोयतने भाग घेतला होता. यामध्ये निराजचा सामना ब्राझीलचा बॉक्सर व्हिंडरसन नुनेस विरुद्ध झाला होता. भारतीय बॉक्सरने चमकदार कामगिरी करत एकतर्फी लढतीत व्हिंडरसनचा पराभव केला. मुख्य कार्डापूर्वी दोघांमध्ये ६ फेऱ्यांची लढत झाली, जी नीरजने ५९-५५, ६०-५४, ६०-५४ अशी एकतर्फी जिंकली.

जागतिक बॉक्सिंग परिषद रँकिंगमध्ये स्थान मिळवणारा नीरज हा पहिला भारतीय बॉक्सर आहे. पहिल्या राउंडपासून नीरज गोयतने व्हिंडरसन न्युन्सवर त्याचा दबदबा दाखवला. त्याचे त्याचे वर्चस्व कायम ठेवले. नीरजने त्याला बेदम मारहाण केली आणि त्याच्या चेहऱ्यावर आणि शरीरावर अनेक ठोसे मारले. त्याने १७१ पंच मारले, तर नुनेस केवळ ८७ पंच करू शकला. ३३ वर्षीय भारतीय बॉक्सरने गेल्या पाच सामन्यांपैकी चार सामने जिंकले आहेत. नीरज गोयत त्याच्या पहिल्याच सामन्यात कमालीची कामगिरी करून दाखवली. त्याने गेल्या वर्षी फाकोर्न अम्योदविरुद्ध तांत्रिक बाद फेरीत विजय मिळवला होता. त्याचा प्रतिस्पर्धी न्युनेसने बॉक्सिंगमध्ये नुकतेच व्यावसायिक पदार्पण केले. याआधी तो सोशल मीडियावर प्रभाव टाकणारा होता.



# एक हैं तो सेफ़ हैं

शिवसेना

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र

Published By: Bharatiya Janata Party, Maharashtra | C.D.O Barrack No. 1, Nariman Point, Mumbai- 400020

*Matter related to "Clock" symbol of the NCP is sub-judice in the Supreme Court.